रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ९ जुलै २०२३

# राष्ट्रवादी काँग्रेसचा मालक कोण ?

# काका की पुतण्या ?

आधुनिक केसरी

**देशात राज्यातील प्रादेशिक पक्षाचे सर्व अधिकार एकाच परिवाराकडे असतात. या पक्षातील परिवाराचा निर्णय अंतिम मानला जातो.जसा राजशाहीत वारसदार निवडला जातो,त्याप्रमाणे परिवारवादी पक्षात वारसदार निवडल्या जातो. महाराष्ट्रात शिवसेना पक्षात जे घडले! तेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात घडले आहे. यात काका आणि पुतणे या दोघांनी पक्षावर'मालकीचा दावा केला आहे. तर, शरद पवारांनी दिल्लीत पक्षाची राष्ट्रीय बैठक घेतली ती बेकायदेशीर असल्याचे म्हंटले आहे. पक्षाचा हा वाद आता न्यायालय व आयोगात गेला आहे. राष्ट्रीय राजकारणात पवार नावाचा दबादबा होता. आता पवारांनीच स्थापन केलेल्या पक्षात फूट पडावी व त्यांनी आपल्या डोळ्याने पहावी, हे दुर्देव म्हणावे लागेल.**

देशात स्वातंत्र्यानंतर काँग्रेस व विरोधी पक्षात विचाराची लढाई होती. यात काँग्रेस पक्ष, जनसंघ, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी पार्टी, हिंदू महासभा, मुस्लिम लिग आदी पक्ष होते, या पक्षात विचारांचे मतभेद होते पण कटूता नव्हती. विरोधी पक्षांनी ताकद कमी असली तरी त्यांनी निवडणुकीत काँग्रेसशी दोन हात केले. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असल्याने पक्षात ताकदही मोठी होती. १९६९ पर्यंत काँग्रेसला जनतेने डोक्यावर घेतले होते. हा पक्ष ५४ वर्षे सत्तेत होता. पक्षाला ७ वेळा बहुमत मिळाले. नंतर पक्षाची सूत्रे श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्वत: कडे घेतली तेंव्हा पक्षात एकाधिकारशाही सुरू झाली. त्यामुळे १९६९ व १९७९ या दोन वेळेस पक्षात विभाजन झाले.तेंव्हा श्रीमती गांधी यांनीही 'इंदिरा काँग्रेस' असा गट स्थापन केला होता. नंतर गांधी यांना इंदिरा गटाला बहुमत मिळवून दिले, तोच आपला पक्ष काँग्रेस पक्ष, असे म्हटले गेले. वास्तविक पहाता आता मूळ काँग्रेस राहिलेला नाही.देशात राजकीय पक्षातही नेत्याची निवड लोकशाही पध्दतीने केली जाते. आता राजकीय पक्षात नेत्याची नियुक्ती केली जात आहे. ज्या परिवार पक्षात त्यांच्याच मताला महत्व दिले जाते. त्यांचा निर्णय हा आदेश म्हणून मानला जातो. या पक्षात लोकशाहीची प्रक्रिया संपते. पक्ष हा दुर्बल होत जातो. याच काँग्रेस पक्ष याच कारणामुळे राष्ट्रीय पातळीवर कमजोर झाला आहे. देशात यात तेलगू देशम, द्रमूक, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल, हे जरी लोकशाहीचे बुरखा घालत असले तरी पक्षावर परिवाराचाच अधिकार आहे.




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

महाराष्ट्रात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस हे ठाकरे- पवार यांचे मालकीचे आहेत. तर काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असला तरी पक्षात गांधी परिवाराचा शब्द अंतिम मानला जातो. शिवसेना पक्षात नेतृत्वावरून वाद झाला. त्यातून राज ठाकरे सेनेतून बाहेर पडले. त्यांनी "मनसे" पक्षाची स्थापना केली. ठाकरे पक्षातील घराणेशाही मान्य आहे. कारण ते पक्षातील नेत्याच्या कर्तृत्वाला महत्व देतात. शिवसेना पक्षात ठाकरेंच्या एकाधिकारशाहीमुळेच आमदारात नाराजी वाढत गेली. त्याचा परिणाम शिंदे यांचे नेतृत्वाखाली आमदारांनी बंड करून गट स्थापन केला. नंतर शिंदे गटाने पक्ष व चिन्ह दोन्ही मिळाले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात तेच घडते व घडणार आहे. या पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार हे राजकीय खेळी करण्यात चाणाक्ष व धूर्त समजले जातात. त्यांच्या विरोधात जाण्याची कोणाची हिंमत नाही. पण त्यांच्याच परिवारातील पुतण्याने म्हणजे अजितदादांनी बलाढ्य नेते शरद पवारांना आव्हान दिले. तापर्यत पवारांनी आजपर्यंत राजकीय खेळी अतिशय सावधपणे खेळली. त्यामुळे कधीच अंगलट आलेले नाही.पवारांच्या या कपटी व दुटप्पीपणाला चाटूगार मीडिया चाणाक्ष, मुसद्देगिरी राजकारण असे म्हणून कौतूक करत असत. मग आता कोठे गेला त्यांचा चाणाक्षपणा ? पवारांनी राजकीय खेळीसाठी अजितदादांचा मोहरा म्हणून वापर केला. तेथेच चुकले! त्याचा परिणाम असा झाला की पुतण्याने काकाच्या ( पवारांच्या) पॉवरला धक्का दिला. हे मान्य करावेच लागेल. वास्तविक या पक्षाची राष्ट्रीय पातळीवर ताकद नाही. पक्षाचे लोकसभेत चार सदस्य आहेत. त्यात राज्यात भाजपापेक्षा पक्षाचे संख्याबळ कमीतरी 'तोरा' मात्र अधिक आहे. महाराष्ट्रात २५ वर्षे राजकारणात असलेल्या पवारांचे नेतृत्व अयशस्वी ठरले. राज्यात पक्षाचे पक्षाला ७५ चा आकडा सुध्दा गाठता आलेला नाही. या पक्षाचे १९९९ मध्ये ५८ आमदार निवडून आले, तर २००४ - ७१, २००९- ६३, २०१४- ४१ आणि २०१९- ५४ आमदार निवडून आले आहेत. जो पक्ष राष्ट्रीय व राज्यपातळीवर कुपोषित आहे. त्या पक्षाच्या नेतृत्वाने पंतप्रधान मोदी व भाजपला सत्तेतून घालविण्याची भाषा मात्र करावी! याचे आश्चर्य वाटते! या पक्षाला राज्यात सत्तेसाठी काँग्रेस पक्षाच्या दारात नेहमी उभे रहावे लागते.यामुळे पक्षातील आमदारांची सतत कोंडी होत आहे, याचा पवारांनी कधी विचार केलेला नाही. केवळ राजकीय क्षेत्रात स्वत:चे मोठेपण, प्रतिष्ठा टिकविण्यासाठी चर्चा होईल, तथ्यहिन आरोप करत असतात. ते सतत राजकीय भूमिका बदलत गेले. त्यांनी अभ्यासू व जाणकार या गुणाचा वापर राजकारणात कपट व दुटप्पीनीतीसाठी केला. यातून आज पक्षात मतभेद झाले. पक्षात उभी फूट पडली. या पक्ष फुटीत भाजपा काय संबध ? पण ते आपल्या अपयशाचे खापर मात्र भाजपावर फोडत आहेत. शिवसेना फुटली! तेंव्हा तर राष्ट्रवादी नेते 'खोके सर्व ओके' अश्या घोषणा जोरात होत्या. आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली, मग खोक्यांची घोषणा का दिल्या जात नाहीत! आता त्या घोषणावीर शेपटी आत घालून बसले आहेत! दादांचा तसा दरारा आहे. शिंदे गटातील आमदारांनी सभ्यपणा दाखविला, म्हणून वाटेल ते आरोप केले गेले. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आता शरद पवार व अजित दादा म्हणजे काका- पुतणे यांचेत दोन गट पडले आहेत. पण दादांचा गट लगेच शिंदे -फडणवीस सरकारमध्ये सामील केले गेले. याचे नवल वाटते, कारण राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना भाजपाने भ्रष्ट म्हणून टीका केली. खुद्द पंतप्रधान मोदींनी राष्ट्रवादी काँग्रेसवर जाहीरपणे भ्रष्टाचाराचे आरोप केले. यात शिंदे- फडणवीस सरकार बहुमतात असताना भ्रष्ट नेत्यांना मंत्री करण्याची तत्परता का दाखविली ? यात राज्यात शिंदे- फडणवीस सरकारची काय मजबूरी होती? राष्ट्रवादीचे बंड व मंत्र्याचा शपथविधी हे एकाचवेळी झाला, यातून या बंडाला शिंदे व फडणवीस यांची मदत होती. यात शंका नाही. राष्ट्रवादीच्या बंडाचा कारस्थानात भाजपाचा हात होता, हे दिसतेय! तेंव्हा शिंदे व फडणवीस हे नाकारू शकणार नाहीत. दुसऱ्याचे घर फोडतांना आंनद वाटतो, पण द्या ही आपल्यावर वेळ येऊ शकते. याचा केला पाहिजे होता. यात शिंदे गट तर शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी बरोबर मैत्री तोडावी, अशी मागणीसाठी करत पक्षातून बाहेर पडला. तर शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मांडीला मांडी लाऊन बसणार काय? आता शरमेने मान खाली घालावी लागेल! निवडणुकीत जनता हे प्रश्न आपणाला विचारेल! तेंव्हा मात्र निरूत्तर व्हाल! म्हणे! राज्याच्या विकासासाठी, हितासाठी केले? अशी सारवासारव केली जात आहे. यामुळे शिंदे यांचेवर गटात अवस्थतता निर्माण झाली आहे, दुसरीकडे भाजपा व फडणवीसांची तर सत्तेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर मैत्री कधीच करणार नाही, अशी भूमिका होती. त्यात राष्ट्रवादी पक्षाच्या ज्या नेत्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, त्यांना शिंदे - फडणवीस सरकारने मंत्री कसे काय केले? यात शिंदे शिवसेना व फडणवीस सरकारने आता नैतिकता झाडावर टांगली आहे काय? आजपर्यंत राष्ट्रवादी, काँग्रेस हे अजितदादा, भुजबळ व मुश्रीपवर निर्दोष ठरवित होते, आता भाजपच्या सरकारमध्ये सहभागी होताच भाजपाकडे भ्रष्टाचारची वाशिंग मशीन आहे, तर विरोधी पक्षाचे नेते भ्रष्ट नेत्याला स्वत: निर्दोष ठरवितात, त्याचे काय? राजकारणात सगळे सारखेच! हे खोटे नाही! यातून शिंदे व फडणवीस सरकारवरची प्रतिमा डागाळली गेली आहे. हे तितकेच खरे आहे. मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी शक्तीप्रदर्शन केले. या बैठकीत दोन्ही गटाने 'पक्ष आमचाच' असा दावा केला. पण यात काकापेक्षा पुतण्याभारी पडलेला आहे. दादांच्या बाजूने ३२ आमदारांचे समर्थन दिसत होते, त्यांना तर ४० आमदारांचे समर्थन आहे, असे सांगितले जात आहे.त्यामुळेदादा गटावर पक्षांत्तराची कारवाई होणार नाही, असे दिसतेय. दादांचे बंड अचानकपणे केले नाही. त्यांनी ३० जूनला निवडणूक आयोगाकडे पक्षाचा प्रस्ताव पाठविला आहे, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात बंड झाले. या गटाने कायदेशीर व सुनियोजितपणे बंड केले आहे. यात धक्कादायक म्हणजे, अजितदादा हे परिवारातील सदस्य, तर विश्वासू सहकारी प्रफुल पटेल, छगन भूजबळ सुनील तटकरे, या नेत्यांनी पवारांच्या राजकीय भूमिकेवर प्रश्चचिन्ह निर्माण केले. शरद पवारांवर नेतृत्वावर प्रथमच स्वकियांनी जो अविश्वास दाखविला. त्यामुळे पवारांच्या विश्वासर्हतेला राष्ट्रीय पातळीवर तडा गेला आहे. २०१४ च्या निवडणुकीनंतर राष्ट्रवादीने भाजपाबरोबर सत्तेत जाण्याचा निर्णय घेतला होता. पक्षाने नेते प्रफूल पटेल यांनी भाजपाला बाहेरुन पाठिंबा देण्याचे घोषित केलेले होते, पण पवारांनी ऐनवेळी हा निर्णय बदलला. त्यांनी पक्षातील नेत्यांना विश्वासात घेतले नाही.तेंव्हा त्यांनी नेत्यांना भाजपा सरकारच्या शपथविधीला जाण्याची सूचना केली होती. २०१७ मध्ये पुन्हा पवारांच्या आदेशा नुसार एका उद्योगपतींच्या घरी भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यात पाच बैठका झालेल्या होत्या. तेंव्हा पवारांनी भाजपाला शिवसेनेला सत्तेपासून बाजूला ठेवण्याचा सल्ला दिला होता. पण तेंव्हा भाजपाने शिवसेना हा मित्र पक्ष असल्याने ते मान्य केली नाही.तेंव्हा ठाकरे यांना राजकारणात मैत्री टिकवावी ? हे भाजपाकडून शिकावे? तसेच पवार काय आहेत? ओळखावे! पवारांनी शिवसेना, भाजपा हे कट्टर हिंदुत्ववादी आणि जातीयवादी पक्ष म्हणून सत्तेत न जाण्याची भूमिका होती तर मग त्यांनी २०१९ मध्ये शिवसेना मित्र पक्ष कसा झाला? त्यापूर्वी पवारांच्या निर्णयानुसार राज्यात भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार स्थापन करण्याचे ठरले होते, त्यातून सकाळचा फडणवीस व अजितदादांचा शपथविधीचा झाला. यामागचे खरे! सूत्रधार शरद पवार होते.आता उघड झाले आहे. पवार हे पक्षातील नेत्यांना विरोधी पक्षाकडे सत्तेसाठी चर्चा पाठवितात पण निर्णय मात्र स्वत: घेतात. या दरम्यान पवार हे दिल्लीत पंतप्रधान मोदी भेट घेतली होती. त्यावेळी त्यांचेसमोर अटी ठेवल्या.सूप्रिया सुळे केंद्रात कृषी मंत्री करा, दुसरी अट महाराष्ट्रात फडणवीस यांना मुख्यमंत्री करु नकाअशी होती. पण भाजपाने पहिली अट मान्य केली त्यांची दुसरी अट ठोकारली. मुख्यमंत्री कोणाला करावयाचे? कोणाला नाही, हे भाजपा ठरविणार, हे असे बजावले. याचे कारण महाराष्ट्रातील राजकारणात फडणवीस हे पवारांपेक्षा वरचढ ठरत आहेत. फडणवीस यांना शह देण्यासाठी त्यांचा कट होता. फडणवीस मुख्यमंत्री झाले तर आपल्या मनाप्रमाणे कामे होणार नाहीत, हे त्यांना भीती होती.त्यामुळे पवारांनी भाजपाबरोबर सत्तेत न जाण्याचा निर्णय पलटला आणि दादांनी बंड केल्याचे नाटक केले. यात दादांना माघार घ्यावी लागली. यात दादा व फडणवीस यांची नामुश्की झाली. पण पवारांनी तोंड का उघडले नाही.आता या प्रकरणात गुगली टाकल्याचे सांगत आहेत, पण त्यांनी आपल्याच खेळाडूची विकेट घेतली गेली, हे मात्र विसरले! दादांच्या गटांनी आम्ही पक्ष सोडलेला नाही, असे सांगत राष्ट्रवादी पक्षावर दावा केला आहे. पवार राजकीय संकटात सापडले आहेत. आम्हालाही कायदा कळतो, आम्ही विचारपूर्वक निर्णय घेतला आहे. जेंव्हा बीडमधून धनजंय मुंढे पक्षात घेतल गेल! तेंव्हा काका गोपीनाथजी मुंढे व बहिण यांच्या डोळ्यात अश्रू आले नाहीत काय? असा प्रश्न भुजबळांनी विचारला आहे. पवारांकडे राजकीय भूमिका बदलत केले याचे उत्तर दिलेले नाही. पवारांचे वय ८२ वर्ष झाले आहेत त्यांनी थांबले पाहिजे, निवृत्ती घ्यावी, आम्हाला आशीर्वाद द्यावा! असा सल्ला दादानी दिला! पवारांनी राजीनामा दिला तर मग मागे का घेतला? असा पवारांना प्रश्न विचारला जातोय! पवारांच्या जी दुटप्पी राजकीय खेळी खेळली, त्याचे उत्तर त्यांचेकडे नाही. पक्ष फुटीनंतर त्यांनी शक्ती प्रदर्शन करून स्वत: चे हस्से करुन घेतले आहे. त्यांनी 'आमचाच शिक्का खोटा निघाला, अशी दादावर टिप्पणी केली. पवारांनी तर भाजपा हा जातीयवादी व मनुवादी पक्ष आहे, अशी टीका करत आहेत. आता राज्याहितासाठी पक्ष पुन्हा उभारला जाईल, असे म्हणाले! वास्तविक काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत महाराष्ट्राचे अधिक वाटोळे झाले आहे! सहकार क्षेत्र बुडाले,साखर कारखाने लिलावात काढले गेले विकले गेले, सहकारी बँका दिवाळीखोरीत निघाल्या, भ्रष्टाचार वाढत गेला. तसेच नेत्याने कुविख्यात गुन्हेगाराचीचा भूखंडाचे श्रीखंड केले. तसेच राज्याचा माजी गृहमंत्री शंभर कोटीची खंडणी मागणी मागतो, तो जेलमध्ये जातो. राज्याच्या पोलिस मुख्यालयात व्यापाऱ्याच्या खूनाचे षड्यंत्र रचले जाते! संताना ठेचून मारले गेले, पत्रकारांनी व तरुणांनी समाजमाध्यमावर टीका केली म्हणून बेड्या घातल्या गेल्या. हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राज्यात सत्तेत असताना घडले आहे. हे पुरोगामी महाराष्ट्राचे भूषण होते काय? आता महाराष्ट्राचे भले करणार ?या पवारांचे खावयाचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. ते सत्तेसाठी पक्षातील नेत्यांना भाजपाकडे चर्चेसाठी पाठवत होते? पक्षाच्या बैठकीत २०२४ मध्ये निवडणुकीत देशात मोदी येणार, असे संगतात! देशात काँग्रेस पक्ष ७५ वर्षात ५४ वर्षे सत्तेत होता. केंद्रात पाच वेळा पक्षाला बहूमत मिळाले. तर १९९६ मध्ये केंद्रात भाजपा सत्तेत आल्यावर काँग्रेसने इतर विरोधी पक्षाला हाताशी धरुन भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्याचे राजकारण केले. देशात १९९७ मध्ये भाजपा नेते अटलजीचे सरकार एका मताने पाडले गेले तेंव्हा विरोधी पक्ष तर काँग्रेसच्या ओटीत जाऊन बसलेला होता. भारतीय लोकशाहीत भाजपाला अस्पृश्य मानत सत्तेपासून दूर ठेवण्याचा कृत्य केले. पण काळ बदलतो तसे २०१४ मध्ये मोदींच्या नेतृत्वाच्या बळावर भाजपाला २०१४ व २०१९ मध्ये स्पष्ट बहुमत मिळविले. राज्यात पवार केवळ पक्ष जीवंत ठेववा, या उद्देशाने भाजपाला लक्ष्य करत आहेत. ते आपल्या सोयी व कामासाठी मोदी व पक्षातील नेत्याला भेटत. तसेच बारामतीला भाजपा केंद्रीय मंत्र्याला निमंत्रित करत होते. त्यावेळी भाजपा पक्ष हा जातीयवादी नव्हता काय ? काँग्रेस विचारसरणीत वाढलेले पवार सुध्दा मतासाठी तुष्टीकरणाचे राजकारण करतात! ते काँग्रेसची झील ओढत आहेत. याच पवारांनी जातीय व्देषातून शिवराय भक्त बाबासाहेब पुरुदंरे यांना महाराष्ट्रभूषण पुरस्कार देण्याला विरोध केला होता. 'इतकेच नव्हे, मुस्लिम व्होट बँक'साठी औरंगजेबाजे उदात्तीकरण केले, याची त्यांना खंत अथवा लाज वाटलेली नाही. त्यांनी राज्यात जातियतेचे बीज पेरले, असे मनसे नेते राज ठाकरे यांनी म्हटले होते. तेव्हा दातखिळी बसली. पक्षात झालेले बंड त्यांना थांबविता आले असते. त्यांना दोन्ही गटात संवाद साधून पक्ष पुन्हा एकसंघ करता आला असता. पण कन्येच्या मोहापायी त्यांचा अंहकार जागा झाला. त्यांचेवर शक्ती प्रदर्शनाची वेळ यावी, हे दुर्देव! यात कन्या सुप्रिया गटाची बाजू संभाळत आहेत. यांनी 'पक्षाचा बाप शरद पवार आहेत. तेंव्हा आई व बापाचा नाद करावयाचा नाही, असा दम त्यांनी दिला. पण पक्षाचा बाप नेता कधीच नसतो, पक्ष सामान्य कार्यकर्त्यांच्या घामातून उभारला जातो, यातून पक्ष मोठा होतो, नेते मोठे होतात! तेंव्हा पक्षाचे मालक पवार हे कसे काय? पक्ष म्हणजे, रतन टाटा, बच्चन यांची कंपनी अथवा संपत्ती नाही, मालकी हक्क सांगायला? राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मालक कोण ? पक्षाचा वाद आता केंद्रीय निवडणूक आयोगाकडे गेला आहे त्यामुळे पक्षाचे नाव आणि चिन्ह कोणाला मिळणार ? या आयोगाकडे सुनावणी होईल. यात १ वर्षाच्यावर कालावधी लागेल. या प्रकरणात शिंदे गटा- प्रमाणे दादा गटाला पक्षाचे नाव व चिन्ह मिळेल, असे जानकारांचे मत आहे.तसेच निवडणूक आयोग पक्षाचे चिन्ह गोठवू शकतो. महाराष्ट्रात २०२४ ची लोकसभा विधानसभेची निवडणूक लागेल. पण यावेळी शिवसेनेचे दोन गट व राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकमेकाच्या विरोधात उभे टाकतील. या जनता दरबारात पक्ष कोणाच्या मालकीचा याचा फैसला होईल. या शिवाय त्यांना पर्याय नाही.पण यात काँग्रेस पक्षाचे मात्र 'सँन्डवीच' होणार आहे. देशात व राज्यात सत्तेसाठी अनैतिक मार्गाने सत्ता मिळेल, सत्ता काही काळ टिकेल, पण जनतेचा विश्वास गमावला तर पक्षाला त्याची किंमत मोजावी लागते, हे राजकीय नेत्यांनी लक्षात ठेवावे.








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

मानसी जोशी विठ्ठलाच्या मूर्तीशी संवाद करीत असताना ती केवळ मूर्तीशी बोलते आहे असे वाटतच नाही. प्रत्यक्ष विठ्ठलच समोर आहे असे वाटते. तुकाराम बुवांची गाथा वाचताना आवली आणि रुख्मिणी दाखवल्या आहेत. आवलीचे गूढ रम्य स्वप्न, वाऱ्याने उडणारी तुकोबांच्या गाथेची पाने, इंद्रायणीत पडून वाहून जाणारी गाथेची पाने हे सगळे प्रसंग कमालीचे जिवंत वाटतात. चित्रपटाच्या तुलनेत दृश्ये दाखवताना नाटकांना अनेक मर्यादा पडतात पण इथे त्या सगळ्या मर्यादा असूनही सगळं काही रंगमंचावर जिवंत करण्यात दिग्दर्शक, नेपथ्यकार आणि प्रकाश योजनाकार यशस्वी झाले आहेत. प्रेक्षकांना एक भव्यदिव्य अनुभव त्यांनी दिला आहे. भद्रकाली प्रॉडक्शनने अनेक दर्जेदार नाटके दिली, त्याच परंपरेतील हे नाटक आहे. मच्छिन्द्र कांबळी यांची दर्जेदार नाटकांची परंपरा प्रसाद कांबळी यांनी नुसतीच चालू ठेवली नसून आणखी पुढे नेली आहे. देवबाभळी हे संगीत नाटक असूनही इतर संगीत नाटकांपेक्षा आगळेवेगळे. प्रसाद कांबळी या नाटकाचे निर्माते आहेत. आनंद ओक यांचे संगीत आहे. विशेष म्हणजे या नाटकातील गीते शुभांगी सदावर्ते आणि मानसी जोशी दर वेळी प्रत्यक्ष गातात. इतर नाटकांप्रमाणे त्या गीतांची रेकॉर्ड लावली जात नाही. प्राजक्त देशमुख यांचे संवाद हृदयाला भिडणारे आहेत. लोकसंगीत, अभंग, ओवी इ. चा सुरेख वापर या नाटकात केला गेला आहे. संतपरंपरा, लोकपरंपरा आणि अस्सल मराठमोळ्या संस्कृतीचं दर्शन हे या नाटकाचं वैशिष्ट्य म्हणावं लागेल. या नाटकाला एकूण ४४ पारितोषिके मिळाली आहे. महाराष्ट्र शासन, साहित्य अकादमी इ. विविध पुरस्कार मिळाले आहेत. अनेक विक्रम या नाटकाने रचले आहेत. फोर्ब्स या जगप्रसिद्ध मासिकाने या नाटकाची सर्वाधिक लोकप्रिय नाटक म्हणून नोंद घेतली आहे. अनेक दिग्गज कलाकारांनी हे नाटक गौरविले आहे. केवळ दोनच स्त्री पात्रे एवढा सशक्त अभिनय करून दोघींच्या बळावर एखादे नाटक एवढे यशस्वी करू शकतात हे विस्मयचकित करणारे आहे. त्यासाठी शुभांगी सदावर्ते आणि मानसी जोशी या दोघीना सलाम. या नाटकाची वाटचाल लवकरच पाचशेव्या प्रयोगपर्यंत होईल. काही दिवसांनी या नाटकाचे प्रयोग थांबवण्याचा निर्णय कलाकारांनी घेतला आहे. त्यामुळे ज्यांनी अजूनपर्यंत एकदाही हे नाटक पाहिले नसेल त्यांनी एकदा तरी ते जरूर पाहावे असे आहे.




## संगीत देवबाभळी



## आनंदी पहाट

## नोकरी हा अर्थार्जनाचा पारंपरिक राजमार्ग

आधुनिक केसरी

नोकरी हा अर्थार्जनाचा उत्तम पर्याय असल्याने तो अधिक पसंत केला जातो. आपण नोकरी मिळवण्याच्या नादात काय करत आहोत, ह्याचे का बरे भानच रहात नाही ? म्हणजे नोकरी न मिळणे ही इतकी मोठी उणिव असते का, कि ज्यासाठी एखादी व्यक्ती वाट्टेल तितका पैसा खर्च करायला तयार होते आणि ते देखील कोणतीही शाश्वती नसताना. ह्याचाच गैरफायदा घेऊन आर्थिक आणि मानसिक फसवणूक होण्याचे प्रमाण, गुन्हे दिवसेंदिवस वाढत आहेत. अनेकांनी नोकरीच्या नावाखाली फसवणूकीतून आपली उखळ पांढरी करून घेतली आहेत. इंटरनेटच्या माध्यमातून आणि सोशल मिडीयाच्या उपयोगातून नोकरी मिळवून देण्याच्या नावाखाली उच्चशिक्षित तरुण- तरुणींची अगदी दररोज फसवणूक होत आहे. काही जणांनी तर नोकरी मिळवून देणारी दुकानेच थाटली आहेत. प्राथमिक नोंदणीचे पैसे भरायचे, ते देखील ऑनलाईन. संबंधित कंपनीचे कार्यालय नक्की कोठे आहे ? कंपनी कोणाची आहे ? खरेच खात्रीलायक सेवा कंपनीकडून दिल्या जातात का ? स्थानिक, देशभरातील आणि विदेशांतील नोकरीसाठी उच्चशिक्षित परंतू बेरोजगार व्यक्ती केवळ फोनवर झालेल्या चर्चेवर विश्वास आणि निश्चितच चांगली नोकरी मिळेल हा भरवसा ठेवून हजारो, लाखो रुपये खर्च करतात. कालांतराने आपली फसवणूक झाल्याचे कळते, खात्री पटते. झालेला वेळेचा, पैशाचा खर्च आणि मनस्ताप ह्यातून सावरताना होणाऱ्या मानसिक यातना ज्याच्या त्यालाच कळतात, भोगायला लागतात. नोकरीचा धंदा होऊन बसला आहे. शासकीय, खाजगी, सरकारी, निमसरकारी, शैक्षणिक, औद्योगिक, बँकिंग, माहिती-तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्राच्या नावाखाली विविध प्रकारच्या नोकरीसाठी फसवणूक मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे माहिती असूनही आपण गाफील राहतो. म्हणूनच नोकरी मिळवताना सावधानता बाळगणे अधिक योग्य ठरेल.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## गाव..

आधुनिक केसरी

गावाकडे चल माझ्या दोस्ता पर काट्याकुट्याचा हाय रस्ता... या ओळी खूप काही सांगून जातात. शहराकडे जाणारा रस्ता हा मृगजळासारखा असतो. पण गावाकडे, खेड्यात जाणारा रस्ता हा काट्याकुट्यांचा, चिखलांचा असतो. अवघड वाट असते पण माणसं सरळ असतात. प्रेम, जिव्हाळा, आपुलकी इथे आणि इथेच अनुभवायला मिळते. गावात सगळे सणवार अगदी उत्साहात साजरे होतात. नागपंचमी, पोळा, मकर संक्रांत, दिवाळी, दसरा, गुढीपाडवा, होळी या सणांची खरी मजा तर गावाकडेच असते. नागपंचमीसाठी दोन दिवस आधीच झोके बांधले जातात. दसरा व संक्रांतीला थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेतात . अगदी घरी जाऊन सायंकाळी गावभर लहान मुले फिरत असतात. दसरा आणि संक्रांतीला गावाकडे सायंकाळी खूप लगबग असते. प्रत्येक जण प्रत्येकाच्या घरी जात येत असतो. एकमेकांकडे जाण्याने सारे रुसवे- फुगवे या सणाला पळून जातात. नव्याने सारे भेटतात. गावात काही जत्रा असतात. त्या खूप मोठ्या संख्येने व उत्साहात साजऱ्या होतात. वर्षातून एक किंवा दोन अशा मोठ्या जत्रा असतात. दोन-तीन दिवस किंवा पाच-सहा दिवस या जत्रा चालतात. देवीची किंवा म्हसोबाची ही जत्रा असते. लेकीबाळींना खास आमंत्रण असते या जत्रेसाठी. तिलाही थोडासा विसावा मिळावा म्हणून माहेर पणासाठी तीन-चार दिवस मुलाबाळांसह लेकीला आणतात. ती सुद्धा माहेरी येण्यासाठी या जत्रेची वाट पाहत असते. खरंतर फार पूर्वीपासूनच ही जत्रा लेकीबाळींसाठीच असते. त्या निमित्ताने त्या माहेरी येतात, चार दिवस राहतात. गावाकडची खूप आनंदाची गोष्ट म्हणजे पारावरच्या गप्पा! अगदी तरुण मुलं, वृद्ध सगळेच या पारावर जमा होतात .गावच्या सगळ्या गप्पा इथे होतात .रोज प्रत्येकाची पारावर एक तरी चक्कर असतेच. या पारावर सुखदुःखाच्या सुद्धा गप्पा होतात. कधी खूप आनंदाच्या तर कधी दुःखाच्या अशाही वयस्कर लोकांच्या गप्पा येथे होत असतात. घरातील वयोवृद्ध मंडळींसाठी गावातील पार ही एक पर्वणीच असते. गावातील काही भांडण तंटे सुद्धा पारावरच सोडवल्या जातात. गावातील काही माणसे या पाराभोवती जमा होतात. आणि ज्या कोणाच्या काही समस्या असतील तेथे मांडल्या जातात. आणि त्यावर सर्वानुमते तोडगा काढला जातो .आणि गावातील लोकांना तो मान्य असतो. एकमेकांचा आदरही करतात. कधी कोणी चुकला तर मोठी व्यक्ती त्याचे ानही धरतात. असा हा आपुलकीचा, जिव्हाळ्याचा आपला गाव खरंच गाव आहे. कारण शहरात राहणारा माणूस सुद्धा कधीकधी कामानिमित्त मला गावाकडे जायचे आहे असे सांगून रजा टाकत असतो. किंवा सुट्टी घेतो आणि गावाकडे एक तरी चक्कर मारतो . शहरात जेव्हा लोकांना कंटाळा येतो तेव्हा त्यांना गावाकडे जाण्याचा मोह होतो आणि गावाकडचे एक दिवस का होईना पण ते आनंद घेऊन येतात. आणि पुन्हा नव्याने आपल्या कामावर लागतात. अभिमानाने म्हणावेसे वाटते गड्या आपुला गावच बरा.....

संस्कारधन


सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-६

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

तुका म्हणे किती आवरावे हात पाय । न खेळावें तोंच बरें वरी न ये डाय ॥५॥
कोडें रे कोडें ऐका हें कोडें । उगवूनि फार राहे गुंतोनियां थोडें ॥१॥
पुसतसे सांगा मी हें माझें ऐसें काई । रुसूं नका नुगवे तो झवे आपुली आई
सांगतों हें मूळ काहीं न धरावी खंती । ज्यालें ज्यवो मेलें मरो प्रारब्धा हातीं तुका म्हणे अभिमान
सांडावा सकळीं । नये अंगावरी वांयां येऊं देऊं कळी
नुगवे तें उगवून सांगितलें भाई । घालुनियां ताळा आतां शुद्ध राखा घाई ॥१॥ आतां कांहीं नाहीं राहिलें ।
म्यां आपणा आपण पाहिलें ॥ध्रु.॥
कमाईस मोल येथें नका रीस मानूं। निवडूं नये मज कोणा येथें वानूं ॥२॥
तुका म्हणे पदोपदीं कान्हो वनमाळी । जयेजत मग सेवटिला एक वेळीं ॥३॥
हारस आनंदाचा । घोष करा हरिनामाचा । कोण हा दैवाचा । भाग पावे येथील ॥१॥

## निरूपण

आधुनिक केसरी

योगक्षेमं वहन्तीं त्वां नमाम्यहं पुनःपुनः |
अभीष्टफललाभाय दुर्गां
देवीं नमाम्यहम् || ३८ ||
योगक्षेमाचे वहन करणाऱ्या तुला
दुर्गादेवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी
वारंवार नमन करतो.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्रथम भूमिका प्रेम है, भक्ति नहीं बिन प्रेम । भक्ति बिना कस मुक्ति है, नर जीवन मणि प्रेम ।।०१ ।।(स्वर्वेद पंचम मण्डल चतुर्थ अध्याय) ०५/०४/०१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :

अध्यात्म - साधनेत प्रथम भूमि अर्थात प्रथम आधार प्रेम आहे. प्रेमाधाराची भिंत दृढ असली पाहिजे. हा आरंभ, आधार दृढ झाल्यावरच भक्तीसाधना पूर्णपणे चालते. म्हणून प्रेमाशिवाय भक्ती होत नाही आणि भक्तीशिवाय मुक्ती कशी होईल ? म्हणून मानव जीवनातील रत्न प्रेम आहे.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## स्थूलपंचमहाभूते

आधुनिक केसरी

आकाश हे ब्रम्हासारखे आहे असे आपल्या मनास वाटते खरे, पण असे वाटणे हा वरवर पहाण्याचा परिणाम झाला कोणताही अभ्यास विषय वरवर करणे खरे नव्हे मनापासून व खोलात जाऊन विचार करणे श्रेयस्कर असते. अज्ञान व आकाश एकमेकांना पूरक असतात. आत्मज्ञानाने त्या मिश्रणाचा नाश होतो. म्हणून आकाश नाशवंत आहे. आकाश व ब्रम्हस्वरूप दोन्ही वरवर पाहता एकरूप आहेत. समासाच्या शेवटाकडे आपण आलो आहोत. तर संपूर्ण समासाचा विचार केला तर असे लक्षात येते की पंचमहाभूतांच्या पैकी आकाश आणि सत्य, ज्ञानमय व अनंत असणारेब् ब्रम्ह एक नाहीत. जसे की द्रष्टा वेगळा राहून द्रुष्यपणाने आकाश बघू शकतो. परंतु ब्रम्हस्वरूप पहाण्यासाठी द्रष्टयाला ब्रह्मस्वरूप व्हावे लागते. द्रुष्याच्या अनुभवात द्वेत ओलांडावे लागत नाही. तर ब्रम्हवस्तूच्या अनुभवात द्वैत ओलांडल्यावाचून चालत नाही. "ब्रम्हवित् ब्रम्हैव भवति" म्हणजेच ब्रम्हाची जाणीव असणारा ब्रम्हरूपच होतो. आणि ब्रम्ह स्वरूपाचे सविस्तर वर्णन आपल्याला समर्थ स्वतः च्या प्रचितीचे यथार्थ वर्णन करून आपल्याला ब्रम्हपदापर्यन्त पोहचवण्यासाठी सोपा मार्ग दाखवतात. आपल्याला ते पटवून देतात.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## आपल्याला सद्गुरूचा आधार वाटावा

आधुनिक केसरी

वेळप्रसंग येईल तसे वागणे उचित आहे, आणि त्याबद्दल मनावर परिणाम होऊ देऊ नये. परमात्म्याच्या चिंतनांत मन गुंतले असताना अवांतर गोष्टींचा परिणाम त्यावर होत नाही. जेवढे झेपेल तेवढेच करावे. अभ्यास करावा, पण काळजी न करता. सर्वस्वी भार भगवंतावर ठेवून निवांत असावे. आपल्या मनाचे स्वास्थ्य बिघडू न देता आनंदात रहावे. वृत्ती आवरून आवरत नाही; ती परमात्म्याकडे लावली म्हणजे आवरते. रामइच्छेने सर्व चालते असे लक्षात ठेवावे. संकट, आनंद, दोन्ही भगवंताला सांगावीत. ज्या स्थितीत भगवंताने ठेवले त्या स्थितीत समाधान मानावे.

अंतःकरणात सुप्त असलेले भगवंताचे प्रेम जागृत होण्यासाठी काही निमित्त लागते. तीर्थयात्रा आणि साधुसंतांची भेट हेच ते निमित्त होय. श्रीरामचंद्रही तीर्थयात्रेला जाऊन अनेक संतांची दर्शने घेऊन आले. संतांच्या अहंकाराला जिवंत राहताच येणार नाही, कारण ‘ परोपकार ’ करायला



लागणारा ‘ पर ’च ठिकाणावर नाही, तर मग ‘ दुसऱ्याकरिता मी काही केले ’ ही भावना व्हायला आधारच कुठे राहिला ? विषयाच्या लालसेने सत्समागम करणे हा खरा सत्समागम नव्हे. संत कधीकधी आपल्याला विषय देतात हे खरे, पण एकंदरीत आपल्याला विषयाचा वीट आणण्याचाच त्यांचा प्रयत्न असतो. संताच्या घरी नुसते पडून राहिल्यानेही शुद्ध भाव येईल. भगवंताच्या नामातच संतसंगती आहे, कारण नामाच्या मागे भगवंताचे अस्तित्व आहे. विषयाची ऊर्मी हे मायेचे स्मरण होय, आणि नामाचे स्मरण हे भगवंताचे स्मरण होय. तपश्चर्येचे सर्वांत शेवटचे फळ काही असेल तर परमेश्वराच्या ठिकाणी अनन्यभावाने शरण जाण्याची बुद्धी होय. ती बुद्धी आपल्याला झाली पाहिजे. एकदा शरण गेल्यावर आपण उरूच शकत नाही; त्यालाच शरणागती म्हणतात; आणि हीच परमार्थातली अत्यंत श्रेष्ठ गती आहे. आपण आपल्या सद्गुरूचे आहोत असे छातीठोकपणे सांगत चला. काही नाही केलेत तरी चालेल, पण आपले सद्गुरू आपल्या मागेपुढे आहेत अशी दृढ भावना असावी. मला सुखदुःख दोन्ही नाहीत. पण तुम्ही दुःखी झालात तर मला दुःख होते. तेव्हा तुम्ही मनाला दुःखच होऊ नये असे वागा. प्रपंची माणसाच्या दुःखाची मला पूर्ण जाणीव आहे. ती जाणीव ठेवूनच ‘ भगवंताचे नाम घ्या ’ असे मी सांगतो. जे मी सुरुवातीला सांगितले तेच शेवटी सांगतो : तुम्ही कसेही असा, पण भगवंताच्या नामाला सोडू नका.

**आजचे बोधवचन आहे –**
**१८८. तुम्ही नुसते नाम घ्या, बाकीचे सर्व मी करतो.**

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

(४) पाणी :- शीतलता आणि माधुर्य पाण्यापासून शिकलो ,साधकाने पाण्यासारखे शुद्ध, मधुरभाषी,आणि शीतल स्वभाव युक्त राहिले पाहिजे (५) अग्नी :- पावित्र्य हृदयात जर विवेकरुपी अग्नी पेटला तरच पाप वासना जाळून भस्म होईल. विवेकच अग्नी होय. कोणत्याही व्यक्तीचा दुर्व्यवहार, पापाची बाब, मनात ठेऊ नये. विवेकाग्नी ने ती जाळून टाकावी (६) चंद्रः- क्षमता. वृद्धी व ह्रास तर शरीराचे होतात. आत्म्याचे नाही संपत्तीत आपले भान विसरू नये आणि विपत्तीत दुःखी होऊ नये (७) सूर्य :- अभिमान रहित परोपकार. एकाच सूर्याची प्रतिबिंबे अनेक पात्रात अनेक दिसून येतात तसे आत्मा एकाच आहे पण नाना प्रकारच्या देहाच्या उपाधी मुळे तो अनेक स्वरूपाचा दिसून येतो मात्र तो उपाधी रहित आहे. (८) कबुतराच्या प्रसंगापासून :- कोणत्याही वस्तू वा व्यक्ती विषयी अतिशय आसक्ती असू नये. तो पत्नी व पुत्राच्या आसक्ती पाई मेला. दुसऱ्या करता ना रडता स्वता करता रडा
क्रमशः


विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

न कश्चिदपि जानाति किं कस्य श्वो भविष्यति । अतः श्वः करणीयानि कुर्यादद्यैव बुद्धिमान् ॥

सरलार्थ – उद्या कोणाचे काय होणार हे कोणालाही समजणे शक्य नाही. म्हणून शहाण्या माणसाने उद्यासाठी करायला ठेवलेली कामे आजच करून मोकळे व्हावे.

स्पष्टीकरण – माणसाच्या मनात जर एखादी चांगली गोष्ट करावी असे आले, तर त्याने ती उद्यावर न ठेवता आजच पार पाडावी. कारण उद्याचा भरवसा कोणी द्यावा ! 'उद्याचे काम आज करा अन् आजचे काम आत्ताच करा' अशी म्हण पडली आहे, तिचा मतलबी हाच आहे.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, ९ जुलै २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२९४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI DAINIK CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 09 JULY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | YEAR-02 ISSUE-294 RNI : MAHMAR/2021/82566 PAGE-16 PRICE-5

मुख्यमंत्री महोदय! प्रवाशांचे प्राण आता आपल्याच हाती!

प्रति,
मा. मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

विषयः खासगी किंवा सरकारी बसचे अपघात टळावेत म्हणून कठोर नियमांच्या अंमलबजावणीबाबत.

मा. महोदय,
नुकताच 1 जुलै 2023 रोजी विदर्भ ट्रॅव्हल्स या खासगी बसचा अपघात होऊन 25 प्रवासी होरपळून मृत्युमुखी पडले. त्यांच्या परिवाराला सरकारने एकूण पावणे दोन कोटी रुपयांची मदतही केली. ( त्यातून गेलेले जीव परत येणार नाहीत. )
परंतु अपघात रोखण्यासाठी व्यवस्थित निधीची तरतूद करून सुरक्षा नियम कडक केल्यास असे अनेक अपघात टळू शकतील. त्यासाठी काही उपाययोजना सुचवत आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांची दखल घेऊन कठोर अंमलबजावणी केल्यास भविष्यात अनेक नागरिकांचे जीव आपण वाचवू शकू. हा महाराष्ट्र पॅटर्न पुढे देशभरही लागू करता येईल.

सूचना खालीलप्रमाणे आहेत.

एसी स्लीपर कोचमधील कडेकोट रचनेमुळे अपघात झाल्यास बाहेर पडणे अशक्य असते. ही रचना बदलणे अनिवार्य करावे. अन्यथा या जीवघेण्या बसेस आधी बंद कराव्यात.
इतर बसेसमध्ये प्रवास सुरू करण्यापूर्वी प्रवाशांना पुढील सूचना तोंडी व मोबाइलवर लेखी देणे अनिवार्य करावे.

1. संकटकाळी उघडणारा दरवाजा कुठे आहे ? तो कसा उघडावा ? तो नीट उघडतो का याचे प्रात्यक्षिक दाखवावे.

2. बसच्या समोरच्या व मागच्या काचेसह सर्व काचा सहज काढता येतील अशा यंत्रणेत बसवाव्या.

3. तरीही काचा उघडल्या नाहीत तर काचा कशाने फोडाव्यात व कशा फोडाव्यात याचा व्हिडिओ दाखवावा.

4. बसमध्ये आग विझवणारी यंत्रणा कुठे आहे ? ती जागा दाखवावी. ती यंत्रणा कशी वापरावी ? याचाही व्हिडिओ दाखवावा.

5. बस पाण्यात पडण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रत्येक प्रवाशाला लाइफ जॅकेट त्याच्या सीटखाली असावे. ते वापरण्याची माहिती व्हिडिओ द्वारे प्रवासादरम्यान द्यावी.

6. प्रत्येक बसला जीपीएस ट्रॅकर लावणे अनिवार्य करावे.

7. प्रत्येक ठिकाणी मोबाइल नेटवर्क असेलच असे नाही. त्यामुळे प्रत्येक बसमध्ये एक सेटेलाइट फोन असणे अनिवार्य करावे.

8. ज्या मार्गावरून जात आहेत तेथे कुठे रुग्णालये आहेत ? कुठे पोलिस स्टेशन आहेत ? त्यांचे नंबर तिकीटावर छापावेत ? बसमध्ये लिहावेत.

9. संकटाच्या वेळी डायल करायचे इमर्जन्सी नंबर बसमध्ये ठळक लिहावेत. त्याविषयी प्रवाशांना माहिती द्यावी.

अपघात होऊ नये म्हणून काय करावे ?

1. चालकाच्या अवस्थेवर लक्ष ठेवणारा निरीक्षक नेमणे अनिवार्य करावे. हा निरीक्षक चालकासह प्रवाशांवरही लक्ष ठेवील. निरीक्षकास गणवेश असावा. प्रत्येक फेरीला निरीक्षक बदलावा. अपघाताची जबाबदारी चालक, निरीक्षक व बसमालकावर, महामंडळावर निश्चित करावी.

2. प्रत्येक ड्रायव्हरसमोर सीसीटीव्ही कॅमेरा लावून त्यावर बस कंपनीने प्रवास पूर्ण होईपर्यंत कंट्रोल रूममधून लक्ष ठेवावे. त्यासाठी वेगळा निरीक्षक नेमावा. त्याने बसमधील निरीक्षकाशी कंट्रोल रूमवरून दर तासाला संपर्क ठेवणे अनिवार्य करावे.

3. अपघातात डीझेलची टाकी फुटू नये किंवा इंधनगळती होऊ नये म्हणून काही संशोधन झाले असेल तर त्याचा वापर करणे अनिवार्य करावे.

4. बसमध्ये आग लागल्यास स्वयंचलित किंवा मानवी अग्निशमन यंत्रणा अनिवार्य करावी. इंधनाची आग पाण्याने विझत नाही. त्यासाठी अग्निशामक रसायनांचाच वापर करणे अनिवार्य करावे.

5. प्रत्येक बससोबत सुरक्षेची काळजी घेणारे प्रशिक्षित किमान दोन लोक पाठवावेत. त्यांच्याकडे परिसरातील सर्व आणीबाणीच्या सेवांचे नंबर असावेत. त्यांना आग विझवण्याचे व इतर सुरक्षा प्रशिक्षण कठोरपणे दिलेले असावे.

मरण पावलेल्या प्रत्येकासाठी सरकार 5 ते 7 लाख रुपये देते. 25 लोक मरण पावले तर पावणे दोन कोटी रुपये होतात. यातले अर्धे पैसे जरी कडेकोट सुरक्षेवर खर्च केले तर अपघात कमी होतील. जीव वाचतील.
यापुढे कुठल्याही बसमध्ये मेंढरासारखे लोक भरून असेच मरायला सोडून देऊ दिले जाऊ नयेत याची दक्षता आपण शासन म्हणून घेऊ शकता. या प्रवाशांचे प्राण वाचवणे आपल्याच हाती आहे. या ऐतिहासिक कार्यासाठी आपली नोंद व्हावी हीच सदिच्छा. धन्यवाद.

- विनोद जैतमहाल
जालना, महाराष्ट्र.
9823028332.

# अहंकार



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**रणभूमीवर श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली. तेव्हा त्यांनी सांगितलं हे पार्था, दंभ, उर्मटपणा, अभिमान आणि अज्ञान हे असुरी प्रकृती घेऊन जन्मलेल्या लोकांचे गुण आहेत आणि दैवी गुण मोक्षदायक असतात तर आसुरी गुण बंधनकारक असतात म्हणून हे पांडवा तू चिंता करू नकोस कारण तू दैवी गुण घेऊन जन्मलेला आहेस. इतक्या साध्या आणि सोप्या भाषेत श्रीकृष्णाने अर्जुनाला समजावलं आणि तेव्हा त्यांनी सांगितलं की अहंकार हा असुरी प्रवृत्तीकडे नेतो आणि अहंकार सोडला तर तुम्ही नक्कीच मोक्षाच्या मार्गाला जाऊ शकतात. पण मुळात मान, अभिमान, स्वाभिमान, अहंकार यातल्या रेषा इतक्या पुसट आहेत की त्या चटकन स्वतःलाही दिसतच नाहीत. त्या एकमेकांमध्ये इतक्या सरमिसळ झालेल्या असतात की स्वाभिमान हा कधी अहंकारात बदलला जातो हेही समजेनासे होते.**

एक छोटेसे उदाहरण म्हणजे तीन-चार दिवस मी गावाला गेलेले असताना चार दिवस माझ्या मावशींनी घर अतिशय व्यवस्थित सांभाळले. सकाळ संध्याकाळ स्वच्छता केली. लाईट लावून जाणे ,सकाळी येऊन बंद करणे. स्वतःहून त्यांनी स्वच्छतेची बरीच कामे घरात केली. आल्यानंतर मी त्यांना म्हटले मावशी धन्यवाद!! माझे घर तुम्ही छान सांभाळले .स्वच्छ ठेवले .तशा त्या पटकन म्हणाल्या माझे घर नाही का हे.... मग धन्यवाद कशाचे....? एका क्षणात एका निरक्षर बाईने माझा अहंकार उतरवून ठेवला. माझ घर आहे हा अहंकार कळत नकळत इतका भिनलेला होता की त्यांची भावना माझ्यापर्यंत त्यांनी सांगितल्याशिवाय पोहोचू शकली नाही. अहंकाराची व्याख्या इतकी साधी असते पण अहंकार मात्र मोठा असतो आणि हाच अहं माणसाला त्रास देत असतो.

**अखंड जयाला देवाचा शेजार**
**कारे अहंकार नाही गेला ।।**

या ओळी आहेत मराठीतल्या पहिल्या कवयत्री म्हणून आजही ज्यांचा नामोल्लेख होतो त्या मुक्ताबाईंच्या. मुक्ताई ज्ञानेश्वरांची बहीण. नामदेव विठ्ठलाचे परमभक्त. एकदा ते ज्ञानदेवांना भेटायला गेले असताना ज्ञानेश्वरांनी निवृत्ती सह नामदेवांना वंदन केले.
नामदेवांनी मात्र त्यांना उलट नमस्कार केला नाही.

**उठले ज्ञानेश्वर केले ते वंदन ।**
**मस्तकी चरण नमस्कारीले ॥१॥**
**नामा म्हणे आम्हा वडील अधिकारू ।**
**यासाठी नमस्कारू योग्य आहे ॥२॥**
**आम्ही देवापाशी असतो सर्वकाळ ।**
**येऊन सकळ वंदिताती ॥३॥ना.गा.९४**

त्यांना वाटले मी ज्ञानेश्वरांना वडील आहे म्हणजे मी ज्ञानेश्वरांपेक्षा मोठा आहे म्हणून मी नमस्कारा योग्य आहे.
आणि मी विठ्ठला जवळ सतत असतो. विठ्ठल माझ्याशी बोलतात माझ्या हातून जेवण करतात आणि म्हणून सगळेजण माझ्यापुढे नतमस्तक होतात.
मुक्ताबाईंनी मात्र त्यांचा अहंकार ओळखला आणि त्यांना नमस्कार केला नाही. दर्शन घेतले नाही उलट अधिकारवाणीने अत्यंत जळजळीत शब्दांत नामदेवांची कानउघाडणी केली आणि म्हटले

**अखंड जयाला देवाचा शेजार'**
**कारे अहंकार नाही गेला ।।**

त्यांना आत्म चैतन्याचा बोध देण्याच्या दृष्टीने मग असे ठरते की गोरोबा काका हे वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध आहेत. त्यांच्या हातामध्ये स्वानुभवाचे थापटणे आहे मग त्यांनाच तपासू द्या कोणते मडके पक्के आहे आणि कोणते कच्चे. गोरोबाकाका सगळ्यांची परीक्षा करतात. नामदेव महाराजांची पण परीक्षा करतात आणि म्हणतात

**गोरा म्हण कोरा राहिला गे बाई**
**शून्य भर नाही भाजिले कोठे....ना.गा.११२**

या कान उघडणी नंतर मात्र नामदेवरायांचा अहंकार निवतो आणि मग ते ज्ञानेश्वर आणि भावंडांच्या सान्निध्यातराहूलागतात.
याच नामदेवांचे प्रथम शिष्य म्हणून ज्यांना ओळखले जाते ते संत परिसा भागवत हे देखील सुरुवातीला स्वतःच्या अहंकारांमधे लिन असतात. परंतु पुढे संत नामदेवांच्या संयमी आणि शांत स्वभावामुळे



आणि मुख्यतः त्यांना जो अनुभव येतो की नामदेव महाराजांच्या हातात पडलेल्या प्रत्येक दगड परीस होतो त्यामुळे परिसा भागवतांचा अहंकार गळून पडतो आणि ते नामदेवांचे भक्त बनतात. कारण संत नामदेव हे शिंपी आणि परिसा भागवत हे उच्च मानल्या गेलेल्या ब्राम्हण समाजातील. त्यामुळे एका ब्राह्मणाने एका शिंप्याकडून शिष्यत्व पत्करावे याचे आश्चर्य तत्कालीन समाजाला वाटणं सहाजिकच होतं. परंतु नामदेवांनी त्यांच्या अहंकाराचे हरण केल्यामुळे हा चमत्कार घडलेला होता म्हणून परिसा भागवत म्हणतात...

**तू शिंपी न माना**
**आम्ही उत्तम याती,**
**वाया अहंमती पडलो देखा।।**

आठ वर्षाच्या मुक्ताईने चौदाशे वर्षाच्या चांगदेवांचे गर्वहरण केले तेव्हा कृतार्थतेने चांगदेव महाराज म्हणतात...

**राउळीचे कर चुकले जाणं ।**
**गीवसिताती साहीजणे वेळोवेळी ॥१॥**
**करी कर धरीयला मुष्टी ।**
**करें समाविले आपल्या दृष्टी ॥२॥**
**मुक्ताई करे लेइले अंजन ।**
**चांगया निधान उपदेशिले ॥३॥**

योगी चांगदेव यांनी गुरु केलेला नसल्यामुळे त्यांना ईश्वर दर्शन झालेले नव्हते. मात्र मुक्ताईने त्यांना पासष्टी चा अर्थ उलगडुन दाखविला. मुक्ताबाई यांच्या अनुग्रहाने चांगदेवांना आत्म रुपाची प्राप्ती झाली.
नामदेव महाराजांना सद्गुरू कृपा झाल्यानंतर मात्र ते म्हणतात,

**अहंकाराचा वारा**
**न लागो राजसा**
**माझिया विष्णुदासा, भाविकांसी ।।**

शरीरात साखर जितका अविभाज्य घटक असतो तितकाच अहंकार हा माणसाचा एक अविभक्त भाग आहे. माणसाच्या शरीराला एका मर्यादेपर्यंत साखरेची गरज असते पण तिचे प्रमाण वाढले तर अनारोग्य निर्माण होते तसेच अहंकाराचे आहे.
तो मर्यादित असतो तोपर्यंत तो स्वाभिमान असतो जगण्यासाठी अत्यावश्यक असतो पण तो कमी झाला तर लाचारी निर्माण होते आणि प्रमाणापेक्षा जास्त झाला की अहंकाराचे रूप घेते आणि मग मात्र सारेच बिनसत जाते.
अहं निघून गेला तर कशी अवस्था प्राप्त होते हे सांगताना संत वेणास्वामी म्हणतात

**अहं ब्रह्म उपदेशिले**
**अहं गेले ब्रह्मची ठेले ॥**

सद्गुरूंच्या उपदेशानंतर अहंपणा निघून गेला आणि फक्त ब्रह्म उरले. आणि म्हणूनच म्हटले आहे.
अहंकाराचा वारा न लागो राजसा राम कृष्ण हरि


# देशीयता आणि राष्ट्रवाद



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**सामाजिक विचारव्यूह आणि व्यक्तीची स्वतःची मते यात भिन्नता असू शकते. कारण व्यक्ती ज्या परिसरात राहतो, सांस्कृतिक वातावरणात वाढतो, त्याच्या घरी-आजूबाजूला जसे भाषिक आणि इतर व्यवहार होत असतात त्या एकूण वातावरणाचा, सामाजिक-मानसिक संबंधाचा परिणाम अटळ असतो. हा इष्ट-अनिष्ट परिणाम व्यक्ती आयुष्यभर वागवतो. त्यातील कोणत्या गुणांची वाढ करायची आणि कशाचा त्याग करायचा हे सर्व नंतर. पण जे त्याच्या मूलस्थानी बिंबले जाते ती देशीयता होय. यात जसे राष्ट्रप्रेम असेल तसे अनेक सामाजिक दुर्गुण देखील आले.**



## क्षितिजापल्याड

देशीयता ही संकल्पना समूहाच्या सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याला मुभा देणारी आहे. कारण देशातील विविध समूह आपापली आस्था, श्रद्धा, अंधश्रद्धा, अश्रद्धा, व्रतवैकल्य, विधिनिषेध, या सर्वांतून निर्माण होणारा लोकाचार, सांस्कृतिक-भाषिक परीघ सांभाळण्याचा अटोकाट प्रयत्न करत असतात. त्यांच्या या लोकसमजुती जपणे हेच त्यांच्यासाठी राष्ट्रवाद जोपासणे असते. कारण दळणवळणाची आणि वाहतुकीची साधने प्रगत होण्यापूर्वी विशिष्ट भूप्रदेशातच वावर असल्यामुळे इतर भूभागाशी फार कमी संबंध येत असे. त्यामुळे त्यांच्यासाठी राष्ट्रवादी असणे म्हणजे आपले स्वत्व सांभाळणे होय. परंतु अलीकडच्या काळातील पाश्चात्य धर्तीवरचा राष्ट्रवाद समूहाच्या सपाटीकरणावर भर देणारा असल्याने पारंपरिक मन भांबावल्यागत होणे साहजिक आहे. देशातील विविध मानवी समूहांच्या परस्परांना छेदणार नाहीत अशा लोकभावनांच्या माध्यमातून राष्ट्रवादाची बीजे रुजवावी लागतील.

कारण राष्ट्रवाद हे एक मूल्य आहे तसेच देशीयतेत अनेक मूल्ये अध्याहृत आहेत. परस्पर सामंजस्याची मूल्ये एकत्र करून आपणांस पुढे चालावे लागणार आहे. यासाठी आपल्याकडे एक आदर्श संहिता आपल्या पूर्वजांनी निर्माण करून ठेवली आणि त्या संहितेचे नाव आहे राज्यघटना. संविधानकेंद्री राष्ट्रवाद हा सर्वांना सामावून घेऊन पुढे जाण्यास सक्षम आहे. भारतीय संविधान आपल्या देशीयतेचा अत्युत्तम नमुना आहे. कारण देशीयता ही एक गुणात्मक संकल्पना असून ती पुनरुज्जीवित होण्यावर भर देणारी असते. जी काही चांगली मानवी मूल्ये आहेत ती आपल्या संविधानात समाविष्ट केलेली आहेत. कालपरत्वे त्यात भर पडत जाईल. कारण संविधानाचा गाभा गुणात्मक आहे. आपल्या संविधानात अनेक राष्ट्रांच्या चांगल्या कलमांचा अंतर्भाव असला तरी मूळ गाभा देशी आहे. त्यामुळे देशीयता आणि राष्ट्रवादाची सांगड घालताना दोन्हीतील अनुबंध हा सविधांकेंद्री असला तरच ही मूल्ये सर्वग्राह्य होऊ शकतात.
हे करत असताना आपणांस एका गोष्टीला नक्कीच सामोरे जावे लागणार आहे. ती बाब जेवढी तात्त्विक आहे तेवढीच व्यावहारिक देखील आहे. ती म्हणजे देशीयता ही जुन्या मूल्यांचे पुनरुज्जीवन करण्यावर भर देणारी आहे आणि राज्यघटना ही राज्य कसे चालावे आणि चालवावे याचा वस्तुपाठ होय. व्यक्तिगत मानसिकता आणि विचारव्यूह याच्याशी राज्यघटनेचा काहीएक संबंध नाही. जेव्हा परस्पर व्यवहार होतो तिथपासून ती कार्यान्वित होते. कधी कधी हा व्यवहार इतक्या बेगडीपणाचा असतो की साध्याशा ओरखड्याने खरा चेहरा समोर येतो. आजपर्यंत भारतात हेच तर होत आले आहे. जगातील सर्वोत्तम संहिता आमच्याकडे असताना आमच्यात परस्पर द्वेष कसा असू शकतो? ह्या प्रश्नाला घेऊन आम्ही कधी विचारच केला नाही. जेवढी अधिकाधिक लोकसंख्या शिक्षित होत गेली तेवढे आम्ही अधिकच संकुचित होत गेलो. हे व्यस्त प्रमाण समजून घ्यायचे असेल तर आपणास देशीयता आणि राष्ट्रवादाची नव्याने मांडणी करावी लागणार आहे. काही तथाकथित विचारवंत या दोन्ही संकल्पना फालतू आहेत म्हणून बोळवण करतात; परंतु कोंबडा झाकून ठेवल्याने दिवस उगवणार नाही का? दुर्लक्ष केल्याने प्रश्न वाढतात, चिघळतात.

आजपर्यंत तेच होत आले आहे. देशीयता पारंपरिक मानसिकता जोपासते म्हणून दुर्लक्ष करायचे आणि राष्ट्रवाद विशिष्ट गटाचे हितरक्षण करतो म्हणून त्याचाही विचार करायचा नाही. मग आपण जी राज्यघटना स्वीकारली तिची अंमलबजावणी कशी करणार? राज्यघटना दोन प्रकारची मूल्ये प्रक्षेपित करते. जी तात्कालिक आहेत ती राज्य चालविण्याच्या कामी येतात, त्यात बदल होऊ शकतात. परंतु जी मूल्यव्यवस्था राज्यघटनेचा गाभा आहेत ती शाश्वत मूल्ये घेऊन आपणांस समाजात बदल घडवून आणावे लागतील. व्यक्तीगत मानसिकता बदलण्याच्या कामी शाश्वत मूल्यांचे साह्य घेतल्यास देशीयता आणि राष्ट्रवाद यांची सांगड घातली जाऊ शकते. हे करत असताना आपण शिक्षेचा आधार घेऊ शकत नाही तर या कामी शिक्षणाचा, उपदेशाचा, प्रबोधनाचा आधार घेणे जास्त संयुक्तिक राहील. कारण व्यक्तीने विचार कसा करावा यासाठी तुम्ही नियम तयार करू शकत नाही. विचाराच्या अमंलबजावणीपासून कायद्याचे राज्य हस्तक्षेप करते. आम्ही राज्यघटनेच्या अमंलबजावणीसाठी जेवढे प्रयत्नशील असतो त्याच्या दशांश टक्के जरी संविधानिक मूल्यांच्या प्रबोधनाची सार्वत्रिकता यावर भर दिला असता तर आजच्या भारताचे चित्र काही वेगळेच राहिले असते. जगात अनेक शास्त्र आहेत, त्यापैकीच लोकवंचनाशास्त्र हे राज्यशास्त्रापेक्षाही राजकारणी लोकांना अधिक प्रिय असल्याने त्यांच्याकडून संविधानिक मूल्यांच्या प्रबोधनाची अपेक्षा ठेवणे गैरलागू होईल. भारतातील वैविध्यपूर्ण समूह संस्कृतींना राष्ट्रवादाचे बाळकडू द्यायचे तर पूर्वतयार आयात औषधी उपयोगाची नसून इथल्या मातीतून

सर्वांच्या गळी उतरेल असा राष्ट्रवाद पुढे आणला पाहिजे. ज्याचे स्वरूप देशी राष्ट्रवादाचे असेल. स्वजातीय, स्वधर्मीय भावना टोकदार असण्याच्या या काळात हे अवघड आहे, परंतु अशक्य मात्र नाही. यासाठी आपणास जाणीवपूर्वक किमान अजून दोन पिढ्यांचे अंतर पार होईल इतका प्रयत्न करावा लागणार आहे. तेव्हा कोठे किमान पातळीवर आपण पोहचू शकू. स्वातंत्र्यपूर्व काळात जशी प्रबोधनकारांची फळी तयार झाली होती तिची आज आवश्यकता आहे. कारण एकवेळ स्वातंत्र्य मिळवणे सोपे असते, पण मिळवलेले स्वातंत्र्य टिकवून ठेवणे फार कठीण असते. आधुनिक चंगळवादी व्यवस्थेत तर अधिकच जिकिरीचे झाले आहे. कारण वरकरणी आपण स्वतंत्र आहोत असे भासत असले तरी आपले मन आणि बुद्धी पूर्णतः आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या कह्यात गेली आहे आणि ह्याच्या सोडवणुकीचे मार्ग अत्यंत क्लिष्ट आहेत. समाजचिंतकानी पुढे येऊन यावर मार्ग शोधला पाहिजे. हे सर्व कुचकामी आहे त्यामुळे याकडे लक्ष देण्यात मतलब नाही असे म्हणणे आणि मी म्हणतो तेच खरे असेही म्हणणे, ही दोन्ही टोके टाळून मध्यममार्ग काढल्यास देशीयता आणि राष्ट्रवाद याची सांगड घालता येईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# फौजदारपदी निवड झाल्याबद्दल पूजा चव्हाण हिचा भव्य सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलतानपूर येथील पुजा आकाश चव्हाण ही २०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन पोलिस उपनिरीक्षकपदी निवड झाली आहे तिच्या या निवडीबद्दल सुलतानपूर ग्रामस्थांच्या वतीने तिचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिक शिक्षण विभागाचे शिक्षण उप संचालक डॉ बी.बी.चव्हाणहे होते, तर प्रमुख पाहुणे राष्ट्रवादीचे आमदार सतीश चव्हाण, बी.आर.एस.चे प्रमुख संतोष माने, खुलताबाद कॉंग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष अनिल पाटील सुलतानपूरकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष विलास चव्हाण, शिवसेनेचे नेते शंकरराव अधाने, भाजपाचे तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे , महेश उबाळे,मिठू महालकर, पुजा काळे, ग्रामपंचायत सदस्य संजय मोरे, जगन्नाथ चव्हाण, गुलाब काळे, रामलाल निंभोरे, शिवसेनेचे प्रवीण इंगळे, कविता काळे (विक्री कर अधिकारी) शिवसेनेचे सतीश शुक्ला, , निवृत्त पी.एस.आय, देविदास कोतकर, निवृत्त पी.एस. आय जगदीश जैस्वाल, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन मनोहर चव्हाण हे होते.

मान्यवरांच्या हस्ते व सत्कार मुर्तीच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करून



कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

सत्काराला उत्तर देतांना पुजा आकाश चव्हाण म्हणाल्या की, माझी अत्यंत हालाक्याच्या परिस्थिती शिक्षण घेऊन माझ्या या यशामध्ये जेवढा घरच्यांचा वाटा आहे त्याहून जास्त माझ्या सासुरवाडीकडील मंडळींनी मला सर्वतोपरी सहकार्य करून या पदापर्यंत पोहोचवण्यास मदत केली. त्यांचेही मनःपूर्वक आभार व्यक्त करते, मी ही एक गरीब कुटुंबातील मुलगी असून माझे पितृत्व लहान पणी हरपले होते ,आई अंगणवाडी सेविका आहे. परिस्थिती खुप गंभीर होती.

लग्न झाल्यानंतर माझ्या पतीने मला पुढील शिक्षणाची संधी दिली. पहिल्या वेळेस यश आले नाही. पण दुसऱ्यांदा यश मिळाले. या यशा मागे जिद्द, चिकाटी व नियोजन केलेतर यश हमखास यश मिळते. कारण बारा-बारा तास अभ्यास करायचे. विद्यार्थी मित्रांनो नियोजन बध्द अभ्यास करा, अवांतर वाचन करा, वर्तमानपत्र दररोज वाचा, देशातील घडामोडी ची माहिती घ्या, अभ्यासाचे वातावरण तयार करा, नक्कीच यश तुमच्या पदरी पडले. अपयशाने खचून जाऊ नका, आपण प्रयत्न केल्यास यश आपल्या पदरी पडते मला देखील पहिल्या प्रयत्न अपयश आले होते पण जिद्दीने अभ्यास केला व यश संपादन केले. या यशामागे आई व कुटुंबाचा पाठिंबा होता. खुप अभ्यास करा, आई-वडिलांचे नाव मोठे करा असे मौलिक सल्लाही त्यांनी दिला. या कार्यक्रमाला कविता काळे, पुजा काळे, प्रवीण काळे, भास्कर चव्हाण, अमोल चव्हाण, पांडुरंग पाटील चव्हाण, मनोहर चव्हाण, शिवाजीराव चव्हाण, सुनील चव्हाण, प्रकाश चव्हाण, अनिल चव्हाण, पवन चव्हाण, रघुनाथ चव्हाण, रावसाहेब चव्हाण, नानासाहेब चव्हाण, रमेश चव्हाण भाऊसाहेब चव्हाण, गणेश चव्हाण, प्रकाश श्रीखंडे, बाळू श्रीखंडे , वसंत चव्हाण, दिनकर वेताळ, मुख्याध्यापक बबनराव चोपडे, रामकृष्ण अधाने, रोहीदास जवरे, बाळासाहेब काळे रहाणे सर,लगडसर या सोहळ्याचे आयोजन यांच्यासह गावकऱ्यांनी केले होते तर. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन संजय मोरे यांनी केले.

# महाराष्ट्रात कोठेही मिळणार स्वस्त रेशन : प्रदीप चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा, जरंडी, बनोटी, जामठी व परिसरातील नागरिकांनी आता



महाराष्ट्रात कोठेही कामाला गेले तर मिळणार रेशन मोदी सरकारचा महत्त्व पूर्ण निर्णय भाजापाचे प्रदीप चव्हाण सोयगाव तालुका उपाध्यक्ष केंद्र सरकारने गरीब व सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त धान्य सहज उपलब्ध व्हावे यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे. आता नागरिकांना स्वस्त धान्य मिळवण्यात येत असलेली अडचण दूर होणार आहे. शासनाने वन नेशन वन रेशन या योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

बऱ्याचदा राज्यातील स्थलांतरीत कामगार, ऊसतोड मजूर, आदीवासी व इतरांना अनेकदा स्थलांतर करावे लागते, मात्र स्थलांतर केल्यावर त्यांना इतर ठिकाणी स्वस्त धान्य योजनेचा गरीबांना लाभ मिळत नाही, त्यामुळे त्यांना नाईलाजाने चढ्या दराने बाजारातून धान्य घ्यावे लागते. मात्र आता केंद्र शासनाने वन नेशन वन रेशन कार्ड ही योजना सुरू केलेली असून त्याची अंमलबजणी राज्यातही करण्याचा महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला आहे, या निर्णयामुळे राज्यातील विविध घटकातील नागरिकांना याचा मोठा फायदा होणार असून नागरिकांना इतर ठिकाणीही सहज स्वस्त धान्य उपलब्ध होणार आहे.राष्ट्रीय जन सुरक्षा पाणनताल लाना जाता शिधा पत्रिकेवरील 12 अंकी क्रमांकाचा वापर करून देशभरात कोठेही स्वस्त धान्य घेता येणार आहे. म्हणजेच ज्या व्यक्तीकडे शिधापत्रिका आहे तो व्यक्ती देशातील कोणत्याही राज्यात गेल्यास तेथे त्याला राज्यात ज्या प्रमाणे स्वस्त धान्य मिळते त्याच प्रमाणे तेथेही स्वस्त धान्य मिळणार आहे.सदरील लाभ घेण्यासाठी शिधापत्रिकेतील कमीत कमी एक लाभार्थ्यांच्या आधार क्रमांक शिधापत्रिके सोबत संलग्न असावा. लाभार्थ्याकडे एकापेक्षा जास्त शिधापत्रिका नसाव्यात. सदरील लाभार्थ्याला ई-पॉस मशीनवर बायोमॅट्रीक आधार प्रमाणीकरण यशस्वी झाल्यानंतरच एक देश एक शिधापत्रिका योजने अंतर्गत अन्नधान्याचा लाभ घेता येईल. या निर्णयामुळे देशभरातील रेशनकार्ड धारकांना आता कोठेही स्वस्त धान्य मिळणे सोपे होणार आहे. त्यामुळे गरीब, गरजू व सर्वसामान्य नागरिकांना याचा मोठा फायदा होणार आहे.अशी माहिती भाजपचे प्रदिप चव्हाण नादातांडा यांनी बोलताना दिली.

# सिन्नर तालुका दरोड्यांनी हादरला

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सिन्नर तालुक्यातील दापूर आणि दोडी अशा दोन ठिकाणी सशस्त्र दरोडा टाकण्यात आला. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास टाकण्यात आलेल्या या दरोड्यात सुमारे सव्वा दोन लाखांहून अधिक ऐवज लंपास करण्यात आला. या प्रकरणी वावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दापूर रस्त्यालगत असलेल्या काकड वस्तीवर शुक्रवारी पहाटे चारच्या सुमारास सुनील आव्हाड (४२) आणि त्यांच्या पत्नी सविता आव्हाड (३७), लहान मुलगा, आई किसनाबाई आव्हाड (६५) यांच्यावर हल्ला करण्यात आला. किसनाबाई यांच्या गळ्यातील ताईत आणि सोन्याचे मनी काढून त्यांना दमदाटी करुन गप्प बसविण्यात आले. त्यानंतर दरोडेखोरांनी सुनील यांच्या कानाजवळ धारदार शस्त्राने वार केला. सुनील यांच्या मदतीला त्यांची पत्नी सविता धावली असता त्यांच्या तोंडाला रुमाल लावून आरडाओरड केल्यास मारून टाकण्याची धमकी दिली. त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र, सोनसाखळी, जोडवे व इतर ऐवज हिसकाविण्यात आला. कानातील अलंकार ओरबाडल्याने त्यांचा कान फाटला.

# कामगारांच्या विविध मागण्यांसाठी हिवाळी अधिवेशन काळात नागपूरला मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**विठ्ठल ममताबादे**

**उरण :** भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश, विदर्भ प्रदेश आणि गोवा या तीन प्रांताची बैठक उरण तालुक्यातील जे एन. पी टी मध्ये दि 8 जुलै 2023 पासून सुरु झाली आहे.ही बैठक दोन दिवसीय असून या बैठकीस भारतीय मजदूर संघाचे अखिल भारतीय महामंत्री रवींद हिमते, केंद्रिय उपाध्यक्षा निता चोबे, क्षेत्रीय संघटन मंत्री सी व्ही राजेश, अखिल भारतीय पोर्ट ट्रस्ट प्रभारी अण्णा धुमाळ व तीनही प्रांताचे अध्यक्ष जनरल सेक्रेटरी, संघटन मंत्री, कोषाध्यक्ष व केंद्रीय फेडरेशन चे प्रभारी उपस्थित होते . सुरवातीस भारतीय मजदुर संघ रायगड जिल्हा व जे. एन. पी. टी कर्मचारी संघटनेच्या वतीने सर्व मान्यवरांचे शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उद्घाटन सत्रात अखिल भारतीय महामंत्री रवींद्र हिमते यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात संघ प्रचारक सुमत आमसेकर यांचे मार्गदर्शन झाले. या बैठकीत भारतीय मजदूर संघाच्या तिन्ही प्रांताच्या कामाचा आढावा घेण्यात येणार आहे तसेच पुढील कामाचे नियोजन करण्यात येणार आहे. अशी माहिती अखिल भारतीय पोर्ट डॉक मजदूर महासंघाचे महामंत्री सुरेश पाटील व क्षेत्रीय संघटन मंत्री सी.व्ही.राजेश यांनी दिली. बैठक यशस्वी करण्यासाठी जे एन पी टी मधील संघटनेचे



सुरेश पाटील, सुधीर घरत, रवी पाटील, जनार्दन बंडा , जितेंद्र घरत, दिनेश साखरे, मंगेश पवार, केसरीनाथ म्हात्रे, नारायण धुमाळ, राजू म्हात्रे रायगड जिल्हा ज्येष्ठ पदाधिकारी रमेश गोविलकर यांनी परिश्रम घेतले.या बैठकीत कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी व कामगारांचे हक्क व अधिकार अबाधित ठेवण्यासाठी हिवाळी अधिवेशन काळात नागपूरला भारतीय मजदूर संघातर्फे विशाल अशा मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सुरेश पाटील यांनी यावेळी दिली.




महाराष्ट्र Business Katta












# आपे तरे त्याकी कोण बराई । औरनकुं भलो नाम घराई ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**सतराव्या शतकात महाराष्ट्राची काय अवस्था होती? कोणते शासन आणि समाजात काय काय स्थित्यंतरे होत होती? याचे बारकाईने अवलोकन केल्या नंतर बऱ्याच गोष्टी दृगोचर होतात. विविध क्षेत्रात होणाऱ्या घडामोडी आणि त्यावर राजकीय हलचालींचा परिणाम होतंच असतो. एकीकडे आदिलशाही, निजामशाही आणि मुघलांनी सर्वच क्षेत्रात आणि विशेषतः धार्मिक क्षेत्रात प्रचंड उच्छाद मांडला असतांना दुसरीकडे महाराष्ट्रात शेकडो वर्षांपासून चालत आलेली वारकरी सांप्रदायाची परंपरा अबाधित ठेवणे मोठे जिकरीचे काम होते. तिसरीकडे कर्मकांड, थोतांड, भोंदुगिरी आणि वर्णव्यवस्थेने समाजाचा गाभा खिळखिळा करून टाकला होता.**

देव आणि धर्माची प्रचंड भीती रुजवली जात होती. सातत्याने लोकांना 'देव म्हणजे काहीतरी मागणारा, त्याला काहीतरी दिल्याशिवाय पावन न होणारा' असा अर्थ रुजविला होता. त्यात तुकाराम महाराजांनी आपल्या घरातील वारकरी परंपरा आणि भूतकाळातील संतांचे लेखन आणि त्यातूनच त्यांचे जीवन तुकोबांना बऱ्यापैकी कळले होते. असे असतांना त्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल होत गेले. आई-वडील जाणे, एक भाऊ घरातून निघून जाणे. परिणामी त्यांच्यावर अकाली कारभार येवून पडला. त्यात दुष्काळ, पत्नी-मुलाचे निधन असे एकावर एक आघात कोसळले! ही संकटांची मालिका सुरु असतांना घरातील श्री विठ्ठल-रुक्मिणी पूजा करतांना आणि वारकरी वाङ्मय वाचनात आले. वाचता वाचता हळू हळू ते एकतारीवर भजन करू लागले. यात त्यांचे मन शांत व्हायचे. भजन सर्वच दुःखांना वेगळे करू लागले. तेवढ्या काळापुरते तुकोबा संसारातील सर्व सुख-दुःखं पार विसरून जाऊ लागले. याचा परिपाक म्हणजे तुकोबा जीवनाचे सापेक्ष चिंतन करू लागले. यातूनच त्यांनी संत नामदेवांपासून ते संत एकनाथांपर्यंत घरातील सर्व प्रकारचे लेखन वाचले असावे यात तिळमात्र शंका नाही. हे वाचन केल्यानंतर त्यांच्याही मनाला लिहिण्याची ओढ लागली असावी. संतांचे अभंग त्यांना आपल्याकडे ओढायला लागले. तिकडे भजनासाठी एकतारी वाट पहायला लागली. असे असतांना संसारातील संकटांची मालिकाही अखंडपणे सुरूच होती. त्या संकटांना तूकोबांनी जुमानले नाही. आता ते कधी भंडारा तर कधी भामनाथाच्या डोंगरावर जाऊन भजन करू लागले. संतांची भजने म्हणता म्हणता त्यांनाही अभंग सुचू लागले. मृग नक्षत्राच्या पहिल्या सरींनी कोकिळाला कंठ फुटावा तसं तुकोबांना अभंग सुचायला लागले. हळूहळू त्यांच्या भजनाचे कीर्तनात रुपांतर झाले. दुसरीकडे धर्ममार्तंडांना ही खबर पोहोचली. त्यांनी तुकोबांना क्षुद्र म्हणून कीर्तन करणे आणि अभंग लिहायला मज्जाव केला. तुकोबा मात्र आपल्या कार्यावर ठाम राहिले. तुकोबांच्या लेखन वाङ्मयातील कळस म्हणजे तुकोबाराय संत कबिरांसारखे रोखठोक दोहे आणि अभंग लिहू लागले. ही बाब तत्कालीन उच्चवर्णीयांच्या अस्तित्वाला छेद देणारी ठरली. त्यांना हा मोठा अपमान वाटू लागला. जगद्गुरू तुकोबाराय संत कबिरांची परंपरा मोठ्या ताकदीने चालवतांना

**तुकारामनीती**
**भाग -61**

**आपे तरे त्याकी कोण बराई । औरनकुं भलो नाम घराई ॥ध्रु.॥**
**काहे भूमि इतना भार राखे । दुभत धेनु नहीं दुध चाखे ॥१॥**
**बरसतें मेघ फलतेंहें बिरखा । कोन काम अपनी उन्होति रखा ॥२॥**
**काहे चंदा सुरज खावे फेरा । खिन एक बैठन पावत घेरा ॥३॥**
**काहे परिस कंचन करे धातु । नहीं मोल तुटत पावत घातु ॥४॥**
**कहे तुका उपकार हि काज । सब कररहिया रघुराज ॥५॥**
**(११६१)**

हा एक हिंदी अभंग लिहून जातात. सतराव्या शतकात अस्खलित मराठीत जसा लिहावा तसा हिंदीत अभंग तुकोबाराय लिहितात. हे फार मोठे कौतुक आणि आश्चर्य म्हणावे लागेल! यात तुकोबाराय स्वार्थी माणसांना सणसणीत चपराक देतात. जे फक्त स्वतःच तरून जातात त्याना कोण योग्य म्हणणार ? जे इतरांसाठी काहीच करत नाहीत ते इथे येवून काय कामाचे ? पृथ्वी एवढे ओझं वाहते, गाय आपले दुध कधीच पित नाही. बरसणारे ढग मोल मागत नाहीत, झाडं आपली फळे खात नाहीत. त्यांच्यासारखे कोण निश्पृह काम करतो ? एवढेच काय चंद्र-सूर्य अविरत, अविश्रांतपणे फिरत असतात. परीस क्षणार्धात लोखंडाचे सोने करतो. कितीही घाव घातले तरी हिरा फुटत नाही. हे सगळे केवळ आणि केवळ उपकार करण्यासाठी इथे अवतीर्ण होतात. स्वतःचे अनमोल तत्व इथे माणसांना दान करतात आणि पृथ्वीच्या अंतापर्यंत करत राहतील. अशा अलौकिक कामाचीच नोंद सर्वकाळ होत असते. असा सुंदर दृष्टांत आणि सिद्धांत कथित करणारा जगद्गुरू तुकोबांचा हा अभंग आपल्या सर्वांनाच विचारप्रवण करून जातो.तूकोबांनी हिंदीत अभंग का लिहिले असावेत ? असा प्रश्न सहज पडून जातो. याचा अर्थ असा की; तत्कालीन मुस्लीम शासक बळजबरीने इथल्या मुलनिवाशी लोकांचे धर्मांतर करत असावेत. त्यात बरेच मुसलमानसुद्धा पंढरीची वारी करणारे होते. त्यांना सुद्धा आपल्या भाषेत तुकाराम महाराज लिहितात. ते आपलेच आहेत. आपण सर्वच एकमेकांचे असून कुणीही कुणाचा शत्रू नाही. तसेच त्यांच्यावर संत कबिरांचा खोलवर प्रभाव आढळून येतो. जसे "तीर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनी ॥" हा अभंग कबीरांच्या

**जत्रा मे फतरा बिठाया । तीरथ बनाया पाणी ॥**
**दुनिया भयी दिवाणी भाई । दुनिया भयी दिवाणी ॥**

या अभंगाने प्रभावित आहे. असे एकच नाही तर अनेक अभंग तूकोबांनी संत कबीरांच्या प्रभावाने लिहिले आहेत. त्यापैकी हा एक अभंग. भाषा कोणतीही असो, आपल्याला जे सांगायचे ते सांगितलेच पाहिजे. समाज सेवक, प्रबोधनकार, कीर्तनकार, लेखक, कवींनी आपली लेखणी समाजातील सर्वच घटकांना जसे सत्ताधारी, राजकारणी, तरुण, श्रीमंत यांना वठणीवर आणण्यासाठी पाजळली पाहिजे. कवी, लेखक, वक्ता बेडरपणे व्यक्त झाला पाहिजे. तो विकला अथवा झुकला की; जग नीती-तत्वांपासून दूर जात असते.



जेंव्हा जेंव्हा जगात साहित्यिक-वक्त्यांनी आपले शब्द आणि लेखणी थांबवल्या तेंव्हा तेंव्हा सत्ताधारी लोकांचे अन्याय अत्याचार वाढले आहेत. त्याच अनुषंगाने तुकोबांना लोकांनी लाठ्याकाठ्यांनी मारले. त्यांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणी नदीत बुडवल्या, मात्र तुकोबांचे वैश्विक विचार देणारे अभंग जनमाणसांच्या मनावर तरले. खऱ्या अर्थाने अनमोल मानवी जीवन अंतरंग पाण्यावर तरंगले!

साहित्य म्हणजे काय ? याचे अप्रतिम विश्लेषण विनोबा भावे करतांना, "साहित्य हा शब्द स+हित या दोन शब्दांपासून बनलेला असून ज्यात समाजाचं हित असतं ते साहित्य" असे लिहितात. हाच साहित्याचा गाभा असायला हवा. समाजाचे सर्वांगीण हित शोधण्याचे महत्वपूर्ण कार्य साहित्याने करायला हवे. आत्तापर्यंत ज्यांनी ज्यांनी समाजहित आणि लोकोद्धार समोर ठेवून लिखाण केले; त्यांचे लेखन अजरामर ठरले आणि तेच लेखन चंद्र-सूर्य असेपर्यंत अबाधित असेल. त्यावरच सातत्याने चिंतन होत राहील तेच लेखन सर्वकाळ सर्वांना पथदर्शी असेल यात तिळमात्र शंका नाही. साहित्याला वाङ्मय हा एक समानार्थी शब्द वापरला जातो. श्रीमद् भगवतगीतेमध्ये वाङ्मय अनुषंगाने

**अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहिंत च यत् । स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ (गीता १७/१५)**

हा श्लोक आला असून त्यातून आपल्याला "असे लेखन ज्यातून कोणताही उद्वेग व्यक्त होत नसून जिथे सर्वांच्या हिताचे यथार्थ भाष्य होत असते त्यालाच वाङ्मय म्हटले जाते." वाङ्मय हे एक प्रकारची साधना आहे. या शब्दसाधनेतून अनेकांना अनंत प्रेरणा मिळतात. त्यातून अनेकांचा उद्धार होतो. यातूनच लोकांच्या भावभावनांचे रक्षण होते. वाममार्गी लोक सन्मार्गी लागतात. अनेकांना जीवन जगण्याचे नवनवे मार्ग सापडतात. हे सगळं महत्कार्य लेखनाच्या माध्यमातून होत असतं. याच माध्यामतून आजही आपण महान लोकांना भेटू शकतो. तेच उच्च कोटीचे साहित्य-वाङ्मयं निर्माण करण्याचे कार्य जगद्गुरू तुकाराम महाराजांनी आपल्या अभंग-कीर्तनाद्वारा केलेले आढळून येते. सांप्रतकाळी उच्च शिक्षित लोकांनी उर्जायवान लेखन केले पाहिजे. आपल्या शब्दसामर्थ्याने आपला भोवताल आनंदी-प्रफुल्लीत आणि चिंतनगर्भ ठेवणे अपेक्षित आहे. आज सगळीकडे लोक व्यस्त असतात. ही व्यस्तता असतांना सर्वांनी आपापले छंद जोपासले पाहिजेत. छंद माणसाच्या जगण्याची उर्जा वाढवतात. तात्पुरते सुख देणारी व्यसने त्यागून सर्वकाळ जीवन समृद्ध करणारी कामे जसे वाचन, लेखन, भटकंती, आवडती गाणी ऐकणे, जुन्या दोस्तांना भेटणे, मनसोक्त गप्पा मारणे, निसर्गाच्या सानिध्यात पर्यटन करणे, मनसोक्त पोहणे, डोंगरावर फिरायला जाणे आदि सारख्या गोष्टी आठवड्यातून एकदा तरी करायलाच हव्यात. काहीतरी नवे निर्माण करण्यासाठी स्वतःला अभिवचन दिले पाहिजे. त्यातून आपले जीवन आनंदी होऊन विचार समृद्धी येते. जसे मी साप्ताहिक 'तुकाराम नीती' लिहायचे स्वतःला बांधून घेतले आहे, तसेच आपणही एखादे आपल्या दैनिक कामाव्यतिरिक्त एखादे काम करण्याचे ठरवून घ्यावे आणि जीवन आनंदी करावे! असे झाले म्हणजे तुकोबांच्या अभंगांचे आणि त्यावरील "तुकाराम नीती" साप्ताहिक सदर यशस्वी होत राहील याचा मनस्वी आनंद आहे! जय तुकोबाराय!

# विविधरंगी भावनांचा आविष्कार : 'आनंद '



उमेश मोहिते
संपर्क क्र.: ७६६६१८६९२८

आधुनिक केसरी

**बीड जिल्ह्यातील माजलगावच्या श्री. सिद्धेश्वर विद्यालयातील शिक्षिका श्रीमती अनुराधा लाहोरकर-खुर्पे यांचा ' आनंद ' हा पहिलाच कवितासंग्रह असून यात कवयित्रीच्या; नव्हे तर प्रत्येक व्यक्तीच्या भावविश्वाचा अविभाज्य घटक असलेल्या आई, वडील, आजी, मित्र-मैत्रिणी,स्वतःचे घर, बालपणीच्या आठवणी, अंतःकरणात हुरहूर लावणारे गाव, गावातली माणसे, नदी,पाऊस, झाडे , फुले, पक्षी, सभोवतालचे कष्टकरी शेतकरी आणि स्त्रियांचे कष्टप्रद भावजीवन आदी विषयांवरील मनीचे भाव छंदोबद्ध रीतीने सहज सुंदरतेने व्यक्त करणाऱ्या कविता असून त्या साध्या-सुलभ शब्दकळेत शब्दबद्ध झाल्या आहेत.**

त्यामुळे त्या भावस्पर्शी झाल्या आहेत.कविताच स्वतःच्या जगण्याचा श्वास आहे, अशी कवितेवर दृढ निष्ठा असणारी कवयित्री तिच्या आईने घेतलेले कष्ट नि तिची अपार माया नोंदवून आईविषयी वाटणारा कृतज्ञता भाव नेमकेपणाने मांडताना लिहिते :

**आई आयुष्याचा गोडवा**
**दूर करी मनाचा रुसवा**
**तिचे चैतन्य माझी शान**
**आई असे माझा अभिमान**

.. तसेच प्रत्येक व्यक्तीचे बालपण म्हणजे सुखद आठवणींचा समृद्ध असा अनमोल ठेवा असतो.त्या बालपणीच्या काळातील भावविभोर आणि सुखद आठवणींचा लोभस पट मांडून बालपणाचा महिमा सांगताना कवयित्री म्हणतेः

**दिवस बालपणीचे**
**मज्जा,मस्ती करण्याचे**
**खेळात दंग होऊन**
**आनंदात जगण्याचे !**

.. सर्वच जीवसृष्टीसाठी पाणी म्हणजे जीवन असते आणि नदी निरपेक्ष वृत्तीने त्याची उपलब्धता करून देत असते.या भरभरून देणाऱ्या नदी विषयीचा अतूट स्नेहबंध सार्थपणे व्यक्त करताना कवयित्री म्हणतेः

**डोंगररांगा,कडेकपारी**
**पार पाडत नदीमाय**
**प्रत्येकाच्या भेटीसाठी**
**गावोगावी वाहत जाय**

.. मात्र याचा अर्थ या संग्रहात केवळ आठवणी उजागर करणाऱ्याच रचना आहेत,असे नाही ; तर सोबतच मुलांना निखळ वाचन आनंद मिळून त्यासोबतच त्यांच्या संस्कारक्षम नि संवेदनशील मनावर थोरांचे आदर्श,उच्चतम वारसा आणि नीतीमूल्ये इत्यादी बाबींचे बीजारोपण व्हावे,या हेतूने लिहिलेल्या सुलभ रचनाही आहेत.उदा. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुलेंच्या अलौकिक कार्यावर नेटकेपणे प्रकाशझोत टाकताना कवयित्री म्हणतेः

**ज्ञानज्योत लावून**
**शिक्षणाची दारे उघडली**
**बंधने सारी झुगारून**
**सावित्रीमाईने क्रांती केली ..**

.. तर ' ग्रंथ माझे सोबती ' या कवितेमधून ग्रंथांचे मानवी जीवनातील असलेले अढळ स्थान आणि त्यांची सदैव असणारी उपयुक्तता नोंदवताना कवयित्री म्हणतेः

**नवे अनुभव,नव्या संस्कृती**
**वाढवते विचार शक्ती**
**वाचन श्रीमंती माझी**
**बळावते कल्पना**
**शक्ती**

..थोडक्यात कवयित्री अनुराधा लाहोरकर-खुर्पे लिखित ' आनंद ' संग्रहामधील कविता म्हणजे कवयित्रीच्या मनातील भाव भावना नि उत्कट विचारांची प्रांजळ अभिव्यक्ती असून ही कविता प्रतिमा-प्रतिकांच्या भाषेत न बोलता थेटपणे अवतरते आणि म्हणून ती भिडते.ही कविता मुलांच्या भावविश्वाशी निगडित साध्या-सुलभ शब्दात शब्दबध्द झाली असल्याने ती मुलांसहित प्रौढ वाचकांनाही सहजतेने आकलन होणारी आहे.तसेच सोबतच मुलांना काहीएक संस्कारही देणारी आहे,हे विशेष ! प्रस्तावनेत नितीनजी शेटे म्हणतात त्याप्रमाणे ' ही कविता जीवनातील समाधान आणि आनंद शोधण्याचा प्रांजळ प्रयत्न आहे ' हे नक्की ! संग्रहात प्रत्येक कवितेसोबत चित्रकार उद्धव विभुते यांची साजेशी रेखाचित्रे असल्याने संग्रहाच्या देखणेपणात खचितच भर पडली आहे आणि त्यामुळे संग्रहाचे सौंदर्यमूल्य वाढले आहे.

**आनंद - ( कविता )**
**कवयित्री - अनुराधा लाहोरकर- खुर्पे**
**प्रकाशक - शिवानंद प्रभाकरआप्पा खुर्पे ,**
**माजलगाव जि.बीड**
**पृष्ठे - ७७**
**मूल्य - १००**
**मुखपृष्ठ - उद्धव विभुते**




# राम, सीता आणि रावण

आधुनिक केसरी

राम, सीता यांना युगे न युग आपण पुजत आलो त्यांच्या एकनिष्ठतेचि गोडवी गातो. श्रीराम यांना वनवास झाला तेव्हा सीतेने श्रीराम यांना निष्ठेने साथ दिली. कीती युग सीता श्रीरामापासुन लांब राहिली कीती ती पत्नी निष्ठा त्या स्त्रीची, देवीची पण जरा विचार करा आज आहे का इतकी पत्नी निष्ठा ? आहे का तितकीच पती निष्ठा एकमेकात एकनिष्ठता.



सौ. स्नेहल चौधरी
नाशिक

त्यावेळी रावणाने सीतेचे हरण केलं, तरी अग्नीपरीक्षा सीतेने दिली. एका व्यक्तिच्या बोलण्याने सीतेचा त्याग केला गेला तरी सीता एकनिष्ठच राहिली आणि श्रीराम पण एकनिष्ठ राहिले.

आजची परिस्तिथी खुप वेगळी आहे भिन्न आहे थोडा विचार करा... साधा पगार कमी असला काही कमी असली तरी पत्नी साथ देत नाही. काही ठिकाणी ( अपवाद ) पतीदेखील पत्नीला साध्या साध्या गोष्टीत साथ देत नाही. घरात बाजू घ्यायची म्हटले तरी नाही घेत मग जर आपण श्रीराम यांना पूजतो तर त्यांचा आदर्श नुसतं म्हणायला डोळ्यासमोर ठेवतो का ?आत्मसात कोण करेल ?

सीतेला जेव्हा रावण घेवून गेला तेव्हा तिला वाटीकेत ठेवले कधी तिला स्पर्श पण केला नाही. तिच्या होकाराची वाट बघत राहिला, कधी गैरवर्तवणूक नाही केली. पण आजच्या जगात आहे का ती तत्वनिष्ठा जी रावणाकडे होती. परस्त्रीच्या इच्छेविरुद्ध हात न लावण्याची तत्व रावणाने पाळली पण आज तर पदोपदी स्त्री आणि मुलीचे चिरहरण होत असतं. आत्मसन्मानच्या धज्जीया उडत असता. कुठं बोलून तर कुठं कृतीतून काय चाललंय जगात हे स्वतः श्रीरामजी जर बघत असतील तर विचार करत असतील कुठे ते युग आणि कुठे हे कलीयुग आज खरं तर पुन्हा रामाने जन्म घ्यावा व रामराज्य घडवावं न्यायनिवाडा करावा. पण आजचं जग असं झालंय की देव पण अवतार घ्यायला तैयार नाहीत.

आज पण यावं देवाने अवतार घेवून निदान सीतेसाठी जी घराघरात आहे. जीला पदोपदी कलीयूगातल्या रावणाचा सामना करावा लागतोय. रावण पण कलियुगातला ज्याची मती ही विचारांच्या पलीकडे गेली आहे ?

# शिवसेना फुटली, राष्ट्रवादी फुटली त्यांच्या कर्माने, पण आदित्य आणि रोहित बाळाचा टाहो भाजपच्या नावाने का ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**एका भविष्यकाराने सांगुन टाकलं की, राजकारण, क्रिकेट आणि पावसाचं भविष्य कुणीच कधी सांगु शकत नाही. त्याचा प्रत्यय सद्या महाराष्ट्राच्या राजकारणात मागच्या वर्षापासुन येताना दिसतो. प्रत्येक माणुस असो किंवा पक्ष आपल्या कर्मने तथा त्याच्या नेतृत्वाने वाटचाल सुरू असते. पण जेव्हा अचानक खड्डे पडतात त्याचा दोष नेतृत्व कर्मावर जावु शकतो. अनेकदा जैसी करणी, वैसी भरणी किंवा पेरलं ते उगवतं अशी वाक्य याप्रसंगी लागु होतात. मागच्या वर्षी शिवसेना फुटली, एकनाथ शिंदे 40 आमदारांना घेवुन बाहेर पडले. त्याचा वर्धापन दिन साजरा होताना राष्ट्रवादी पक्ष फुटला 40 आमदार घेवुन अजितदादा बाहेर पडले. गंमत बघा, शिवसेना फुटल्यापासुन ठाकरे शिवसेनेचे अर्थात उद्धवजींचे सुपुत्र आदित्य रोज भाजपला शिव्या घालत टाहो फोडताना दिसतात.**

त्या पाठोपाठ राष्ट्रवादी फुटली आणि रोहित अर्थात दादा हे देखील भाजपच्या नावाने टाहो फोडु लागले. दोन्हीही बाळ अवस्थेत म्हणावे लागतील. त्यांना त्यांच्या नेतृत्वाचे दोष दिसत नाहीत. मग आरोप थेट भाजपवर करू लागले. असे आरोप करणे म्हणजे विवाह झाल्यानंतर संतती होईना तेव्हा शेजाऱ्यांच्या नावाने ओरडणे असंच म्हणावे लागेल. आदित्य असोत कि रोहित या दोन्ही बाळाने आपल्याच नेतृत्वाकडे पहात आत्मपरीक्षण करणे काळाची गरज.










मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मागच्या वर्षी जुन महिन्यातच थेट गुवाहाटीला गेले. सोबत एक नव्हे तर 40 आमदार नंतरच्या घडामोडी सांगणे नको. पण शिवसेनेत मोठं बंड झालं. दुभंगल्या गेली आणि शिंदे गट बाजुला पडून राज्यात नविन सरकार अस्तित्वात आलं. अर्थात शिवसेना सोडताना त्यांनी आपण पक्ष सोडत नव्हे तर ज्यांनी हिंदुत्वाची साथ सोडली त्या उद्धवजी ठाकरे यांना वैतागुन पक्षाबाहेर पडल्याचं सांगितलं. ही सारी मंडळी स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या तालमीत तयार झालेली पण जे ठाकरेंचं स्वप्न होतं ते केवळ मुख्यमंत्री पदासाठी बाजुला ठेवल्या गेलं आणि राज्यात वेगळं समीकरण तयार झालं. भाजपाची साथ सोडु नये अशी भुमिका सुरूवातीपासुनच शिंदे गटाची होती. पण अनेकदा केवळ सत्तेसाठी स्वार्थाने नेतृत्व आंधळे होतात. मग धृतराष्ट्राच्या भुमिकेत जातात. तसंच काही म्हणावे लागेल. यापेक्षाही अधिक बाळासाहेबांच्या नंतर पक्ष सांभाळण्यात कुठेतरी स्वतः उद्धव ठाकरे कमी पडले हे आता लपुन राहिलं नाही. मग स्वतःची राजकिय महत्वाकांक्षा म्हणा किंवा पक्ष चालवण्यासाठी अकार्यक्षमता म्हणा. अशा अनेक गोष्टी कारणीभुत ठरतात. अचानक लोक सोडून जातात. तेव्हा हा राजकिय बदल एखाद्या आठवड्याचा किंवा दिवसावर नसतो. अनेक वर्षे वेगवेगळे अनुभव पक्षात राहुन वेगवेगळा संघर्ष, कधी कधी अन्यायाची परिसीमा आणि मग जेव्हा नरडीला पाणी येतं तिथं स्वतःचा जीव वाचवण्यासाठी माकडीण देखील वाहत्या पुरात पिल्याला पायाखाली घेते आणि आपला जीव वाचवते. हे तत्व तथा उदाहरण इथे निश्चित लागु होतं. या सर्व त्रागातुन कदाचित एकनाथ शिंदे यांनी बंड केलं असावं. तदनंतर शिंदे-फडणवीसांचं सरकार आलं. शिवसेनेचे दोन गट पडले. कायद्याने देखील चिन्ह आणि पक्ष एकनाथ शिंदेकडे आला. आता शिवसेना ठाकरे आणि शिवसेना एकनाथ शिंदे या रूपाने वाटचाल सुरू आहे. एक वर्षे या पिक्चरला संपतो तिथंच राज्याच्या राजकारणात काल परवा राजकिय उलथापालथीने दुसरा नव्याने चित्रपट रिलीज झाला. राष्ट्रवादी पक्ष यांच्यात आकाशात वीज कडकडावी आणि उभ्या झाडाचे दोन तुकडे व्हावेत तसा दुभंगल्या गेला. ज्यातुन शरदचंद्रजी पवार मुळ संस्थापक असलेला राष्ट्रवादी पक्ष आणि पक्षातुन बाहेर पडलेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा यांचा राष्ट्रवादी पक्ष अर्थात 40 आमदार घेवुन दादा बाहेर पडले. चमत्कारीक सत्तेत येवुन बसले. स्वतः उपमुख्यमंत्री पदाची शपथ आणि एकुण 09 मंत्री नव्याने मंत्रीमंडळात आले. गंमत बघा, आपण बाहेर का पडलो ? याची संपुर्ण कहाणी 45 मिनिटांच्या भाषणात अजितदादांनी मुंबईत बोलावलेल्या पक्षाच्या मेळाव्यात कथित केली. अर्थात त्यांच्या ऱ्हदयात दाटलेले दुःख ओठातुन बाहेर पडलं. त्यांची कौटुंबिक मुस्कटदाबी ज्यामुळे राजकिय अस्तित्वाला कशा प्रकारे दुर ठेवण्यात आलं ? एवढेच नव्हे तर आम्हाला विलन बनवलं हे सांगायला ते मागे राहिले नाहीत. मुख्यमंत्री पदाची संधी आली असताना साहेबामुळे मिळाली नाही असं देखील ते सांगुन गेले. एकुणच काय तर मोठ्या पवार साहेबांची राजकिय भुमिका आणि त्यांनी केलेलं तडजोडीचं राजकारण हा चाळीस वर्षाचा इतिहास त्यांनी जनतेच्या समोर मांडला. एक गोष्ट खरी आहे की राजकारणात कुठलाही पक्ष संधीची वाट पहातो आणि मग ती चालुन आली तर त्यावर हातोडा मारतो. तसंच म्हणावे लागेल.

एकनाथ शिंदे असतील किंवा अजित पवार असतील पक्षांतर्गत संघर्षामुळे बाहेर पडले. पण काळाची गरज म्हणुन भाजपाने जवळ केलं. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, आपआपल्या नेतृत्वाला वैतागुन ही मंडळी सत्तेच्या सारीपाटावर जावुन बसली. कदाचित वैयक्तिक नशिबाचा भागही म्हणावा लागेल. पण शिवसेना सुपुत्र बाळ आदित्य तथा राष्ट्रवादी सुपुत्र बाळ रोहित या दोन्हीही लेकरांचा टाहो स्वतःच्या पितासमान नेतृत्वाच्या कुटिल डावपेचाकडे फोडताना दिसत नाही तर हे लेकरं भाजपच्या नावाने टाहो फोडणं म्हणजे स्वतः विवाहित पण जेव्हा संतती होईना तेव्हा शेजाऱ्याच्या नावाने ओरडणं हीच उपमा द्यावी लागेल. वर्ष झालं आदित्य घसा ओरडुन भाजपला शिव्या घालतात आणि काल परवापासून रोहित दादा देखील भाजपाच्या नावाने ओरडायला लागले. या दोन्हीही लेकरांनी अगोदर स्वनेतृत्वाबद्दल आत्मपरीक्षण करण्याची गरज वाटते. राजकिय अनुभव मुळातच त्यांना कमी आपल्या पित्याच्या कर्माचे दिवस त्यांनी हिशोबात धरायला हवे. आदित्य ठाकरेंनी उद्धवजीमुळे शिवसेनेत काय झालं ? आणि रोहित दादांनी मोठ्या साहेबांच्या भुमिकेमुळे आपल्या कुटुंबात असो कि पक्षात असो काय झालं ? याचं आत्मपरीक्षण करायला हवं. एकेकाळी भाजप नेते स्व.गोपीनाथराव मुंडेंचं कुटुंब फोडताना कुणाचा सहभाग होता ? हे मागे वळुन रोहित दादांनी पाहिलं तर मग आपल्या काकांनी कशाची पेरणी केली ? जे आज महाराष्ट्राच्या राजकारणात उगवलं याचा थोडा इतिहास समजुन घ्यायला हवा. मोठे साहेब अर्थात पवार साहेबांनी लोकशाहीचं राजकारण करताना हीच लोकशाही पायदळी कशी तुडवली ? मग स्व.वसंतदादा पाटील असतील किंवा अनेक असे राजकिय घराणे ज्या कुटुंबात हस्तक्षेप केल्याने नाती तुटली. हे पुण्यकर्म नव्हे तर फार मोठं पाप काका मंडळींनी केलं हे लेकरांनी लक्षात घ्यायला हवं. आदित्य ठाकरेंनी मागे वळुनच पहायला हवं की महाराष्ट्रात महायुतीची स्थापना स्व.बाळासाहेब ठाकरेंनी केली. हिंदुत्वाच्या लढाईसाठी आयुष्य घालवलं. मग हेच हिंदुत्व समुद्रात फेकुन एका रात्रीत केवळ मुख्यमंत्री पदासाठी तेही खा. संजय राऊत यांच्या मध्यस्थीने आपल्याला सिल्वर ओकचं पायपुसणं केलं. ही राजकिय गणितं लेकरांनी समजुन घ्यायला हवी. राजकारणात पक्ष कुठलाही असो सत्तेच्या राजकारणासाठी नेहमीच तो राजकिय तडजोडी तथा हिशोब लावतच असतो. काँग्रेस जेव्हा अनेक वर्षे सत्ता करत होती तेव्हा देखील केवळ सत्तेसाठी अनेक राज्यात काँग्रेस नेतृत्वाच्या हस्तक्षेपामुळे राजकिय उलथापालथी झालेला इतिहास आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी देश चालवताना सबका साथ सबका विकास केवळ विकासाचं राजकारण आणि त्यातुन सत्ताकारण ज्यामुळे काँग्रेसमुक्त देश झाला. आता काहीही घडो 2024नंतर या देशात पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी 400 पार हॅटट्रीक केल्याशिवाय रहाणार नाही. कदाचित वय 83 होवुन देखील राजकारणाच्या चक्रव्युहातुन पायउतार व्हायला तयार नाहीत अशा नेतृत्वाला आपल्याच कर्माची फळे याचि देहि, याचि डोळा भोगावी लागतात. तेव्हा सत्तेच्या सारीपाटावर भाजप नेतृत्वाने टाकलेली गुगली विकेट घेण्याचा डाव असेल तर तिथं सत्तेचा विजय निश्चित असु शकतो ही सारी गणितं आदित्य आणि रोहित बाळांनी ओळखायला हवीत. अगोदर आपल्याच नेतृत्वासमोर जावुन तुमचं काय चुकलं ? हे त्यांना विचारा आणि मग भाजपच्या नावाने आरडाओरड करा. एवढं केल्यानंतर खरंच बाळांनो तुमचे डोळे उघडतील हे मात्र नक्की.



## चांगल्या गोष्टी

आधुनिक केसरी

एके दिवशी अचानक बादशहाने दरबाऱ्यांना तीन प्रश्न विचारले - 'कोणाचा मुलगा सर्वोत्तम आहे ? कोणाचे दात सर्वोत्तम आहे ? कोणाची गुणवत्ता सर्वोत्तम आहे' ?

सर्व दरबारी आपापसात विचारल्या गेलेल्या प्रश्नांवर चर्चा करायला लागले. त्यांच्यातील एक मोठा दरबारी बोलला 'महाराज! राजाचा मुलगा सर्वोत्तम आहे. हत्तीचे दात सर्वोत्तम आहे. व ज्ञान ही सर्वोत्तम गुणवत्ता आहे.'

अकबरने सर्व उत्तरे ऐकली व विचार करू लागला, जर बिरबल येथे उपस्थित असता तर त्याने मला अधिक योग्य उत्तरे दिली असती.

त्याने तात्काळ बिरबलला बोलविणे पाठविले. बिरबल जेव्हा दरबारात आला तेव्हा अकबरने त्याला त्या तीन प्रश्नांची उत्तरे विचारली. बिरबल उत्तरला, 'महाराज गाईचा मुलगा हा सर्वोत्तम आहे. कारण तो आहे की जो जमीन नांगरतो. अगदी त्याचे शेण सुध्दा खत म्हणून उपयोगी पडते. पीक त्याच्यामुळेच उगवते आणि सर्वांसाठी अन्न तयार होते.' 'दुसरे उत्तर आहे की नांगराचे दात हे सर्वोत्तम आहे. तो जमीन नांगरतो व सुपीक बनवतो. तो आपल्याला पीक वाढविण्यासाठी सक्षम करतो.' तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देताना बिरबल बोलला 'महाराज मी सांगू इच्छीतो की धैर्य सर्वोत्तम गुणवत्ता आहे. बुध्दिमान व्यक्ती पण धैर्याशिवाय काही करू शकत नाही. जरी ज्ञान ही उत्तम संपत्ती आहे , तरी धैर्य हे महत्वाचे आहे.' अकबर व सर्व दरबारी बिरबने दिलेल्या प्रश्नांची उत्तरे ऐकून खूप आनंदी झाले.

# त्रास त्यालाच सहन करावा लागतो



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**माणसाचं जीवन म्हटलं तर सुखा, दुःखाचं संगम आहे. त्यासोबतच अशा बऱ्याच गोष्टींची नाळ सुध्दा जुळून असते सोबत चांगली, वाईट परिस्थिति,आपत्ती ह्या तर कायमच असतात ते शेवटच्या क्षणापर्यंत जुळून राहतात म्हणून हार मानून जीवन जगणे सोडून द्यायचे का...? काहीही झाले तरी आधी जीवन जगणे आवश्यक आहे या समाजात राहणाऱ्या प्रत्येक मनुष्य प्राण्याला कोणत्या, ना कोणत्या गोष्टीचा त्रास सहन करावा लागतो हे खरे आहे.**

पण,सर्वात जास्त त्रास त्यालाच सहन करावा लागतो जो नेहमीच सत्य स्वीकारून जगत असतो त्याच्या जीवनात पदोपदी क्षणाक्षणाला संकटांची रांग लागलेली असते त्यामुळे त्याला जास्त त्रास सहन करावा लागतो.

सर्वात पहिला त्रास म्हणजेच तो सत्य बोलत असतो आणि त्याचे हेच सत्य बोलणे व वागणे इतरांच्या डोळ्यात काट्यासारखे टोचत असतात त्यामुळेच त्या माणसाला त्रास देण्यासाठी, हरविण्यासाठी,फसविण्यासाठी असे नाना तऱ्हेचे कटकारस्थान रचण्यासाठी संधी सोडत नाही हा त्रास म्हणजेच एक प्रकारचा मानसिक त्रास असू शकते.कधी,कधी काय होतं की,हा मानसिक त्रास जीवघेणा सुध्दा होऊ शकते अनेकदा या विषयावर कुठे ऐकले असणार. दुसरा त्रास म्हणजेच स्वतःच्या विषयी विचार न करता समाजाच्या हितासाठी किंवा एखाद्या रंजल्या, गांजलेल्या कुटुंबाला आधार देण्यासाठी जेव्हा तो माणूस झटत असतो त्यावेळी त्याच्याच लोकांपासून त्रास व्हायला सुरूवात होते.

अशा लोकांमुळेच तो माणूस फार दुःखी असते त्याला इतरांकडून काहीही हवे नसते पण,त्या प्रसंगी जेव्हा कुटुंबातील लोकचं दोन शब्दाचा आधार देत नसतील त्यावेळी तो माणूस मनातून पूर्णपणे तुटून गेलेला असते. तरीही चेहऱ्यावर हास्य ठेवून होणारा सर्वच त्रास सहजपणाने सहन करत असतो. तीसरा होणारा त्रास म्हणजेच तो माणून स्वार्थी नसतो कोणाचीही अपेक्षा न करता एक, एक रुपये जमा करून जगत असतो प्रत्येक संकटाचा



सामना करत असते ऐन त्याच वेळी आर्थीक अडचणी सुध्दा खूप त्रासदायक असतात तरीही तो माणूस आपला स्वाभिमान कुठेही विकत नाही उलट जगून दाखवतो व त्या कठीण प्रसंगी सुध्दा इतरांच्याच विषयी विचार करत असते त्यात एक गोष्ट अशी की मागे गेलेल्या काही वर्षात थोडेतरी जाऊन बघावे त्या काळात जे,होऊन गेलेले थोर संत, महात्मे, महापुरूष सर्व महाविभूती होते त्यांना समाजाने त्रास देण्यासाठी एकही संधी सोडली नाही, त्यांना सुखानी जगू दिले नाही, घुटभर पाण्यासाठी त्यांना गांजून सोडले होते, वरतून निंदा, चुगली, शिव्या, वारंवार हसणे, वाटेत संकट बनून अडविणे हे त्यांना फार प्रमाणात जमत होते तरीही त्या सर्व महाविभूंतीनी समाजाकडून होणारा त्रास हसत, हसत सहन केले आणि याच समाजासाठी शेवटच्या क्षणापर्यंत जगले आज त्यांनाच प्रत्येक माणूस दररोज वंदन करत आहे कारण त्यांनी सत्याचा स्वीकार केले होते व सत्याच्या वाटेवर चालून माणव जीवनाचे कल्याण केले होते म्हणूनच आजचा प्रत्येक माणूस दोन घास सुखाने खात आहे व जगत सुध्दा आहे ही सारी देण त्या महाविभूंतीचीच आहे.

म्हणूनच सर्वात जास्त त्रास त्यालाच सहन करावा लागतो ज्याच्याच सहन करण्याची ताकद असते आणि त्यासाठी जन्म घ्यावा लागतो व तेव्हाच जीवनाचे सार्थक होते पण,हे सर्वानाच जमत नाही किंवा प्रत्येकांच्याच वाट्याला येत नाही कारण सत्य स्वीकारणे एवढे सोपे नसते जेवढे खोटे सहजपणे बोलले जाते व खोट्याला साथ दिल्या जाते हे फार सोपे काम आहे म्हणून आजचा माणूस स्वतःमध्ये शोधण्याचा प्रयत्न करत नाही पण,दुसऱ्यांच्या चुका मात्र काढून त्याचे जीवन नरकासारखे करण्यासाठी वैऱ्यासारखा हातधुवून मागे लागत असतो व त्याच्यावर वारंवार हसून गावभर त्याच्याविषयी डिंडोरी पिटत असतो हे वास्तव सत्य आज सत्याच्या वाटेवर चालणाऱ्या माणसांच्या दैनदिन जीवनात येतांना दिसत आहेत तरीही तो माणूस जगण्याचा प्रयत्न करत असते. एक गोष्ट मात्र खरी आहे तोच माणूस अभिमानाचे दुसरे नाव असते कारण त्रास त्यालाच सहन करावा लागतो जो सत्याला पूर्णपणे समर्पीत होऊन जातो,,निंदकाला आपला गुरू मानतो आणि संघर्ष करत राहतो पण,मागे वळून बघत नाही किंवा कोणाचे वाईट चिंतत नाही, प्रसिद्धीच्या मागे धावत नाही, खोटे कधीही बोलत नाही, म्हणून कोणत्याही माणसांनी उगाचच कोणाला त्रास देण्यात वेळ वाया घालविण्यापेक्षा अशा वाटेवर चालत रहावे जी वाट जीवनाचे सार्थक करणारी असावी अशीच माणुसकी व असेच कार्य असावेत जिथे स्वतःचा तर..उद्धार होईलच पण,इतरांनाही तिथून दिशा मिळेल तोच मार्ग स्वीकारावा.

# दु:ख माझ्या मायीचं...



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**होय, मला अजूनही चांगलं आठवतं... दिवाळी जवळ आली होती. शाळेला सुट्ट्या लागल्या होत्या. मी माझ्या भावंडांसोबत गावाकडे गेले होते. दरवर्षीप्रमाणे मामा वसूबारसीच्या दिवशी आम्हाला न्यायला येणार होते आणि सायंकाळी मामा आम्हाला न्यायला आले. आमच्या गावापासून मामाचं गाव फार जवळ आहे. पण दिवाळीच्या साऱ्यांना पायी नेणे मामाला आवडायचं नाही. मामा आमच्यासाठी बैलगाडी आणायचे. यावेळी ही बैलगाडी घेऊन मामा आले. मामाचे गाव मट-कळा व आमचं गाव दुर्डी दोन्ही गावांच्या मध्ये अगदी एक ते दीड किलोमीटरचे अंतर.. त्यामुळे असे म्हटले जायचे की, दोन्ही गावात दुधना नदी तेवढीच आडवी आहे. मामाची चहापाणी झाल्यानंतर आम्ही गाडीत बसलो .सायंकाळची वेळ झाली होती ...सूर्य नुकताच मावळत होता... हिवाळा असल्यामुळे लवकर अंधार पडल्यासारखा वाटत होता. मी माझ्याच विचारात दोन्ही भावांना जवळ घेऊन गाडीत बसले. तेवढ्यात मामांनी विचारले,"काय शारदा परीक्षा झाली तुहे पेपर कसे गेले?"मी ,"चांगले गेले म्हणून सांगितले".**

मी आठवीत होते तेंव्हा... इकडच्या तिकडच्या गप्पा मारत आमची गाडी नदीत आली. मामा म्हणाले,"शारदा गंगामाईला हातं जोडा". मी दोन्ही भावांना हातं जोडायला सांगून स्वतःही नमस्कार केला.

थोड्या वेळाने आमची गाडी घरापर्यंत आली .मामाच्या घरापुढे येऊन थांबली. आम्ही गाडीतून उतरलो. सर्वसामान घेतले व घरी आणून ठेवले. अंगणात येताच मामींनी पाय धुण्यासाठी पाणी दिले. व तोंडावरून हात फिरवला. तशी माय ही पुढे आली. ( माझी आजी ) माय म्हणाली,"दुर्डीला कवा आलीस माय ?"मी म्हणाले,"दोन-तीन दिवस झाले आले". माय थबथबलेल्या डोळ्यांनी आमच्याकडे पहात होती...

बोलत- बोलत सर्वांनी जेवण केले.व थोड्या वेळाने आम्ही अंथरुणावर पडलो. तसे मला गेल्यावर्षीचे सारं काही आठवू लागले. कारण गेल्या वर्षी माझ्यासोबत आमची आई सुद्धा आली होती. आणि यावर्षी...

यावर्षी मात्र मी व माझे दोन भाऊच आलो होतो. आईविना मामाचं घर आम्हाला सुनं- सुनं वाटायला लागलं...

आई गेल्यानंतरची ही पहिलीच दिवाळी होती. तेंव्हा आम्ही तिघं भावंड फार लहान होतो. सर्वात मोठी मीच होते. मोठी तरी किती ? बारा -तेरा वर्षाची असेल. व मोठा भाऊ ६ वर्षाचा आणि लहान ५ वर्षाचा असेल. दरवर्षी दिवाळीला आई सोबत असायची. आज मात्र कुठे होती ती ? कधीही परत न येता येणाऱ्या वाटेने गेली होती. असंच आईची आठवण करत -करत मला केंव्हा डोळा लागला ते कळलंच नाही.

दुसऱ्या दिवशी मामीचे भाऊ त्यांना न्यायला आले. मामी त्यांच्या माहेरी गेल्या. जातेवेळी मामींनी बरंच फराळाचं करून ठेवलं होतं. व निघताना कितीदा वेळेवर जेवण करत जा म्हणून सांगितलं होतं. मामी सोबत त्यांचे उद्धव,हनूमान,व सुनिता हे तिन्ही मुलंही सावंत बोरीला गेले.( मामीचे माहेर ) सामील त्यांची मुले गेल्यानंतर मला बिलकुलच करमत नव्हते. म्हणून मी माझ्या चुलत मामाची मुलगी उषा बरोबर कपडे धुण्यासाठी नदीवर गेले. तिथे अनेक बाया कपडे धूत होत्या.. उषा व मी तिकडे गेलो. मला पाहताच तेथील बायांमध्ये कुजबूज सुरू झाली. आपसात त्या काहीतरी बोलत होत्या. त्यातली एक बाई उषाला म्हणाली,"ही नव्हखी पाहुणी कोण हाय गं उषा" ? उषा म्हणाली,"ती मह्या आत्त्याची पोरगी हाय.."तेवढ्यात दुसरी बाई म्हणाली,"अग ती मुंजाची भासी हाय की."त्यातलीच एक बाई म्हणाली. त्या नागू तात्याच्या मुंजाची भासी हाय का ?"उषा म्हणाली," हो !आता वळखलं बघ!"माझ्याविषयी त्या बायकांचे बरंच काही बोलणं चालू होतं. त्यातली एक बाई म्हणाली,"अगं त्या मुंजाला एकच तर बहीण व्हती ,ती इथं दुरडीत देली व्हती."तिचे हे शब्द ऐकून,"दुसरी बाई म्हणाली,"हो माय हिची माय शाट लागून मेली."एक बाई पुन्हा म्हणाली,"हो माय लय बेक्कार झालं... लेकरायचा उन्हाळा झाला."तशी मला त्यातल्या काही बायकांची थोडीफार ओळख होती. उषा चे कपडे धुणं झाले होते ,मी तिला कपडे पिळू लागले. व आम्ही आता घरी परत निघालो.. एवढ्यात वाटेत मालन आक्का भेटल्या. मला पाहताच त्या थांबल्या. म्हणाल्या शारदा कवा आलीस गं ? मी कालच आल्याचे सांगितले. आईच्या खूप आठवणी त्या सांगू लागल्या. त्या म्हणाल्या,"भाऊ कसे हायेत आता ? तुझी आई अन् मी लई संग-मंग राहायचं. लई नादार सबाव व्हता तुझ्या आईचा.. आता सगळं चांगलं झालं होतं सोन्यासारखी लेकरं सोडून देवानं तिला नेलं.." तिचे ते शब्द ऐकून मला रडूच येत होतं... पुढे ती म्हणाली तुझी आई अक्षी लक्ष्मी वाणी दिसायची .कपाळभर कुंकू लावायची" ,बोलत बोलत पुन्हा म्हणाली," जा माय घरी माय वाट बघत असंल," थोड्या वेळाने आम्ही घरी आलो. कपडे वाळू घातले.माय मला जेवण कर म्हणून सांगत होती. पण माझी जेवणाची इच्छाच होत नव्हती. माझे भाऊ शरद, सुनिल खेळत होते...

माय पुन्हा जवळ आली व मला म्हणाली,"शारदा जेवण कर, तू सकाळपासून नेहरी बी केली नाही.. आज तुला कशी काय भूक लागली नाही. मायीचा अनेक प्रश्नांनी डोळ्यात माझ्या पाणीच उभं राहिलं, हुंदका दाटून आला. वाटलं आक्रोश करून विचारवं त्या देवाला,"का नेलस माझ्यापासून माझ्या आईला ? कशी तुला आमची दया आली नाही ?



एवढा कसा रे निष्ठूर झालास तू ? पण तो तरी कुठे देणार होता माझ्या प्रश्नांची उत्तरं... माझे रडणे पाहून मायीच्याही डोळ्याला धारा लागल्या. तिचं दुःख तर डोंगराएवढं होतं. तिनं पोटचा गोळा गमावला होता. कसेबसे मला समजून सांगत होती. मामा बारा दिवसांचे असतानाच बाबा वारले होते. तेंव्हापासून सोन्यासारख्या लेकरांकडे बघून ती जगत होती.आता कुठे चांगले दिवस आले होते . आणि हा आईच्या दुःखाचा आघात तिच्यावर काळाने केला होता. हे सारे तिच्यासाठी खरोखरच खूप भयंकर होतं .. तरीही ती आमच्याकडे बघून जगत होती. आम्हा तिघा भावंडांची तिला खूप काळजी वाटायची. आईच्या जाण्याने ती खूप खचून गेली होती. आमच्याकडे पाहून घास कुटका खात होती . माझ्यातच तिच्या लेकीला शोधत होती. कधी माझ्या भावाचा धिंगाणा सुरू झाला की त्यांना पटकन बोलून जायची ,"गपचूप बसा धिंगाणा करू नका नाहीतर तुमच्या आईला सांगून देईन".आणि मग तिला स्वतःलाच आठवायचं , आईला सांगायला आई तरी राहिलीय का आता सांगायला ? ..मायीच्या समाधानासाठी मी थोडसं जेवण केलं.

एकदा पटकन मलाच पारबती म्हणून गेली. अन पुन्हा दचकून म्हणाली,"तिचं नाव तोंडातून जातच नाही बघ. देवानं समद कसं उलट- पालटं केलं. सोन्यासारख्या लेकरांचा वनवास केला मेल्यानं. कोणालं ठावं काय भेटलं असंन त्याला. असंच काहीतरी बडबडली आणि लुगड्याच्या पदराने डोळे पुसले.. डोळ्याचं पाणी काही खंडात नव्हतं तिच्या. सारखी आईची आठवण काढून रडत बसायची. हो! आईचं नाव पार्वती असं होतं.एकदा माय खोलीत गेली. मला आवाज दिला. तिच्या पाठोपाठ मीही गेले पाहते तर काय ?मायीने उतरंड खाली उतरली होती. चोळीच्या एका छोट्याशा कपड्यात बांधलेली पुरचुंडी तिने काढली.व मला म्हणाली,"हे बघ तुह्या आईच्या गळ्यातले मणी...तुह्यासाठी तसेच जपून ठेवलेत.ते मणी पाहून मी म्हणाले,"माय हे मणी मला काय कामाचे. तुझ्या गळ्यात घाल की,"म्हणाली," नको माय मव्हं का सपान होतं का ? लेकिन मरावं अन् तिच्या गळ्यातले मनी म्या घालावे .देवाने तिला लेक देली . तुह्या गळ्यात घालायला जपून ठेवीन मी"ते मणी पाहून मी व माय दोघींचाही हुंदका दाटून आला. पुन्हा मायीने एक भलं मोठं गाठोडं काढलं.गाठोडं सोडत मला म्हणाली.,"हे बघ पोरी, तुझ्या आईला इथं आल्यावर कधी विसाव्या न बसावंच वाटलं नाही . सारखं काही ना काही तरी काम काढून बसायची. तिने त्या गाठोड्यातून आईने शिवलेल्या पिशव्या, उशांच्या खोळा, लांबणी, गोधडी, इत्यादी वस्तू दाखवल्या. म्हणाली हे समदं तुह्या आईने शिवलंय बघ! आठव करून ठेवलाय मला तिनं.. मला हे दाखवत मायीने त्या गोधड्यांना उराशी धरले आणि हंबरडा फोडला. मी तिच्याकडे पाहत होते. रडत होते. व मायीला ,"गप्प बस रडू नको म्हणून सांगतही होते. पण मला वाटत होते आईने शिवलेल्या त्या गोधडीच्या स्पर्शातून तिला तिची लेकच भेटत होती.

माझ्या साध्या भोळ्या मायीला कंटाळा तो काय माहीतच नव्हता. रात्री दहा वाजेपर्यंत तिचं काम चालू असायचं आणि सकाळी पाचला पुन्हा उठायची. दिवाळीतही तिचे हेच चालू होते. उद्या पहिले पाणी होते. म्हणून तिने उटण्यासाठी रात्रीचं तीळ वाटून ठेवले होते. चुलीला पोतरा घालून स्वयंपाक घरही सारवून ठेवले होते. मी मात्र लवकरच झोपी गेले. तिला बोलत बोलत केंव्हा माझा डोळा लागला हे कळलेच नाही. सकाळी चार वाजताच माय उठली झाड-झुड ,सडा -सारवण केले. चूल पेटवली, पाणी तापवायला ठेवले. मामाही उठले होते . चुली जवळ बसलेले मला दिसले. मी तिकडे गेले तर मामा रडत होते. त्यांना माझ्या आईची आठवण झाली असणार. त्यामुळे बहिणीच्या आठवणीने त्यांचे डोळे भरून आले होते. मायीने मामाला समजावले. ती म्हणाली,"अरे मुंजा असं येड्यावानी लडायला काय झालं ? ती पोरगी तुह्या तोंडाकडे बघायली. अरे !तूच असा लडलास तर ती बी लडल की, आता मुका बरं.,"मला म्हणाली,"मामाला उटणं लाव बाई! मी मामांना उटणे लावून अंघोळ घातली अन् ओवाळलं"... दरवर्षी हे सर्व आईच करायची...

पण आज...

ती ना मामाला उटणं लावनार होती.ना ओवाळणार होती. मला आईचे गेल्यावर्षीचे शब्द आठवले,ती मामाला म्हणाली होती,"हे बघ मुंजा पुढल्या वर्षी तू हिलाच आन् दिवाळीला. तुला लई खर्च होतो. पोरांचे कपडे ,मही साडी, हिचा ड्रेस सगळं खूप महाग झाले बाप्पा". त्यावर मामा म्हणाले होते,"जोवर मह्यात ताकद आहे तोवर मी तुम्हाला आणीन, खर्चाला मी घाबरत नाही. देव मला काय बी कमी करायचा नाही. "आईचे शब्द मला आठवले अन् माझे डोळे पाणवले. वाटलं तिला विचारावं,"तू असं का म्हणाली होतीस ? का तुला सर्व आधीच कळलं होतं. पण कशी विचारणार होते मी तिला. विचारायला कुठे होती ती माझ्याजवळ... खूप दूर निघून गेली होती ती...

मामाही तेवढ्यात म्हणाले,"गेल्या वर्षीच बाई म्हणाली होती, पुढल्या वर्षी मह्या लेकीलाच आन् आणि यंदा बाई आपल्या भावाला ववळायला आली नाही. माझं कोडं पडलं तिला म्हणून कायमची निघून गेली." असेच काही आठवणी सांगत मामाही खूप रडत होते. असेच काही दिवस गेले. काही ना काही आठवण काढून माय सारखी रडायची. भाऊबीजेच्या दिवशी सुद्धा मामा फार उदास होते. अगदी शांत -शांत होते. कुणाशी जास्त बोलत नव्हते. त्यांना आईची खूप आठवण येत असणार. अशीच दिवाळी संपून गेली.यावर्षीची दिवाळी आम्हाला दिवाळी म्हणून वाटली सुद्धा नाही. मामी त्यांच्या माहेराहून परत आल्या. आमच्याही शाळेच्या सुट्ट्या संपणार होत्या. आम्ही आमच्या गावी यायला निघालो. साऱ्या जगाची जरी दिवाळी झाली असली. तरी माझ्या मायीच्या मनाची मात्र होळी झाली होती. मामांनी आम्हाला नवे कपडे केले होते. मामाच्या गावाहून आमचे गाव खूप जवळ असल्यामुळे. व तेंव्हा वाहतुकीची तेवढी इतर काही साधनेही उपलब्ध नसल्यामुळे दारासमोर बैलगाडी उभी होती. आम्ही भावंड गाडीत बसलो. माझी माय मात्र भरलेल्या डोळ्यांनी आमच्याकडे पहात होती... लुगड्याच्या पदराने डोळे पुसत होती... व पोरांची काळजी घे त्यांना मारू नको, आता तुह्याच संबाळी हायेत ते"... असं पुन्हा -पुन्हा सांगत होती. मायीने आमच्या तोंडावरून फिरवला. आम्हाला वाटं लावायला, शेजारची बरीच गर्दी जमली होती. मामी सुद्धा स्वतःला व पोरांना जप म्हणून सांगू लागल्या. गाडीत बसल्यानंतर मला गाडी अगदीच रिकामी वाटली. माझी आई गाडीत नव्हती. पण दरवर्षीची तिची जागा मात्र होती. त्या जागेकडे पाहताच मी पुन्हा एकदा मायीकडे पाहिले ते पुन्हा- पुन्हा तोंडावरून हात फिरवत होती. माईचे डोळे आसुसलेले व पुन्हा भेटण्यासाठी आतुरलेले दिसले. माय म्हणाली,"पुन्हा कवा येशील माय ?"मी सुट्टी च्या दिवशी येईल म्हणून सांगितले. तशी मामाने गाडी चालवण्यास सुरुवात केली. गाडी पुढे पुढे जात होती माझी माय मात्र वाकून वाकून बघत होती. गाडी एका वळणावर वळली आणि माझी माय मला दिसेनाशी झाली. गाडी नदीमध्ये आली होती व माझी माय मला डगरीवर उभी असलेली दिसली. आम्ही जाईपर्यंत, आमची गाडी दिसेपर्यंत ती तिथेच उभी होती...

डोळ्यात प्राण आणून बघत होती. व पुन्हा -पुन्हा पदराने डोळे पुसत होती. माझ्या मायीचे हे दुःख आता तिला तिचा जीव असेपर्यंत सोसायचे होते. एक दिवस माय सुद्धा तिच्या लेकीला भेटण्यासाठी निघून गेली. वाटलं झाली असेल का आता तरी तिची आणि आईची भेट.... की,अजूनही तसंच असेल माझ्या मायीचं ते डोंगराएवढं दुःख.... आज आईला जाऊन २७ वर्ष होऊन गेले. एवढा काळ निघून गेला. पण तिच्या आठवणी काही करता विसरता येत नाहीत.

# ट्रॅव्हल्स प्रवासाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**विदर्भ ट्रॅव्हल्सच्या नागपुरातून पुणे येथे जाणाऱ्या खाजगी बसला शनिवारी पहाटे बुलढाणा जिल्ह्यातील पिंपळखुटा येथे अपघात होऊन २५ जणांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे वाहतूक प्रवासाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. खाजगी बस मध्ये प्रवास करीत असताना गाडीला आग लागल्यास ती वीजविण्याची कुठलीच यंत्रणा राहत नाही याशिवाय आपत्कालीन दरवाजा कोणत्या ठिकाणी आहे. त्याचा वापर कसा करावा किंवा जवानांमध्ये आपत्कालीन दरवाजा ऐवजी ब्रेकेबल काच असेल तर ती फोडण्यासाठी लागणारी हातोडी कोणत्या ठिकाणी आहे याची प्रवास याची माहिती प्रवाशांना दिली जात नाही.**

यामुळे आपत्कालीन स्थितीत सुखरूप बाहेर पडणे सहज शक्य असले तरी अनेकांना मृत्यूला सामोरे जावे लागते समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातातून हे भीषण वास्तव पुढे आले आहे.

खाजगी ट्रॅव्हल्स व्यवसाय हा मोठ्या प्रमाणात केला जातो. या व्यवसायात मोठ मोठे उद्योगपतींसह शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांची मोठी गुंतवणूक आहे. आरटीओ व पोलीस खात्यातील अधिकाऱ्यांनी त्यांच्या ट्रॅव्हल्स रस्त्यावर उतरविले आहेत. ट्रॅव्हल्समध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसविले जातात. अधिक नफ्यासाठी खासगी लक्झरी व एस. टी. महामंडळाच्या बसेसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक, वेगमर्यादेचे उल्लंघन, प्रवासी वाहतूक बसमध्ये सर्रासपणे मालवाहतूक केली जात असल्याची धक्कादायक बाबी अनेकदा समोर आल्या असताना दिवसेंदिव हजारो प्रवाशांची ने-आण करणाऱ्या काही गाड्यांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांना हरताळ फासण्यात येत असल्याचा या क्षेत्रातील तज्ज्ञांचा आक्षेप आहे. झपाट्याने विस्तारलेल्या खासगी वाहतूक व्यवस्थेवर नियंत्रण नसल्याने त्याचे सुव्यवस्थित नियमन होत नसल्याचे चित्र आहे.

तसेच, आरटीओचे होणारे दुर्लक्षही गंभीर आहे. प्रवासी वाहतुकीसंदर्भात सविस्तर नियमावली, कायदा अस्तित्वात असताना प्रत्यक्षात मात्र या नियमांकडे सर्रास दुर्लक्ष केले जात आहे. क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक नित्याचीच आहे. स्लिपर कोच गाड्यांना ३० प्रवाशांच्याच वाहतुकीची परवानगी आहे. मात्र, प्रत्यक्षात मात्र ५० हून अधिक प्रवाशांची वाहतूक केली जाते. स्लिपर कोच ट्रॅव्हल्स पासिंग करताना आरटीओकडून ४० प्रकारचे निकष तपासले जातात. यात सर्वप्रथम वाहनाला स्पीड गव्हर्नर



आवश्यक आहे. वेगमर्यादा ८० ठेवावी लागते. जीपीएस आवश्यक आहे. एसी वाहन असेल तर प्रत्येक खिडकीजवळ काच फोडण्यासाठी टूल हवे. इमर्जन्सी एक्झिट दरवाजा कार्यरत हवा. मागच्या बाजूचा मोठा ग्लास फोडण्यासाठी सुविधा हवी. पॅनिक बटणची सक्ती आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेसवर आरटीओकडून कडक कारवाई व्हायला पाहिजे. मात्र चिरीमीरीत अडकलेले परिवहन अधिकाऱ्यांमुळे अनेक प्रवाशांना आपल्या प्राणास मुकावे लागत आहे.

समृद्धी महामार्गावर खाजगी ट्रॅव्हल्सउलटून २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यु झाला. यातून खाजगी ट्रॅव्हल्स ने प्रवास किती सुरक्षित असा प्रश्न उपस्थित होत असताना अशा बसेसवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई होत नसल्याने शहर तसेच उपनगरात अशा बसेसचे अनधिकृत आगार तयार झाले आहेत. माशांच्या सुरक्षेचा विचार करता अशा ठिकाणीच ट्रॅव्हल्स बस सेवा व्यवस्थेवर अंकुश ठेवणे गरजेचे आहे परंतु वाहतूक पोलिसांचे याकडे दुर्लक्ष आहे.समृद्धी महामार्गावर अपघात रोखण्यासाठी परिवहन खात्याकडून वेळोवेळी कारवाईचा बडगा उगारला जात असला तरी अपघातांवर नियंत्रण मिळवता आलेले नाही. १ जुलै २०२३ च्या पहाटेपर्यंत अतिवेगाने वाहन चालवणाऱ्या १६७, चुकीच्या मार्गिकांवर धावणाऱ्या १ हजार ९०४, नो पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या २ हजार ९६७, रिफ्लेक्टर नसलेल्या ९३५ वाहनांवर कारवाई करण्यात आल्याचे परिवहन खात्याच्या अहवालातून स्पष्ट झाले.

# मन टवटवीत करणारी प्रासादिक कविता : काव्यमोहिनी



डी. बी. जगत्पुरिया
संपर्क क्र. : ९८६०४८५३९८

आधुनिक केसरी

**कविता 'काव्यमोहिनीच' असते. चांगली आशयघन कविता कुठल्याही रसिकाला प्रेमात पाडते, भुरळ घालते. नव्वद वर्षीय समृद्ध प्रतिभेचे जनमित्र सदाशिवराव बोरसे या अत्यंत लहान गावातून आलेल्या प्रतिभावंत कवीचा बहुभाषिक कविता संग्रह विविध रुपाकारात साकार झाला आहे. यात मराठी हिन्दी, अहिराणी व इंग्रजी भाषेत कविता आहेत. पूर्व खान्देशला गौरवाने केळी, कपाशी व कविता पिकवणारा प्रदेश असे म्हटले जाते. पूज्य साने गुरुजी, वा. रा. तात्यांच्या भूमीतल्या या ओजस्वी कवीने मराठी कवितेचे दालन समृद्ध केले आहे. अत्यंत सहजपणे काळजातून कागदावर अवतरलेल्या या आशयघन कविता वाचकाच्या मनाचा ठाव घेतात.**

सलामीची बालकविता 'चिमण राजा' आहे. किती छान उतरली ?

**"चिमण राजा / सुंदर सजलापावडर तोंडा/ माखून बसला..."** बडबडगीतांनाही या अनुभवी कवीच्या चिंतनाचे परिमाण लाभलं आहे. " चम चम चांदणी दूर दूर आकाशी अंधाऱ्या रात्री मिणमिण प्रकाशी ! "

**"सर सर सर भर भर भर झोका फिरे मनात गर गर गर"**

या संग्रहातील निसर्ग कविता तर फारच मोहक आणि वेधक आहेत. त्या वाचून कुणाला बालकवीची आठवण झाल्यास अस्वस्थ वाटू नये.

"ऐलतीरावर पैलतीरावर डोलडोलती रानफुले. छंद होत मकरंद सेविती भिरभिरणारे भृंगथवे !"

"हिरवी शेते, हिरवे बांध हिरवे डोंगर हिरवे रान हिरवी झाडे हिरवी वाट

हिरवी झुडूपे - हिरवे घाट!"

भारतीय माणसाच्या मनात देशाबद्दल प्रेम, आदर असलाच पाहिजे. अगोदर देश नंतर सर्व हा भाव मनात भिनलाच पाहिजे. पण आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या संगणकाच्या युगात देवशरणता, देवशरणता माणसाला दुर्बल बनवु शकते. कार्यक्षमतेला खंडित करू शकते याचा विचार प्रज्ञावंत कवीने करायलाच हवा. प्रखर विज्ञानवादी संत गाडगेबाबा निरक्षर होते. पण त्यांनी प्रखर क्रांतिकारी विचार मांडून समाजात जागृती निर्माण केली!

सदाशिवराव मृत्युचे भय न बाळगणारे बलदंड कवी आहेत. 'माझ्या जीवनाची वाट ही त्यांची अनुभवाचं सत्त्व ल्यालेली दीर्घ विचार कविता आहे. ते या कवितेत मातृत्वाची महती गातात. तारुण्याचं स्मरण करतात. संस्कार आणि संचेतनाही जागवतात! शूरवीरांच्या पराक्रमी, प्रेरक कथा सांगायचं आवाहन करतात. मृत्यूचं भय झुगारतात. नदीकाठ, रानमळे, डोंगरकड्यांचं संस्मरण करतात.

**"माझे वृद्धत्वाचे दिन असती आनंदाचे क्षण**
**येता-जाता कार्य करता आनंदाची उधळण !"**

लोक वार्धक्याला घोर विपत्ती मानतात. पण त्याला आनंदाची पर्वणी समजणारे हे ऊर्जावान कवी आहेत !

सदाशिवराव बोरसेंचे हिन्दी भाषेवरही प्रभुत्व आहे. 'मैय्या मेरी' या कवितेत ते आई- बाबा, आजोबा, बहीण या सर्वांना सन्मानित करतात.

**"पापा मेरे बडे बहादूर देशके रक्षक सुदूर सीमापर"**

या ओळींना मनस्वी दाद देत मी त्यांचं अभिनंदन करतो. सोप्या शब्दांतील सहज- सरळ अभिव्यक्तीत हे बोरसे सरांचं वैशिष्ट्य आहे. सोपं लिहिणं तसं खूप कठीण असतं. "मैं हूँ नेता' या उपहासपूर्ण कवितेत ते म्हणतात- "चाहे सभा हो या मेला हो


**" आया मौसम प्यारा प्यारा सबका जी बहलाने वाला !"**

हिन्दी भाषेतही मराठी कवी कसं सहज लिहू शकतो त्याचं हे उत्तम उदाहरण आहे. कविता एक कर्म असते. जिवंतपणाची अनुभूती असते. जडतेला तोडणारा सृजनात्मक प्रयत्न असते कविता ! या चिंतनशील अनुभवी कवीने हे सिद्ध केलं आहे. त्यांचा जडतेला तोडायचा सृजनशील प्रयत्न अभिनंदनीय आहे. कर्मयोगी साने गुरुजींच्या भूमीतलं हे कविता कर्म वाचकांना पसंत पडेल याची पूर्ण खात्री वाटते. 'उनी आखाजी' ( अक्षय तृतीया ) या अहिराणी कवितेत त्यांनी जनजीवनाच्या मनातलं सांस्कृतिक दर्शनच घडवलं आहे. 'Sun and Moon' सारखी सोपी इंग्रजी कविता लिहिण्याचे कौशल्य या प्रतिभेला साधलं आहे. यासर्व प्रासादिक, सुगम कविता मनाला भुरळ घालतात. मनाला टवटवीत बनवतात. मनातली मरगळ नष्ट करतात!

विचारवंत भाई अरुण गुजराथी यांची प्रेरक पाठराखण या संग्रहाला लाभली आहे. कविवर्य तथा विख्यात निवेदक जगदीश देवपूरकर यांची प्रस्तावना न्याय देणारी आहे. मनोज गांधलीकर यांचं मुखपृष्ठ चित्ताकर्षक आहे. विविध रुपाकारात साकार झालेल्या या प्रासादिक कृतीला खूप खूप शुभेच्छा!

**समीक्षक डी. बी. जगत्पुरिया**
**मो. ९८६०४८५३९८**
**'संगर, पाण्याच्या टाकीजवळ, मीरानगर, पडेगाव - औरंगाबाद-४३१ ००२**

**काव्यमोहिनी**
**कवी सदाशिवराव बोरसे प्रकाशक : सौ. सुनंदा सूर्यवंशी**
**पृष्ठ : १३२**
**मूल्य : २००रु.**




# 'भाळ आभाळ' : संघर्षाची गाथा



डॉ. मारोती द. कसाब
संपर्क क्र. 9822616853

आधुनिक केसरी

**तसनीम पटेल; संघर्षाचं दुसरं नाव...! निजामी राजवटीतील नूर महंमद पटेल नावाच्या महाराष्ट्र- तेलंगणाच्या सीमेवरील बिलोलीजववळच्या एका जहागिरीचा मुखत्यार असलेल्या मुस्लिम पाटलाची मुलगी. महमूदबानू व नूरमहंमद पटेल यांना दोन मुले आणि एक मुलगी झाल्यानंतर तसनीमचा जन्म झाला. मात्र त्या आधी भावाचा मृत्यू झाल्यामुळे तसनीमच्या जन्माचे कुणीही स्वागत केले नाही. आधीच मुलगी त्यात पुन्हा काळीसावळी... त्यामुळे मुर्शिदाकडून फाल न पाहता , कुठलेच गोडधोड न करता तिची छटी झाली आणि नाम रखईही झाली. स्वत: वडिलांनीच नाव ठेवले - तसनीम. तसनीम म्हणजे जन्नतमधील गोड पाण्याचा कधीही न आटणारा झरा...!**

तसनीमच्या जन्माआधी सावळीच्या पाटलाच्याघरी साक्षात लक्ष्मी पाणी भरत होती. हळोपाळीच्या १२ गावांचा महसूल गोळा करून नूर मोहम्मद पटेल हे देशमुखांना नेऊन देत आणि देशमुख तो महसूल हैदराबादला जाऊन निजामाकडे जमा करी.

नूर मोहम्मद पटेल यांचे वडील सय्यद याह्या खान आणि राबिया बिबी हे दोघे खास निजामाच्या सांगण्यावरून आपल्या राज्यातील रयतेला दीनचे शिक्षण देण्यासाठी बिलोली परिसरात आले होते. बिलोली जवळचे सावळी हे गाव त्यांनी निवडले. त्यांना तीन मुले आणि दोन मुली झाल्या. कलमा, नमाज, रोजा आदी दीनचे शिक्षण हे दोघेही देत असत. निजामी मुसलमानी राजवटीमुळे अनेक लोक मुस्लिम धर्म स्वीकारीत. अशा नवदीक्षितांना धर्माचे शिक्षण देण्याचे काम हे दोघेही करीत असत. मात्र एके दिवशी अचानक सय्यद याह्या खान अल्लाहला प्यारे झाले आणि तरुण राबिया बीबी विधवा झाली. पतीच्या माघारी राबियाने आपल्या तिन्ही मुलांना आणि दोन्ही मुलींना हिमतीने सांभाळले. राबियाबी गावातल्या मुलांना उर्दू शिकवायची. मोठी झाल्यावर तिची दोन्ही मुले हैदराबादला निघून गेली. एकटा नूर मोहम्मद आणि त्याच्या दोन बहिणी तिच्या जवळ राहिले. दीनचे पाक काम करणाऱ्या राबिया बिबीकडे निजामाने सावळीची पाटीलकी सोपवली. कोवळ्या वयातच नूर मोहम्मद 'पटेल' झाले.

हे घराणे मूळचे हैदराबादी महेदवी. याच घराण्यातली सून हवी म्हणून राबियाने नूर मोहम्मद साठी महमूदबानू ही हैदराबादची मुलगी शोधून त्यांचे लग्न लावले. सावळीत त्यांचा संसार सुरू झाला. गढीवर पाटीलकी बहरली. असे असतानाच निजाम राजवटीत अचानक रजाकारी सुरू झाली. निजामाच्या नावाखाली सामान्यजनांची लुटालुट सुरू झाली. गावोगावचे पाटील रजाकारांना सामील झाले. सावळीच्या पाटलांनीही रजाकारांना आश्रय द्यावा म्हणून काही लोक त्यांच्याकडे आले. मात्र नूर मोहम्मद पटेल यांनी माझ्या प्रजेवर मी रजाकारी लादणार नाही, असे स्पष्ट सांगितले.

त्याकाळात गावोगावी मुसलमानांची कापाकापी सुरू झाली होती. नूर मोहम्मद पटेल यांनाही पकडून माळावर नेले. बंदी बनवण्यात आले. त्या रात्री राबिया बीबी देवाला साकडे घालून रात्रभर भरपावसात अंगणात एका पायावर उभी राहिली. तिने ताजूदचा नमाज अदा केला. पहाटे गंगाराम बोमकंटी या गावातील एका बहादराने नूर मोहम्मद पटेल यांना सुखरूप घरी आणून पोहोचवले. त्यांना वाचवले. प्रचंड कापाकापीतून हे मुस्लिम कुटुंब वाचले. मिलिटरीने निजामाचा पाडाव केला.' जय हिंद' झाले.

१९४८ साली निजामी राजवट संपल्याबरोबर नूर मोहम्मद पटेल बिलोली येथे अंबादासराव बिलोलीकर या ब्राह्मण मित्राच्या घरी राहायला आले. पाटीलकी गेल्यामुळे या कुटुंबावर शेती विकून खाण्याची वेळ आली. शेवटी गढीवरची मातीही विकावी लागली. खूप संकटे आली. मात्र त्यांनी बिलोली सोडले नाही. चारही लेकरांना शिक्षण दिले. त्या सर्वांपैकी जास्त शिकली ती तसनीम.

लहानपणी तसनीम यांना शिक्षणासाठी खूप मोठा संघर्ष करावा लागला. घरी कधी पीठ असायचं तर मीठ नसायचं. लेखन असायची तर पाटी नसायची. एकच ड्रेस रोज घालावा लागायचा. म्हणून अंगाचा वास यायचा. वास यायचा म्हणून मुली दूर हो म्हणायच्या. रात्री दिव्याला तेल नसल्यामुळे गुरुजींनी दिलेला गृहपाठ अपूर्ण रहायचा. घर कामामुळे शाळेला उशीर व्हायचा. अशा एक ना अनेक अडचणींना सामोरे जात तस्नीम पटेल यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

मैत्रिणीच्या घरून न विचारता वही आणल्यामुळे चोर म्हणून बोलणी खावी लागली. अनेकदा अपमान सहन करावा लागला. मात्र सर्व प्रकारच्या वंचना झुगारुन देत , परिस्थितीशी संघर्ष करीत तसनीम पटेल यांनी एम. ए., बी. एड. असे उच्च शिक्षण घेतले.

बिलोली अर्जापूर परिसरात एका मुस्लिम मुलीने उच्च शिक्षण घेणे, हीच एक क्रांतिकारक घटना होय. अर्जापूर येथील हुतात्मा गोविंदराव पानसरे महाविद्यालयात शिकत असताना त्यांनी एक निबंध लिहिला. मुस्लीम तरुणींनी शिक्षण घेऊन पुढे यावे, अशा आशयाचा हा निबंध नांदेडच्या दैनिक प्रजावाणीतून छापून आला आणि तोच निबंध पुण्याच्या साधना साप्ताहिकातही प्रकाशित झाला. त्या निबंधाने महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली. पारंपरिक मुस्लिम धर्मगुरूंचे पित्त खवळले.तसनीम पटेल या विद्यार्थिनीच्या समर्थनार्थ आणि विरोधातही अनेक लोक पुढे सरसावले. अनेकांनी त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. मात्र अनेक जण त्यांच्या मताचे चाहते झाले. त्यापैकीच एक म्हणजे वसमतनगरचे मेहताब खान पठाण.

मेहताब खान पठाण हे तरुण सर्वोदयी कार्यकर्ते. समाजवादी विचाराचे. याच निबंधामुळे तसनीमच्या प्रेमात पडले आणि तब्बल बारा वर्षे वाट पाहून त्यांनी शेवटी तसनीम सोबतच लग्न केले.

'भाळ आभाळ' हा खरा तर एका मुस्लिम मुलीच्या शैक्षणिक प्रवासाचा आणि तिने दिलेल्या आत्मसन्मानाच्या लढ्याचा जिवंत इतिहास आहे. सर्व प्रकारची प्रतिकूल परिस्थिती असूनही तसनीम बिलोली तालुक्यातून चौथीच्या वर्गात पहिली आली हाच तिच्या आयुष्याचा टर्निंग पॉईंट ठरतो. तिला शिष्यवृत्ती मिळाली म्हणूनच तिचे पुढचे शिक्षण होऊ शकले. तसनीम पाचवीला असताना धर्माबाद येथील पानसरे विद्यालयात पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती विषय होता " धनवंत श्रेष्ठ की विद्यावंत ? " या स्पर्धेसाठी पंधरगे गुरुजींनी सर्वच मुलांना भाषण लिहून दिले होते; मात्र ते पाठ केले फक्त तसनीमने. शाळेतून तिचीच निवड झाली.आणि प्रत्यक्ष वक्तृत्व स्पर्धेतही तिने प्रथम क्रमांक पटकाविला. हा तिच्या आयुष्यातला दुसरा टर्निंग पॉइंट.




त्यानंतर तिने भाषणात पुढे कुणालाही जिंकू दिले नाही. आणि आयुष्यात मागे वळूनही पाहिले नाही.

तसनीम पटेल यांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रही पुढे काबीज केले. तत्कालीन बिलोलीचे नगराध्यक्ष शिवाजीराव पाटील यांच्याविरोधात भाषण करून त्यांनी गंगाधर पटणे यांचे महत्त्व जनसामान्यांना सभांतून सांगितले आणि गंगाधर पटणे त्या निवडणुकीत विजयी झाले. त्यानंतर शंकरराव चव्हाण यांच्या प्रचारासाठी तस्नीम पटेल यांनी अनेक सभा घेतल्या. शंकरराव चव्हाण आणि कुसुमताई चव्हाण हे दोघेही त्यांना आपली मानसकन्या मानीत असत. सोनिया गांधी यांच्या स्टेजवर तसनीम पटेल यांनी जोरदार भाषण करून त्यांचेही मन जिंकून घेतले. सतत वीस पंचवीस वर्षे त्यांनी काँग्रेसचा प्रचार केला; मात्र काही मागितले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी तसनीम पटेल यांच्यामधील कार्यकर्त्याचे गुण ओळखले आणि त्यांना पक्षात संधी दिली. काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार सत्तेत आल्यानंतर शरद पवारांनी तस्नीम पटेल यांची महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्डाच्या अध्यक्षपदी निवड केली. मात्र तिथेही त्यांचे मन फार काळ रमले नाही. संघर्ष हाच त्यांचा स्थायीभाव.

कनिष्ठ महाविद्यालयात सेवेला सुरुवात करून त्यांनी वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रोफेसर या पदावरून निवृत्ती स्वीकारली. दरम्यान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक पदही भूषविले.

ज्या महाविद्यालयात शिक्षण घेतले त्या अर्धापूर च्या महाविद्यालयाचे प्राचार्य पदही भूषविले आणि त्याचा राजीनामाही दिला.

तसनीम म्हणजे खळाळता प्रवाह. सतत वाहणारा जीवन प्रवाह म्हणजे तसनीम. राजकारण्यांच्या दाढ्या कुरवाळून त्यांना खूप मोठी पदं मिळविता आली असती. शंकरराव चव्हाण, शरद पवार यांच्या निकटवर्तीय वर्तुळात यांचा समावेश होता. मात्र सत्तेत बसणे हा त्यांचा स्वभाव नाही. तर जनसामान्यांसाठी लढत राहणे हाच त्यांचा स्थायी भाव आहे.

'भाळ आभाळ' या आत्मकथनात जीवनाचा खूप मोठा पट लेखिकेने साकारला आहे.ही केवळ एका मुस्लिम मुलीच्या शिक्षणाची आणि नोकरीच्या काळातील संघर्षगाथा नाही; तर समकालीन समाजाचा जिवंत इतिहास आहे. यात अमिरी गरिबीचा संघर्ष आहे, श्रद्धा अंधश्रद्धा आहेत. नात्यागोत्यांचे राजकारण आहे. हिंदू- मुस्लिम मनाचा धांडोळा घेण्यासाठी हा ग्रंथ खूप उपयुक्त ठरतो.

महात्मा फुले यांच्या काळातील मुनशी गफार बेग, उस्मान शेख, फातिमा शेख यांनी स्त्री शिक्षणासाठी मुस्लिमांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला.

भारतीय मुस्लिमांनी उच्च शिक्षण घेऊन मुख्य प्रवाहात यावे यासाठी सर सय्यद अहमद खान ( १८१७-१८९७ ) यांनी अलिगड मुस्लीम युनिव्हर्सिटीची स्थापना( १८७५ )केली. त्यानंतर महाराष्ट्रातही हमीद दलवाई, शमसुद्दीन तांबोळी, फक्रुद्दीन बेन्नूर, असगर अली इंजिनियर, सय्यद अमीन, शाहीर अमर शेख, अजीज नदाफ, यु.म. पठाण, फ. म. शहाजिंदे, अमर हबीब आदी लेखक कार्यकर्त्यांनी मुस्लिम समूहात जागरणाचे काम केले आहे. समाजक्रांतीच्या या कार्यात स्त्रियांची संख्या मात्र नगण्यच दिसते. मेहरुन्निसा दलवाई, मलिका अमर शेख, आशा शेख, शेख हसीना बानू, नसीमा पठाण, रजिया शेख, रजिया पटेल, नसीमा पटेल आणि डॉ. तसनीम पटेल ही संख्या वाढली पाहिजे.

प्रा.डॉ. तसनीम पटेल यांची 'भाळ आभाळ' ही संघर्षगाथा प्रत्येकाने वाचावी अशीच आहे. यात सुखाचे बोटावर मोजण्याएवढेही प्रसंग नाहीत. व्यवस्थेने पदोपदी केलेला अवमान आणि त्याविरुद्ध लेखिकेने केलेला आत्मसन्मानाचा संघर्ष या ग्रंथाच्या पानापानावर आपली जगण्याची उर्जा वाढवीत जातो. डॉ तसनीम पटेल यांनी लिहीत राहावे. त्यांच्या लेखणीला स्वतंत्र विचारांचे, प्रज्ञेचे आणि अनुभवाचे धारदार टोक आहे , तसेच त्यांच्याकडे बुद्धाच्या कारूण्याची नजरही आहे. मानवी समाजाच्या कल्याणासाठी त्यांची टोकदार लेखणी झिजत राहो, हीच मंगल कामना...!

**भाळ आभाळ (आत्मकथन)**
**लेखिका- डॉ तसनीम पटेल**
**प्रकाशक- लोकपत्र पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड औरंगाबाद.**
**दुसरी आवृत्ती जानेवारी २०२०**
**पृष्ठे - ४२१ किंमत- ४००**

**- डॉ. मारोती कसाब, महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर, जिल्हा लातूर.**

# संवेदनशीलतेची ओळख करून देणारा काव्य संग्रह श्रावण सर

आधुनिक केसरी

**माणूस हा परिस्थितीचे अपत्य नसून परिस्थिती माणसाचे अपत्य असते. बेंजामिन डिझरेलीचे हे जगण्याचे सुत्र कसं जगायला हवं याचं आत्मभान देतं. काही दिवसांपूर्वी मला श्रावण सर हा काव्यसंग्रह श्रावण सखुबाई रंगनाथराव भवर यांच्याकडून मिळाला. हे आमचे परममित्र आहेत,पण अजूनही आमची प्रत्यक्षात भेट झालेली नाही,तरीही पण फोनवरील सुसंवादातून आम्ही जानी दोस्त बनलेलो आहोत. ( ही भेट घडवून आणणारे अवलिया म्हणजे आमचे माधव गव्हाने सर ) विचारांची देवाणघेवाण यातून विचारांची प्रस्तावना समजलेलीआहे. या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ मानवी जीवनातील स्थितंतर याबद्दल सांगत आहे. हे उत्कृष्ट कवी विष्णू थोरे यांनी तयार केलेला आहे व यातून त्यांचे थोरपण दिसून येते. संकल्पना-सौ. वंदना श्रावण भवर यांची आहे. अर्पण पत्रिका बाप, मोठी आई, आई यांना समर्पित केलेली आहे. लीला शिंदे सुप्रसिद्ध बाल साहित्यिक, नारायण पुरी, किशोर शितोळे, (अध्यक्ष- देवगिरी नागरी सहकारी बँक लि.औरंगाबाद, अध्यक्ष-जलदूत NGO.औरंगाबाद) प्रा.संजय गायकवाड,यांचे संदेश व अभिप्राय या काव्यसंग्रहाला लाभले आहेत.**

मुखपृष्ठावर माणूस,संवादशील संवाद,सुसंवाद याची सांगड घालून एक परिपूर्ण समाज निर्माण करण्याचा,तंत्रज्ञान स्वीकारत असताना माणुसकीची नाळ अखंड राहिली पाहिजे. हा कवीचा प्रामाणिक अट्टाहास वाखाणण्याजोगा आहे.

यामध्ये ७४ कविता आहेत.ज्या मानवी जीवनातील सर्वांगाला स्पर्श करून जातात.तर पृष्ठ संख्या 'मोकळ्या' पानासहीत ११४ आहे. मोकळी पानं ठेवणं हे धाडसाचं काम आहे याबद्दल संबंधितांचे आभार! प्रकाशक शब्दगंध समूह प्रकाशन औरंगाबाद यांची आकर्षक मांडणी शब्दांचा,आकार मोठा यासाठी त्यांचे आभार..

तू कोण ? या कवितेमध्ये जगातील चाललेल्या घडामोडीचे वास्तव मांडलेले आहे.सर्वांसाठी करता करता माझं माझ्यासाठी जगायचं राहिलं हे सांगायला कवी मात्र विसरलेले नाहीत.

माणूस भुकेला झाला! हि कविता भावनांचा माणूसकीचा सडा रोजच पडतो इथं पैशापाई, प्रसिद्धी पाई,प्रत्येक जण नडतो इथं,रक्ताच्या नात्याचं मोल,आज खुजं झालं या कवितेत सध्या माणूस माणसाशी कसा वागतो याचं फसवं पण सत्य असं प्रतिबिंब आहे.

मही माय आईचं मोठेपण सांगते.मह्या मायनं, कधीच स्वप्न पाहिलं नाही.. कारण ती स्वप्नासाठी,कधी झोपलीच नाही.कामाच्या थकव्यानं तिला भाकरीच्या तुकड्याच्या शोधातच झोपवलं मह्या मायनं. कधीचं स्वप्न पाहिलं नाही.संसाराच ही मांडणी वेदना देणारी आहे. पैसा पैसा काय करू शकतो याचं वर्णन या कवितेत केलेलं आहे. पैशानं बरचं काही मिळतं पण पैशांन सर्व काही मिळत नाही. पैसा देवासारखा वाटला तरी देव पैशाला मानू नका. अंतिम क्षणी माणसाचं येतात कामा जेव्हा पैसा देतो धोका. पैसा बोलतो असे म्हणणे योग्य आहे; पण पैसा पिचलेली भाषा बोलतो. त्यापेक्षा हृदय अधिक चांगले, स्पष्ट आणि शहाणपणाची भाषा बोलते. या पुस्तकात वाचलेल्या वैचारिक शहाणपणाची ही कविता वाचताना आठवण झाली.संवाद मुका झाला..! यामध्ये राम ते हिटलर प्रवास अतिशय मार्मिकपणे मांडला आहे. जी कवीचा वाचल्यामुळे या नात्याबद्दल पुन्हा खोलात जाऊन विचार करावासा वाटला




ती कविता म्हणजे
रक्षाबंधन धागा कुणाचा
सप्तरंगी तर, कुणाचा
विविध रंगात,
नात्यात रंगलेला
श्रावणमासात, भाऊ-
बहिणीच्या मनात,
आपुलकीनं बांधलेला धागा
नुसता रेशीमबंध नाही, ती एक
नात्यांची नाळ आहे. लाडक्या
भाऊरायाच्या हाती, बांधते ताईचं
हृदय आभाळ आहे कधी भाऊ,
कधी बाप,
तर कधी माय बनून जपते ताई
आपल्या लहान-मोठ्या भावाखातर,
स्वतः दिव्यासारखी तपते ताई कधी
गुरु बनून शिकविते, तर कधी
समईसारखी जळते ताई
बहिणीचं जगणं फक्त, तिच्या
संसारापुरतं राहत नाही, सासरी असूनही
माहेरची आस,
शेवटपर्यंत तुटत नाही घराचं घरपण
माय, तर बहीण घरातील देव्हारा बहिणीविना
सुनासुना, कुटुंबाचा गाभारा मायनंतर माया लावणारं,
जगात दुसरं कुणीच नाही लय थोर नशीब लागत भाऊ, ज्या
घरात असते ताई दरसाल पौर्णिमेला मन
गहिवरून येते,
बहीण नसल्याची सल मनात सलत जाते
मजबूत बांधा असला तरी, मनगट माझं
ढिसूर आहे. बहिणीच्या राखीखातर,
मन अजूनही आतुर आहे मन अजूनही
आतुर आहे.

ही कविता वाचून मी स्तब्ध झालो होतो या कवितेमुळे एक नवीन दृष्टिकोन मला मिळाला.

राजा शिवछत्रपती हि कविता संपुर्ण पराक्रमी इतिहास सांगुन गेली व मी माणुस म्हणून का आहे याचं उत्तर देवून गेली. सोनेरी सूर्य घायाळ
झाला त्या क्षणाला,त्या क्षणाला
शिवनेरीवर, महाराष्ट्राचा
मानबिंदू जन्मला सह्याद्रीच्या
पानापानात, मातीच्या
कणाकणात, महाराष्ट्राच्या
मनामनात, अन्
कालचक्राच्या क्षणाक्षणात
नवचैतन्य निर्माण झालं
महाराष्ट्राच्या मातीचं,
कुलदैवत जन्माला आलं
माँसाहेब जिजाऊच्या साधनेला, हाजीराजेंच्या समिधेला
शिवराय, फळ आलं अन् अवघ्या महाराष्ट्राचं, जन-मन आनंदात
न्हालं आधुनिक पहाट !

ही कविता सध्या लोकांचे ढासळलेलं आरोग्य व दवाखान्यातील वारी, तपासणीच्या नावाखाली होणारी लूट पण अजूनही दवाखान्याला देऊळ, डॉक्टरला देव मानलं जातं ही श्रध्दाच विश्वास ठेव म्हणून सांगते. ही श्रद्धा माझी ही श्रध्दा आहे. बाप कधी निवांत असतो का ? **जिन्याखालचं जिनं लोकल टू ग्लोबल व्हाया संवाद ! काळाचा घाला हसरा बुद्ध ..दासरा माणूस भीमा तुझ्यामुळे आधुनिक रावण रंग बोलके श्रावण सरी ! आनंद शोधता आला पाहिजे ! न्यू वर्ष नव हर्ष किमान मास्तर हवा ! सावधान! घर मुकं होत आहे ! माय मराठी या कविता वाचल्या आणि..**

भावना हाच नियम आणि नियम हीच भावना.भावना हा शक्तीचा स्तोत्र आहे.त्यामुळे एखादी गोष्ट प्राप्त करायची असली तर आपल्या भावना समृद्ध असायला हव्यात. 'मनोविज्ञानाचे गुरू थॉमस ट्रॉवर्ड' यांची प्रखरपणे आठवण झाली. हा काव्यसंग्रह वाचला आणि बाजूला ठेवला.जणू हा काव्यसंग्रह बोरिस पास्तरनाक यांचे खालील वाक्यच सांगत आहे. जगण्याच्या तयारीसाठी नव्हे तर, जगण्यासाठी माणूस जन्माला आला आहे. शेवटी जाता जाता कवी श्रावण सखुबाई रंगनाथराव भवर यांनी जो अट्टाहास केला आहे.आपुलकी,आत्मीयता आपल्या हातून आपल्या डोळ्यादेखत सुटत चालली आहे.हे धरुन ठेवण्याचे कार्य हा श्रावण सर काव्यसंग्रह नक्कीच करेल.

अश्रू म्हणजे मानवाला लाभलेले भावना व्यक्त करण्याचे अनोखे चिन्ह,ॲमिग्डाला जवळच्या विशिष्ट अश्रुग्रंथीमुळे अश्रू निर्माण होतात.रडणाऱ्याला जवळ घेतले,थोपटले किंवा इतर मार्गाने आश्वासन दिले म्हणजे हा भागच हुंदके थांबवतो..

इमोशनल इंटेलिजन्स मधील हा सत्य वैचारिक विचार मांडणारा काव्यसंग्रह आहे.

**विजय कृष्णात गायकवाड, कोल्हापूर**
**9552177474, 7038398787**

# माणुसकी सारी विटली, का करते तिची मी अपेक्षा ?

आधुनिक केसरी

**काय होते? काय झाले? नशिबी मरण आले होत्याचे नव्हते होता मन आज सुन्न झाले... उराशी भव्य स्वप्न इमला बांधून प्रत्येकजण आपला प्रवासाला लागला होता. मनी कधी विचार ही शिवला नसेल की, मी रात्रीतून कायमचा दूरदेशी जाणार? हे माझे शेवटचे बोलणे, शेवटचे खाणे ठरेल? कोणीच कोणाला परत न भेटण्याच्या वाटेवर कायमचे निघून जाणार? जीवंतपणी आपला असा कोंडून, आगीत कोळसा होणार? किती यातना झाल्या असतील त्या देहांना.. काय टाहो फोडला असेल? ते ऐकायलाही तेथे कोणी नाही? लवकरच घटनास्थळी पोहोचूनही परिस्थितीमुळे मदतही करता येईना.. समोरचे विदारक चित्र उघड्या डोळ्यांनी पाहण्याशिवाय बचाव पथकाकडे पर्याय नव्हता. सारे हतबल झाले होते?नियतीने जणू हातचं बांधून ठेवले होते? किती दुःखदायक विदारक घटना प्रसंग.**

दुश्मनावरही अशी वेळ येवू नये. मनात असून हातांनी काही करता येत नाही ? हात बांधले गेले ? काळाने असा विदारक घाला घालावा. किती मोठे दुर्देव. काय वाटले असेल त्या जीवांना.. पूर्वी जसे पती मृत्यू नंतर पत्नीला त्याच चितेवर जिवंतपणी ढकलून, फेकून जाळले जात होते. तिचा टाहो ऐकायला कोणी जात नव्हते ? किंवा ऐकून न ऐकल्यासारखे करत होते तशीच ही घटना.. ना दोष तिचा न त्यांचा ? पण निरपराध्याला शिक्षा.

त्या मन सुन्न करणाऱ्या बातम्या पाहून, आजही अंगावर काटा येतो ? असे किती दिवस घडणार ? हे चित्र कधी बदलणार असेच निरपराध बळी जात राहणार का ? हे चित्र कोठे तरी थांबले पाहिजे ना ? कोणाच्या जीवाशी खेळणे किती धोकादायक ? तुम्ही पैसे कमावण्यासाठी काहीही करणार का ? तुमचा जीव किंमती तसा इतरांचा नाही का ? हृदय हेलवणारी घटना ? मन आहे का नाही ?असेल तर ते मेले का ? डोळ्यांनी ही दिसत नाही का ? कान ही बंद पडले का ? तो टाहो ऐकू येत नाही का ? जीवनाच्या प्रवासात प्रत्येक ठिकाणी नियम असावा ? नियम असेल तर त्याचा फायदा नक्कीच अचूक होतो.भरधाव वेगाने गाडी चालवणे ? डुलकी लागणे, जेवण खूप करून गाडी चालवणे, दारू पिऊन गाडी चालवणे ? काही तरी विचार हवा की नाही ? तुमच्या सोबत इतरांचाही जीव तुमच्या हातात असतो. विश्वास असतो तुमच्या गाडी चालविण्याच्या कौशल्यावर ? कारण त्याही जीवावर अवलंबून असणारे त्यांचे ही कुटुंब असते.

येथे आमची चूक नाही ? असे बोलून प्रश्न सुटतो का ? नशिबाचा खेळ ? आलीया भोगाशी, असावे सादर.. असे बोलून चालते का ? काय झाले त्यांच्या नशिबाला ? हीच जर नियमात गाडी चालवली असती तर अशी घटना घडली असती का ? माणूस आहे ,चुकतो ? पण, किती वेळा चुकावे ? त्याला ही काही मर्यादा असतात ना ? थांबवा हा जीवघेणा अत्याचार ? खाजगी बसचेच असे कितीतरी अपघात होतात ? का होतात ? तरी त्यांना जाब का विचारला जात नाही. लांब पल्ल्याचा प्रवास रात्रीचा सोपा होतो मान्य पण, काही विचारपुर्वक का होत नाही ? व्यवस्थित झोप झालेला,न पिणारा, सुज्ञ, प्रामाणिक ड्रायव्हर असावा ना ? ज्याच्या हातात पूर्ण सूत्र देतो, तो माणूस तर योग्य दर्जाचा असावा की नाही. गाडी चालवणे शक्य होत नसेल तेव्हा थांबणे केव्हाही उत्तमच ना ? त्यावर उपाय करावा ?

समृद्धी महामार्ग किती सुंदर,सरळ महामार्ग... तरी अपघात होतात ? का ? मोठा जीवघेणा प्रश्न आहे ? प्रगती झाली पण, त्याचा काय उपयोग ? अन् किती दिवस हे असे सत्र चालणार ? साहित्याच्या वाटेवर जातांना,तो उघड्या डोळ्यांनी आपण अनुभवला होता हाच मार्ग,



**शब्द शब्द पेरून वाटेवरती**
**फुलविला साहित्याचा मळा**
**माणुसकी, आपलुकी आटून**
**आज कोरा जीवनाचा फळा..**

ज्या मार्गावरून उन्हाळ्यात वर्धा येथे हजारोच्या संख्येने साहित्यिक मराठी साहित्य संमेलनास शब्द रिते करण्यासाठी गेले होते ? त्या महामार्गाचा आस्वाद प्रत्येकाने घेतला होता.अन्, त्याच मार्गावर असा भयाण अपघात होतो ? कोणाच्या मनाला हा प्रश्न का शिवत नाही ? नुसती हळहळ व्यक्त करून उपयोग काय आपल्या लेखणीचा ? या लोकांना, या सरकारला प्रश्न विचारण्यास आपली लेखणी का धजावत नाही ? लाज वाटते का ? का कमीपणा वाटतो ? का भीती वाटते ? आपण काही लिहिले तर त्याचा परिणाम आपल्याला भोगावा लागेलं ?आपल्याला शिक्षा होईल ?प्रेम, निसर्ग, राजकारण, सुखाचे प्रसंग अशा ना प्रसंग, घटना आपण आपल्या साहित्यातून लेख, काव्य, सदर रूपातून मांडत, चालवत असतो ? मग आता काय झाले तुमच्या लेखणीला ? त्या लेखणीला थोडी धार द्या.. अन् शब्दांनी ती तळपवा ? काहीना दुरूनच गंमत बघायला आवडते ?आम्ही तुमच्या दुःखात सामील आहोत. असे बोलून प्रश्न सुटणारा आहे का ? कधी त्या मृत प्रवाशांच्या जागी स्वतःलाही ठेवून पहा, काय वेदना होतात ? काय घडले असेल त्यांच्या बाबतीत. कल्पनाही करू शकणार नाही ? असे तुमच्या बाबतीत तुमच्या कुटुंबाबाबत, मित्र मंडळी, नातेवाईक यांच्या बाबत भविष्यात पुन्हा कधीच घडू नये ? असे वाटत असेल तर आता तरी लेखणी उचला ? अन् व्यक्त व्हा! त्या निरपराध आत्म्यांना शांती द्या. त्यांच्या नातेवाईकांना काही तरी आशा द्या ?सात्वनांचा एक शब्द तरी द्या... अहो, येथे अपराध्याला ही चांगली वागणूक देतात ?त्याची सेवा करतात ? तेथे माणुसकी दाखवली जाते मग, अशा प्रसंगी काय होते ?बोटात लेखणी बसत नाही का ? तिला शब्द फुटत नाही ? का मन धजत नाही ? का मनच नाही ? हृदय धडधड करते ना,तनात एक थेंब रक्ताचा आहे तो पर्यंत जिवंत प्रश्नांवर लिखाण करा हो ? जे जिवंत आहे त्यांच्या साठी ? जे कोणाच्या तरी चुकीमुळे कायमचे जीव सोडून गेले ? त्यांच्या आत्म्याला किती वेदना झाल्या असतील त्या नजरेसमोर आणा ? अहो, एकाच क्षणात निरपराध २५ जीवांचा होरपळून कोळसा होतो ? काय घडले, कसे घडले ? त्यापेक्षा,असे अजून किती दिवस घडणार आहे ? याचा जाब प्रत्येक ट्रॅव्हल्स एजन्सीला विचारला पाहिजेना ? त्यांना अचूक फाईन केली पाहिजे ना ? ठोस, अंतिम निर्णय यावर झालाच पाहिजे. पैसे मोजून ते जीव परत आणता येणार आहेत का ? एकुलते एक लेकरे होती काही ? काहींना आई आहे तर बाप नव्हता.. बाप आहे तर आई नव्हती.. कोणी बापाला, कोणी नवऱ्याला, कोणी मुलांना भेटायला जात होते. साखर झोपेत होते.. मस्त जेवण करून काही शांत झोपी गेले होते ? अन् ती झोप विदारक चिरशांती देवून गेली.

**वर्धा वाटेवर तेव्हा**
**काव्य सुमने सजली**
**समूहाने सारी प्रेते**
**अंती स्मशानी जाळली..**

चिमुकल्यांपासून ते वृध्दांपर्यंतचे प्रवासी डोळ्यात काही स्वप्न घेवून निघाले होते ? त्या स्वप्नांचा अक्षरशः चिरडा झाला. नोकरी, शिक्षण,भेटीसाठी जात असताना ही दुर्घटना घडली. काळाने झडप घातली ? बस सोबत आयुष्याचा, त्या जीवांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या स्वप्नांचा ही कोळसा झाला. राहिली घटनास्थळी फक्त राख ? अन् नातेवाईकांकडे फक्त आठवणी ? जे मुले कुटुंबाचे आधार बनणार होते, त्यांनाच काळाने हिरावले,त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. कोणी थांबवू शकाल का ?त्या दुःखी मातांचा आक्रोश ? सात्वनांचे कोरडे शब्द ही फिके पडतील. आपल्या पोटच्या गोळ्याचा असा दुर्देवी मृत्यू कोण सहन करू शकेल का ?

नाना जाती धर्माचे,पंथाचे लोक एकत्र प्रवास करत होते ? त्यांचा शेवटी बुलढाणा येथे सार्वजनिक अंत्यसंस्कार केला गेला ?त्यांना ना घरचा उंबरा पाहता आला की, ना अंघोळ मिळाली ? काय, कसे अचानक घडले ?

ज्या रस्त्यावर शब्द सुमने उधळीत गेलो, त्याच रस्त्यावर आज निरपराध दूरदेशी गेले.. आपल्या आयुष्यात माणूस म्हणून स्वतः शी तरी प्रामाणिक रहा, तुम्ही नेते नाहीत हो.... साधी माणसे आहात हे तरी विसरू नका ? इतके ही स्वार्थी बनू नका ? रात्रीतून पलटी खाऊ नका ? माणूस आहात तर माणूस म्हणून जगा ना ? हिंस्त्र श्वापद बनू नका ?भावनाशील असावे हो, भावनाहिन जगणे नसते ? तुम्ही सत्तेसाठी/ राजकारण साठी नका धजू, कारण त्यांचा भरवसा कोणालाच देता येणार नाही ? कोण कधी पलटेल याचा भरवसा नाही ? त्यांना ना नाते समजते ना ? ना माणुसकी ? दिसते फक्त खुर्ची, प्रसिध्दी, पैसा ? काय काय घेवून जाणार आहेत वर कोण जाणे ? त्यांना काही फरक पडत नाही ? एकाच घरात एक तोंड इकडे तर दुसरे दुसरीकडे..अशी यांची स्थिती ? कोण नाही त्यांना वाली ? जे फक्त सत्तेचे भिकारी ?लालची ? धूर्त ? विश्वास घातकी ? सरड्यासम वृत्ती ? पण या निरपराध जीवांसाठी तरी लेखणी हाती घ्या ? यांना न्याय मिळून द्या ? पुन्हा असे बळी जाणार नाही ? यासाठी अचूक पावले उचलण्यासाठी ? झाकलेले डोळे उघडण्यासाठी ? वैचारिक, भावनिक, अंजन घालू या....माणुसकी हृदयाहृदयात, रोमारोमात पेरू या..

सर्व मृत् आत्म्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली!!!! असे पुन्हा घडू नये यासाठी हात हाती घेवू या.

**- सौ.प्रतिमा अरुण काळे**
**निगडी प्राधिकरण पुणे**

## आज हम

आज हम बनायेंगे
आषाढी एकादशी,
आज तू भी तो है
भारत मां का रहिवाशी.

मनाओ कल तुम
भाई ईद मिलकर,
सब का यही सपना
प्यार पाओ बांटकर.

ईद क्या दिवाली क्या
क्या नाताळ क्या बुध्द,
ना झगडना धर्म लेकर
ना करना कभी युद्ध.

हम सब एक है
भारतमां के बच्चे ,
सब धर्म का आदर करो
रहो मिलकर दिल से सच्चे.

भगवानने ना अल्लाने
जात धर्म नही बनाया ,
हमने सब मिलकर
जात धर्म को जताया.

क्या लेकर आया है
क्या लेकर जाएगा,
जाते जाते सबजन
ईन्सानियत पाएगा.

क्षमा करना भाई
हम तुम सब है एक ,
मिलजुलकर रहने का
ईरादा रखो सब नेक .
- सुवर्णा पवार,
इचलकरंजी

## वारी इव्हेंट ..



आजम्य ठळकली
मनात विठूची मुरत

वारी जाता पंढरीस
करे उत्साहे स्वागत
घरी जाताना परंतु
कुठेही नाही आगत

जागोजाग आधीची
बसलीकसली पंगत
भूकेपेक्षा अन्न जादा
नसता काही मागत

नेत्यांची मांदियाळी
चालली साथ संगत
गुप्त लुप्त नाटकी ते
आता नाहीत सोबत

संपन्न केला मेळावा
संपली सगळी रंगत
विठ्ठलविठ्ठल म्हणत
होते कित्येक झिंगत

लिफ्ट द्यायले वाहने
मुळीचं नाही थांबत
मिडीयावाले पळाले
प्रवास जातो लांबत

विठूराया मज सोबत
नाव घेत राही चालत
ओढ कार्तिकवारीची
विठोब राहे बोलवत

-- हेमंत मुसरीफ पुणे
9730306996..

## महागाई

ईडा, पिडा सर्व काही जाते
पण महागाई जात नाही
जीवन जगणे अवघड झाले
ते,कोणालाही दिसत नाही

अहो कोणी झाले मालामाल
कोणी आहेत दैनदिन तुपाशी
कोणाला अजूनही घर नाही
तर.. कोणी आहेत उपाशी

आता महागाई वाढली जोरात
बळीराजाच्या मालाला भाव नाही
लाख रूपये पगारवाले सुखी झाले
गोर, गरीबांना कोणाचा आधार नाही

महागाई च्या तडाख्यापायी
जगावे तरी कसे या माणसाने
सांगावे तरी व्यथा कोणाला. . . ?
कोणी ऐकून घ्यावे त्यांचे गाऱ्हाणे

जगणारा आनंदाने जगत असतो
मरणारा महागाईने मरत असतो
ज्यांच्याहाती काम धंदाच नाही
तो, माणूस दररोज मरत असतो

महागाई कमी होणार कधी
कोणी सांगू शकेल का. . . ?
प्रत्येक वस्तू महाग झाल्या
बेरोजगारांना कोणी काम देईल
का. . ?
सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली

## मित्र

ही फक्त मैत्री नसून,
हे मैत्रीच सोनेरी पर्व आहे.
असा जिवलग मिळाला,
याचा खूप गर्व आहे..

भाग्यात नसतो कुणाच्याही,
असा मित्र मिळणं.
गुण उपजत याकड,
मन प्रत्येकाची कळणं..

हात खांद्यावर मित्राचा,
वाटतो आधार मोठा.
दुःखालाही नाही थारा,
नाही आनंदाला तोटा..

होतो अनोळखी आम्ही,
पण झाला तुकडा काळजाचा.
मित्र असा भेटला,
या जीवाला जीवाचा..

येतील खूप, जातील खूप, पण
मित्र तुजसारखा भेटणार नाही.
हृदयातल्या या प्रेमकप्प्यात,
मित्रा तुझी जागा कुणी घेणार
नाही...

कविराज : मनिष आहिरे
सटाणा नाशिक 7588069679

## चिखल

शिवसेनेचा धनुष्य घेऊन
चाळीस व्हराडा संग आली
घड्याळाची टीक...टीक...
करत दुजी नवरी झाली
आता दोन दोन सवती झाल्या
सरकारला दोन दोन सवती
झाल्या
स्वतःची पुरना बाई त्याला
त्याचा इकडे तिकडे डोळा
दोन हातानी दोन दिशाच्या
बायका करतोय गोळा
चिखल केला संसाराचा
उद्या पोरगी कोण देईल ह्याला ..!!
आता दोन दोन सवती झाल्या...
आता सरकारच्या दोन दोन सवती
झाल्या.......
कल्पना मापूसकर
90826 46494



## सूर्योदय

दिवस नवा नवी
किरण ती सोन्याची
होणार वेळ हीआता
सूर्योदयाचे आगमन होण्याची
पहाटे च्या धुक्यां तुनी
एक किरण ती सोनेरी
पडे अलगद निरंतरी
ह्या संपूर्ण सृष्टी वरी
क्षणांत पाहता पाहता ही
हळुवार सारी बहरून गेली
धुक्यांची ही चादर जणू
नाहीशी अशी होऊन गेली
रात्र संपता पहाटझाली
पहाटेच्या धुक्यां नंतर आली
तेजस्वी किरणांनीजणू ही
सृष्टी सारीच न्हाऊनी निघाली
दूर होताच अंधक्कार सारा
लख्ख पडला प्रकाश आता
किरणांचा हा चारही दिशांना
आगमन होताच सूर्य देवाचे
आता
आगमन सूर्य देवाचे ज्या क्षणी
दिशा चारहीलख्ख उजाळली
तेजस्वी सुर्य-किरणे पाहुनी ही
जीवसृष्टीसारी प्रफुल्लित झाली
तेजस्वी ह्या किरणांनी सर्वांसी
मिळाली एक उमंगनवी
जगण्याची जीवसृष्टी ही करणार
सुरवात पुन्हा नव्यादिवसाची
अन नव्या आयुष्याची
- तुषार राजेश लाखे.
वरोरा, जिल्हा चंद्रपूर

## घड्याळभाऊ



घड्याळभाऊ घड्याळभाऊ
गुण तुझे किती गाऊ
रात्रंदिवस तुझे
काटे लागतात धावू

तुझ्या तालावर
सर्वांची चालते धावपळ
तू बंद पडला की
होते सारी तारांबळ

ना तुला थकवा
ना तुला आराम
सर्वांना मंत्र देतोस
सतत करण्याचे काम

रात्रदिवस तुझी
सदा टिक् टिक् चाले
कंटाळा न करता
लोंबता लंबक हाले

काचे मधून चमकतात
अंक तुझे बारा
वेळेची महती सांगणारा
मित्र आमचा तू खरा

- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## "भावगीत"

मन हे असे बहरून जाते
मन हे असे लहरत जाते
मन हे असे विहरत जाते
मन हे असे मोहरून जाते
मन हे असे बहरून जाते
रेशीम क्षणांचे अबोल नाते
मिठीत क्षणांच्या मिटून जाते
दुनियेत स्वप्नांच्या फिरून येते
प्रेमळ स्पर्शाने मोहून जाते
मन हे असे बहरून जाते
ह्रदयाची हाक ती ऐकून येते
स्पंदने मनाची सांगून जाती
नयनांच्या प्रेमात तल्लीन होते
प्रेमाच्या खेळात बहरून जाते
मन हे असे बहरून जाते
नवी नवी ती रोजची पहाट
फुलवित जाते जीवनवाट
अंगावर घेत ती सागरलाट
बहरून जाते तारूण्य पहाट
मन हे असे बहरून जाते
- मधुकर ए. निलेगावकर
९४२१३७५६९१

## माणूस पेरुन पाहीन

संसाराच्या सूपामधी
आयुष्य फटकून पाहीन
समाजाच्या जात्यामधी
संस्कार दळून पाहीन
या स्वार्थी दुनियेत पुन्हा एकदा
माणूस पेरुन पाहीन

उंच टेकडावर जाऊन
उभा राहून पाहीन
येत का आभाळ मिठीत
हात पसरुन पाहीन
या स्वार्थी दुनियेत पुन्हा एकदा
माणूस पेरुन पाहीन

आपल्यांसाठी पुन्हा एकदा
उंचावरुन ढसळून पाहीन
झडल्या झाडाला
नविन पालवी फुटण्याची वाट
पाहीन
या स्वार्थी दुनियेत पुन्हा एकदा
माणूस पेरुन पाहीन

लक्ष्मण वाल्डे कन्नड
जि.संभाजीनगर
मो.नं-888860606

## मातीचं सपानं

पावसात विज न्हाली
कोऱ्या मातीचं सपानं
आभाळाला दिसामाजी
आलं उधाणं उधाणं !

गेला कर्कश्य वैशाख
त्याची चितारली गोष्ट
एका सरीच्या धारेनं
भुई आक्रंदते तिष्ठ !

बीज रुजवात येता
नऊ दिस बारा मास
उभ्या खरीप पिकाला
आहे पावसाळा खास !

झाली गर्भार धरणी
तिची उजवली कुस
माझ्या घायाळ पाखरा
नको दूर तू जाऊस !

आई अवनी सारखी
मेघ मल्हाराची सून
रानी वनी बरसते
सखा श्रावण घेऊन !

येतो रोज पावसाळा
आता कशास मिजास
तुज पाहता साजणी
सूर प्रभास प्रभास !

©प्रदीप बडदे, नवी मुंबई
मो. 9594027995

## दळभद्री राजकारण

राजकारणात कुणीच कुणाचे
बाप लेक असत नाही...
आणि सत्तेसाठी कोण केव्हा बाप
बदलेल याचा काही नेम नाही
निवडणुकी दरम्यान हे भर सभेत
एकमेकांविषयी गरळ ओकतात
आणि सत्तेसाठी पुन्हा एकमेकांच्या
गळ्यात गळे घालून फिरतात
जाती धर्मात विष कालवून समाजात
तेढ निर्माण करणे यांचे आद्य कर्तव्य असते
यांच्या अक्षम्य गुन्ह्याकडे न्याय देवताही
दुर्लक्ष करुण डोळ्याला पट्टी बांधून असते
या दादा,भाऊ,काका, मामासाठी
कार्यकर्ते जीव द्यायला ही तयार असतात
आणि यांच्या एका शब्दावर जीवघेणे
गुन्हे करायला ही तयार असतात
करोडोचे घोटाळे,भ्रष्टाचार करुण
ही यांच्यावर गुन्हे सिद्ध होत नाही
यांच्या भांडनात मरतात ते केवळ कार्यकर्ते
यांच्या मुलांना साधी ईजा ही होत नाही
वरुण खोटे खोटे राजकारण
आतून असते यांची पक्की मैत्री..
सत्तेसाठी नैतिकतेला तिलांजली
दलबदलुपना हीच यांची खात्री..
स्वातंत्र्या नंतरही ना इथे रस्ते सुधरले,
ना सोई सुविधा वाढल्या, ना महिलां वरचे
अन्याय कमी झाले ना शेतकरी खऱ्या
अर्थाने झाला राजा...
यांनी भरली केवळ यांचीच घरे
आमदार, खासदार यांचीच बायका पोरे
पोखरुण भारतास करुण हवालदिल
यांनी वाजविला जनतेचा बाजा...
अर्थात या परिस्थितीला त्यांच्यापेक्षा
आपणच असतो जास्त जबाबदार..
हजार पाचशेत विकुन स्वतची
अनमोल मते पाच वर्षे बसतो आपण गप्प गार....!
प्रवीण दाभाडे पाटील,कन्नड

## पाऊस

वर पाहता आभाळी ।आला दाटूनिया ऊर ॥
ऐकू येई ढगांतुनी ।तीव्र नाराजीचे सुर ॥
एका एका थेंबासाठी ।इथं आसूसला जिव ॥
तरी तरी नाही कशी । येत पावसाले किव ॥
वाट पाहता पाहता ।मनी माजला कल्लोळ ॥
अरे पावसा वाचुनी ।झाला झाला सारा घोळ ॥
शेत तहानलं माझं । रोज करी पाणी पाणी ॥
सांग पावसा तूझ्यावं । कुणी केलीय करणी ॥
सुटे गार गार वारा ।ढग पळती पळती ॥
काळी मेंढरं देवाची ।कोण मेंढके हाकती ॥
आलं भरून आभाळ ।आशा दाटलीय मनी ॥
बळी पाहतोय वाट । रोज रोज चात्कावाणी ॥
अरे अडली पेरणी ।आता तुलाच काळजी ॥
पड पडना पावसा ।शेत पिकू देना माझी ॥
कविराज: मनिष आहिरे
सटाणा नाशिक 7588069679



## पावसाची मनमानी

आतुरली धरनी माता ढगा तुझ्या कोऱ्या थापा ||धु||
आभाळा तुला धरनी चा नाही उरला धाक आता
आतुरली धरती.... ढगा तुझ्या..... ॥धु॥
कोपतो सूर्य देव जीवाची होते लाही!
तापलं रान सार भेगाळ ली माता भुई !!
उनाड रान वारा हिंडतो गाणं गाता ||धु||
पाखंर केविलवानी हिंडती रानो रानी !
उदर भरावया शोधिती चारा पाणी !!
धाळीतो अश्रु मोर नाचता नाचता ||धु||
गायी गुर पाण्याविना हंबरती व्याकुळवाणी !
कारे मुक्या जीवा कोपतो तुजा धनी!!
टाहो फोडी चातक वाट थेंबाची पाहता ||धु||
राबत्या आई-बहिणी कष्टाला अंत नाही!
हंडा भर पाण्यासाठी हिंडत्या दिशा दाही !!
कवी भावले विनविती नको पाहू अंत आता ||धु||
आतुरली धरती....ढगा तुझ्या.....
लेखक : आप्पाराव रावणराव भावले,
गंगापूर (ज) मो. 9960224415

# श्री समर्थ वाग्देवता मंदिराचा अभिनव रामायण प्रकल्प




डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राचे सांस्कृतिक भूषण असलेल्या काही अग्रणी संस्थांमध्ये खान्देशातील धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळ व श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर या दोन संस्थाचा विशेषत्वाने समावेश करावा लागतो. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी त्यांच्या संशोधन कार्याचे मध्यवर्ती केंद्र हे धुळे शहर व जिल्हा ठरवले. तसेच समर्थ रामदासांच्या समग्र साहित्याचे संकलन व प्रकाशन करण्याचे ऐतिहासिक कार्यही याच निष्ठेने कै. नानासाहेब देव यांनी स्थापन केलेले श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर करत आहे. या दोन्ही संस्थाकार्यात एक समान सूत्र असे आहे की छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्य उभारणीचे वैचारिक अधिष्ठान भक्कम करणारी दुर्मिळ कागदपत्रे व साहित्य यांचा संग्रह या दोन्ही संस्थांनी योजकतेने संग्रहित आहे. चिवटपणा, सातत्य आणि चिकाटी हे धुळ्याच्या मातीतले गुण या दोन्ही संस्थांनी जोपासले आहेत. म्हणूनच या संस्था ही अफाट कामे करू शकली आहेत. समाजाच्या सामर्थ्यातून एका करांगुलीवर गोवर्धन पर्वत उचलण्यासारखाच हा प्रयत्न होय. समर्थ रामदासांनी नाशिक जवळ टाकळी येथे वाल्मिकी रामायणाची दुर्मिळ प्रत मिळविली आणि ती सात खण्डामध्ये स्वहस्ताक्षरामध्ये वयाच्या चौदाव्या वर्षी लिहून ठेवली, हा एक विक्रमच म्हणावा लागेल.**

धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिराच्या वतीने हे सर्व सात खंड प्रकाशित होत असून उभ्या जगातील अभ्यासकांना संशोधनासाठी ते



उपलब्ध होत आहेत, ही अत्यंत समाधानाची बाब होय. परंपरेत साजेसे कार्य : समर्थ रामदासांनी स्वतः दैववादावर नव्हे तर प्रयत्नवादावर भर दिला. त्यांनी असे म्हटले होते की, 'समर्थाने समर्थ करावे । तरीच समर्थ म्हणवावे ।। त्रैलोक्यासी पडिले ठावे । सामर्थ्य ज्याचे ।' हेच सूत्र हाती घेऊन समर्थ वाग्देवता मंदिर पहिल्या दिवसापासून कार्य करीत आहे. ही संस्था समर्थ रामदासांच्या ध्येयवाद आणि तत्वज्ञानावर श्रद्धा ठेवून गेल्या शतकापासून कार्यरत आहे. लैकिकार्थाने या संस्थेची स्थापना १९३५ साली झालेली असली तरी तिचे कार्य हे १९०५ पासूनच सुरू झालेले होते. मराठवाडा अथवा पश्चिम महाराष्ट्र या समर्थांच्या जन्मभूमी व कर्मभूमीऐवजी हे कार्य धुळ्यामध्ये खान्देशात व्हावे, यामागे स्थानिक परंपरेचा प्रवाह आहे. धुळे शहरात १९३५ साली स्व.शंकर श्रीकृष्ण देव उर्फ नानासाहेब यांनी समर्थ रामदास स्वामी व रामदासी संप्रदायाच्या साहित्याचा संग्रह, संशोधन व प्रसार करण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना केली. वारा खात, गारा खात जांभुळझाड उभे असते तशी ही संस्था संकटातही प्रतिकूल परिस्थितीवर मात करून भक्कमपणे उभी आहे. या संस्थेच्या उपक्रमामध्ये साहित्य संकलन, संपादन व प्रकाशनाप्रमाणेच समर्थांच्या विचारांचा निष्ठेने प्रसार करण्याचे कार्यही निरंतर आणि अव्याहतपणे गतीने पुढे सरकत आहे. समर्थ रामदासांनी संपादित केलेल्या 'वाल्मिकी रामायण सात खंडाचे प्रकाशन' हाही या पूर्वपरंपरेप्रमाणेच संस्थेचा स्तुत्य उपक्रम होय यात शंका नाही. संस्थेचे अक्षर **लेणे :** 'तीळाचे तेल, कापसाची वातत, दिवा जळू दे सारी रात!' या काव्यपंक्तीप्रमाणे समर्थ वाग्देवता मंदिराचे सेवाकार्य व इतर प्रकारचे कार्य अत्यंत जिद्दिने आणि तेवढ्याच निष्ठेने चालू आहे. समर्थांनी वाल्मिकी रामायणाची प्रत सात खंडामध्ये परिष्कृत करून लिहून काढली हा त्यांच्या प्रगाढ श्रीरामनिष्ठेचा परिपाक होय. त्यामुळेच हे अचाट कार्य ते करू शकले. संत साहित्याचा अभ्यास हा सर्वसामान्यांना प्रेरक व स्फूर्तीदायक ठरतो, हे सूत्र घेऊन नानासाहेब देव यांनी समर्थ वाग्देवता मंदिराची संकल्पना विकसित केली. अनंत यातना, हालअपेष्टा व कष्ट सोसून त्यांनी देशभरामध्ये विखुरलेले समर्थ रामदासांचे साहित्य एकत्र केले. संग्रहाप्रमाणेच संकलन आणि संपादन व त्यानंतर प्रकाशन हाही त्यांच्या दूरदृष्टीचा एक भाग होता. नानासाहेब देव मूळचे विदर्भातले. त्यांच्या जीवनकार्यावर लोकमान्य टिळकांचा विलक्षण प्रभाव होता. त्यांना विदर्भातले टिळक म्हणून ओळखले जात होते. सन १८९३ साली त्यांनी 'सत्कार्योत्तेजक सभा' नावाची संस्था स्थापन केली होती. त्यांनी धुळ्यामध्ये स्थापन केलेल्या समर्थ वाग्देवता मंदिर ही संस्था म्हणजे टिळकयुगातील स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग होता. समर्थ रामदासांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या कार्याशी निगडीत कागदपत्रे, साहित्य, पुराभिलेख, पुराणे अर्धकाव्य तसेच कला व संस्कृतीशी निगडीत पुराणवस्तूंचा संग्रह करण्याच्या संकल्प सिद्धीस नेला. इतिहास, भाषाशास्त्र, संगीत, आयुर्वेद, व्यवस्थापन इ. पैलूंशी निगडीत साहित्याचेही संकलन त्यांनी सुरू केले. देव यांनी संग्रहीत केलेल्या अक्षय सामुग्रीमध्ये वाल्मिकी रामायण हे हस्तलिखित सर्वात जुने व दुर्मिळ ठरले.

**कथा वाल्मिकी रामायणाची :** समर्थ रामदास आसनगाव सावधान, जि. जालना येथून पलायन करून गोदाकाठी टाकळी गावी पोहोचले. तेव्हा त्यांना तेथे मठ स्थापन करण्यात वेदू पाटील व महादू पाटील या दोघांनी सहाय्य केले. टाकळीच्या मठात स्नान केल्यानंतर नित्य अभ्यासाला बसणे हा समर्थांचा नेम होता. त्यांनी १६२२ साली टाकळी मठामध्ये बसून हे हस्तलिखित लिहिले. वाल्मिकी रामायणातील बाल, अयोध्या, अरण्य, किष्किंधा, सुंदर आणि शेवटचा उत्तर कांडापर्यंतचा सर्व भाग समर्थांनी परिसृत केला आहे. समर्थांची सुंदर, वेधक व सुबक अक्षरवाटिका ( कॅलीग्राफी ) ही अत्यंत मनोहर व प्रभावी आहे. या ग्रंथाला अंतिम रूप देण्यामध्ये व त्याच्या इंग्रजी, हिंदी, मराठी अनुवादासाठी देशातील 80 विद्वानांनी आपले योगदान दिले आहे. तसेच वाल्मिकी रामायणाच्या इंग्रजी अनुवादाचे मौलिक कार्य संभाजीनगरचे निवृत्त न्यायमूर्ती अंबादास जोशी यांनी केले आहे. त्यांच्या अव्वल इंग्रजीचा अविष्कार या ग्रंथात झाला आहे. प्रत्येक खंडाच्या प्रारंभी समर्थ रामदासांनी काढलेली समर्पक चित्रे हाही 'हस्तलिखितातील लघुचित्रकलेचा ' एक उत्कृष्ट नमुना होय. मराठा चित्रशैलीतील त्यांच्या लघूपोथीचित्रांचे अद्याप संशोधन व्हायचे आहे. वाल्मिकी रामायणातील मध्ययुगीन भारतातील ही एक विश्वासार्ह सत्यप्रत आहे. त्यातील सूक्ष्म बारकावे या संपादनातून समोर आले आहेत. एकूण ७ खंडातील सहा हजार पृष्ठांचा हा मजकूर आता इंग्रजी भाषेतही अनुवादीत केला आहे. त्यामुळे त्याचे वैश्विक संशोधनमूल्य वाढले आहे. या सात खंडाच्या प्रकाशनामुळे समर्थांचे प्रेरणास्रोत असलेल्या प्रभूरामचंद्रांच्या कार्याविषयी नवा प्रकाश पडू शकेल. तसेच या महाकाव्याचे कर्ते महर्षि वाल्मिकी ऋषी यांच्या जीवनकार्याशी निगडीत काही तथ्येसुद्धा नव्याने उजेडात येवू शकतील. समर्थ वाग्देवता मंदिरात ५००० अप्रकाशित बाडे आहेत.




छत्रपती शिवाजी महाराजांची ७ पत्रे उपलब्ध आहेत व ती प्रकाशित करण्यात आली आहेत. ताडपत्रे, ताम्रपत्र तसेच पोथ्या आणि दुर्मिळ चित्रांचा अद्भूत संग्रह हेही वाग्देवता मंदिराचे वैशिष्ट्य होय. छत्रपती संभाजी व राजाराम महाराजांच्या चरित्रविषयक इतिहासाची सामुग्री, कागदपत्रे, बखरी येथे आहे. पंचरत्न गीता, एकनाथी भागवत तसेच देवांचा गांधी- सावरकरांशी झालेला पत्रव्यवहार, लोकमान्य टिळकांनी दिलेली गीतारहस्याची प्रत, ही सामुग्रीही धुळ्याच्या या संशोधन केंद्रात उपलब्ध आहे. समर्थ रामदासांच्या साहित्यातील सर्वात जुने असे मौलिक वाल्मिकी रामायण सात खंडामध्ये प्रकाशित करून ते एकविसाव्या शतकामध्ये सर्वांना उपलब्ध करून देण्याचे श्रेय समर्थ वाग्देवता मंदिराच्या विश्वस्तांना जाते. त्यांनी तन, मन, धन समर्पित करून तसेच लोकसहभागातून कल्याणकारी निधी उभारून हा प्रकल्प साकारला आहे. तसेच ह्या प्रकल्पासाठी भारतातील अनेक नामांकित संस्कृत पंडित तसेच प्राच्यविद्या अभ्यासकांनीमराठी भाषा पंडितांनी या सामुग्रीच्या संपादनाला अद्यतन रूपासाठी पूरक योगदान दिले आहे. त्यांचा हातभार लागला नसता तर हे महाकाय संशोधन साकार होऊ शकले नसते. त्यांच्या कार्याचे पोवाडे महाराष्ट्राची भावी पिढी सदैव गात राहील. ह्या सात खंडांच्या प्रकाशनामुळे महाराष्ट्राच्या ज्ञानपरंपरेचा एक श्रेष्ठ व पवित्र वारसा पुनश्च जगासमोर येत आहे. संस्थेच्या वतीने 'रामदास रामदासी' हे त्रैमासिक देखील प्रकाशित केले जात आहे. लोकमान्य टिळकांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन सत्कार्योत्तेजक सभा स्थापन करणाऱ्या व त्यातून समर्थ वाग्देवता मंदिर उभारणाऱ्या नानासाहेब देव यांच्या कार्याचे गुणगान गावे तेवढे कमीच आहे. महाराष्ट्र सारस्वतामध्ये एखाद्या मणिकौस्तुभाप्रमाणे चमकणारे समर्थ रामदासांचे कार्य आजही अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करण्यासाठी तेवढेच पथदर्शक ठरले आहे.

# वाघ: मार्जार कुळातील प्राणी



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतात वाघाची शिकार करणे हा दंडनीय अपराध आहे. एके काळी पश्चिमेस पूर्व अँटोलिया प्रदेशापासून अमूर नदीपात्रात आणि दक्षिणेस हिमालयाच्या पायथ्यापासून सुली बेटांच्या बालीपर्यंत सर्वत्र पसरले होते. २०व्या शतकाच्या सुरुवातीस वाघसंख्या कमीतकमी ९३ टक्के होती. सद्या ऐतिहासिक श्रेणी गमावली आहे, पश्चिम व मध्य आशियात, जावा व बाली बेटांमधून, आग्नेय, दक्षिण आशिया आणि चीनच्या मोठ्या भागात उधळली गेली आहे. आजची वाघश्रेणी खंडित आहे, भारतीय उपखंड आणि सुमात्रावरील सायबेरियन समशितोष्ण जंगलांपासून ते उप-उष्णकटिबंधीय व उष्णकटिबंधीय जंगलांपर्यंत पसरलेली आहे. सन १९८६पासून त्याला आययूसीएन रेड लिस्टमध्ये- धोक्यात घातलेले म्हणून सूचीबद्ध केले आहे.**

सन २०१५पर्यंत जगातील वाघांची संख्या ३०६२ असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. २०व्या शतकाच्या सुरुवातीला जवळजवळ दहा लाख इतकी संख्या असून उर्वरित बहुतेक वाघसंख्या एकमेकांपासून वेगळी होऊ लागली. ती घटण्याच्या मुख्य कारणांमध्ये निवासस्थान नष्ट करणे, निवासस्थान खंडित करणे आणि शिकार करणे समाविष्ट आहे.

जो वाघ माणसांना आपले नेहमीच भक्ष्य बनवतो त्याला नरभक्षक वाघ असे म्हणतात. माणूस हा वाघांचे नैसर्गिक भक्ष्य नाही. वाघ माणसांशी संपर्क टाळतो. जर चुकून एखादा माणूस स्वरक्षणार्थ वाघाकडून मारला गेला तर त्याला नरभक्षक म्हणणे चुकीचे आहे. जो वारंवार माणसांवर हल्ले करून माणसांनाच आपले भक्ष्य बनवतो असाच वाघ नरभक्षक होय. अशा वाघांचे अनेक किस्से आजही घडतात, खासकरून सुंदरबनच्या जंगलात. फक्त तेथिलच वाघ असे का ? हा प्रश्न बऱ्याच काळापासून सतावत आहे. तेथील अत्यंत प्रतिकूल नैसर्गिक परिस्थिती व खाऱ्या पाण्यामुळे तेथील वाघ माणसांबाबतीत आक्रमक झाले असावेत, असा अंदाज आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात उत्तरांचल राज्यात अनेक घटना घडल्या होत्या. त्यावर जिम कोर्बेट यांची नरभक्षक वाघांवरील मालिका प्रसिद्ध आहे. सन १९४०च्या दशकात पुण्याजवळील भीमाशंकरच्या जंगलात शंभरच्या वर माणसे एका वाघाने मारली होती. तो नरभक्षक बनण्याची अनेक कारणे आहेत. वृद्धपणा, जखमांमुळे इतर शिकार साधताना येणारे अपयश किंवा काही पूर्वानुभव इत्यादी. कोर्बेट यांच्या मते उत्तरांचलमध्ये मानवी मृतदेहांना नदीत वाहून अत्यंसंस्कार करण्याची प्रथा होती, असे आयते भक्ष्य खाण्यामुळे तेथील वाघ नरभक्षक बनत, असा अंदाज होता. वाघ हा मार्जार कुळातील प्राणी असून भारताचे राष्ट्रीय चिन्ह आहे. या कुळातील सर्वात मोठा प्राणी म्हणून त्याची गणना होते व अन्न साखळीतील सर्वात टोकाचे स्थान तो भूषवतो. वाघ या नावाची व्युत्पत्ती संस्कृत मधील व्याघ्र या शब्दावरून आली आहे. इंग्रजीत वाघाला टायगर असे म्हणतात. मराठीत भल्या मोठ्या वाघाला ढाण्या वाघ म्हणतात. वाघ हा शिकार करण्यात परिपक्व आहे. वाघाचा आकार हा स्थानिक परिस्थितीप्रमाणे कमी जास्त असतो. सायबेरीयन वाघ हा आकाराने मोठा असतो, तर भारतीय वाघ त्या मानाने कमी भरतो. सायबेरीयन वाघ हा लांबीला ३.५ मीटरपर्यंत भरतो तर त्याचे वजन ३०० किग्रॅपर्यंत असते. हा अपवाद झाला, परंतु १९०-२०० सेमीपर्यंत लांब असतात व त्यांचे सरासरी वजन २२७ किग्रॅपर्यंत असते. भारतीय वाघ साधारणपणे वजनात १०० ते १८० किग्रॅपर्यंत भरतो. मादी ही नरापेक्षा लहान असते. सुमात्रा मधील अजूनच लहान असतो. व त्यांची ओळखण्याची सर्वात मोठी खूण त्यांचे अंगावरचे पट्टे व तांबूस रंगाची फर असते. प्रत्येकाच्या अंगावरील पट्टे हे वेगळे असतात. जसे प्रत्येक माणसाचे ठसे वेगळे असतात. यावरून त्यांना ओळखता येते. त्याच्या अंगावर साधारणपणे शंभरपर्यंत पट्टे असतात. पट्ट्यांचा मुख्य उपयोग त्याला दाट झाडींमध्ये अदृश होण्यासाठी होतो. पट्ट्यांबरोबरच प्रत्येकाच्या पंज्याची ठेवणही वेगळी असते. त्यांची पारंपारिक गणना पंजाच्या ठश्यांवरूनच होते. पंजा हा त्याच्या आकाराच्या मानाने खुप मोठा व अतिशय ताकदवान असतो. त्याचा व्यास साधारणपणे ६ ते ८ इंच इतका भरतो. जंगलातून फिरताना जरी दिसला नाही तरी त्याचे ठसे दिसू शकतात. शिकार साधण्यासाठी त्यांचा जबडा जबरदस्त ताकदवान असतो व तो वर-खाली फिरतो. जबड्याची ताकद भक्ष्यामध्ये सुळे रुतवण्यासाठी तसेच भक्ष्याला पकडून ठेवणे, ओढून नेणे या कामासाठी वापरतो. त्याची सर्वात जास्त ताकद त्याच्या जबड्यात असते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ते पट्टीचे पोहोणारे आहेत, म्हणजे त्यांची पोहोण्याची क्षमता चांगलीच असते. या बाबतीत मांजरांपेक्षा त्याची वेगळी सवय आहे. त्यांना पाणी आवडते. उन्हाळ्याच्या दिवसात वाघ पाण्यात तास न्



तास डुंबून स्वतःला थंड ठेवतात.

भारतात प्राचीन काळापासून वाघाची शिकार होत आहे. त्याची शिकार हे शौर्याचे प्रतीक मानले जायचे. आपल्या दिवाणखाण्यात वाघाची कातडी असणे, मानाचे लक्षण होते. त्याच्या कातडी बरोबरच वाघनखे गळ्यात असणे प्रतिष्ठेचे होते. त्याच्या शिकारीसाठी मोठमोठे हाकारे दिले जायचे. त्याला चहूबाजूने वेढा देऊन त्याची शिकार केली जात असे. यात बरेच लोक सामील होत. तसेच बरेच हत्ती, घोडे असा ताफ्यांचा समावेश असे. त्यामुळे त्याची शिकार ही फक्त राजेलोकांपुरती मर्यादित होती. भारताच्या ब्रिटिश राजवटीत त्याच्या शिकारीत आमूलाग्र बदल झाला. बंदुकिसारखे शस्त्र माणसाच्या हातात पडल्यामुळे दुरूनही सावज टिपता येऊ लागले व त्याचा वाईटकाळ सुरू झाला. ब्रिटिश काळात खास त्याच्या शिकारीसाठी अभयारण्ये स्थापली गेली. अनेक महान शिकारी या काळात उदयास आले. त्याची शिकार झाडाखाली एखादे सावज बांधून वर मचाणवर बसून करत अथवा हाकारे देऊन साधत. त्याची शिकार करणे हे धाडस न बनता एक खेळ बनला- इंग्रजीत गेम म्हणजे खेळ असाच अर्थ आहे. अनेक शिकाऱ्यांच्या कथनामध्ये काही काळानंतर त्यांना शिकार करणे हे व्यसनासारखेच जडले होते, अशी कबुली देतात. त्यांच्या नैसर्गिक वसतिस्थानावर मानवाचे बहुतांशी अतिक्रमण झाले आहे. जेथे वाघ एकेकाळी सुखेनैव नांदत त्याजागी, शेती, उद्योगीकरण, रस्ते, धरणे, गावे वसली. यामध्ये वाघांच्या वसती स्थानाबरोबरच भक्ष्यही नाहीसे झाले व अनेक ठिकाणी त्यांचे पाळीव प्राण्यांवरील हल्ले वाढले. वाघ पाळिव प्राणी खातो; म्हणून तो नको, असा व्याघ्रप्रकल्पांच्या अजूबाजूच्या गावात अजूनही सूर असतो. ब्रिटिशपूर्व काळात वाघांची शिकार बहुतकरून याच कारणासाठी होत असे. त्याच्या शिकारीवर बंदी आल्यानंतर या वाघद्वेष्ट्यांनी त्याने मारलेल्या भक्ष्यामध्ये विष घालून त्याच्या शिकारीचा सपाटा लावला होता. २०व्या शतकाच्या सुरुवातीस भारतात एक लाख वाघ होते, असे काहींचे म्हणणे आहे. भारतात शेकडो शिकारी होते व आहेतही. ज्यांनी शंभराहून अधिक वाघ मारले होते. त्यामुळे हा आकडा खरा असण्याची शक्यता नाकारता येत नाही.


वाघांच्या शिकारीचा इतिहास वाघांच्या दृष्टीने रक्तरंजीत असला तरी त्यातील काही शिकारी हे आजचे टोकाचे वाघमित्र बनले आहेत. चोरटी शिकार आजही चालू असली तरी भारतात एकेकाळी मोठ्या प्रमाणात शौकासाठी चालणारी वाघांची शिकार आज जवळपास इतिहास झाला आहे, हीसुद्धा समाधानाची बाब आहे. तरीही अधूनमधून संजय दत्त, सलमान खान यांसारखी प्रकरणे बाहेर येत असतात. म्हणून त्यास वाचविण्यासाठी दि.९ जुलै १९६९ रोजी भारत सरकारने त्यास राष्ट्रीय प्राणी घोषित करून शिकारीला प्रतिबंध घातला. वाघांचे महत्त्व हे संपूर्ण निसर्गसाखळीत अनन्यसाधारण आहे. वाघ हे अन्न साखळीतील टोकाचे स्थान भूषवतात. त्याचा अर्थ त्यांच्यापेक्षा नैसर्गिक क्षमतेमध्ये वरचढ शिकारी नाहीत. ते इतर प्राण्यांची शिकार करून जगतात, मुख्यत्वे तृणभक्षक प्राणी. गवत हे सर्वत्र उपलब्ध असल्याने तृणभक्षक प्राण्यांची संख्या भराभर वाढते. वाघांचे निसर्गात सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे या प्राण्यांची संख्या नियंत्रणात ठेवणे होय. तो नसेल तर या प्राण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढेल व इतर निसर्गसंपदेवर या गोष्टीचा ताण पडेल. त्याने निसर्गचक्र बिघडून जाईल. तो जंगलात असणे हे जंगलाच्या स्वास्थाच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. वाघोबा असलेल्या जंगलात साधे लाकूडतोडे व जंगलावर अवलंबून असणारे लोक भीतीपोटी जात नाहीत आणि जंगल सुरक्षित राहते. वाघ नाहीसे झालेली जंगले साफ होण्यास वेळ लागत नाही, असा आजवरचा अनुभव आहे. जंगलतोडीने होणारे निसर्गचक्राचे दुष्परिणाम आज जागतिक तापमानवाढीने दिसतच आहेत.

# चिखलीकरांचा जनता दरबार की, निवडणुकीसाठी स्टंट

## समस्यांचा अक्षरशः पाऊस; मात्र निराकारणाचा दुष्काळ

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**



**धर्माबाद :** नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे शुक्रवारी (ता.७) विविध विकासकामांच्या भूमिपूजनासाठी धर्माबादच्या दौऱ्यावर आले होते. त्यांच्या दौऱ्यात भरगच्च कार्यक्रमाचे नियोजन केले होते. माहेश्वरी भवनात दुपारी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते.प्रशासनाच्या लालफीतशाहीत अडकलेल्या आपल्या समस्या सुटतील या आशेने लोक शेकडो समस्या घेऊन दरबारात हजर झाले. मात्र तीन वर्षांपूर्वीचाचा कित्ता गिरवत खासदारांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.व लेखी उत्तर देण्याच्या सूचना दिल्या. मात्र तीन वर्षांपूर्वीही असाच जनता दरबार भरला होता. त्याचे पुढे काय झाले हे गुलदस्यात असताना हा नवा दरबार भरविण्यात आला. तालुका प्रमुखच्या नियोजन अभावी बराच गोंधळ झाल्याची चर्चा आहे. याप्रसंगी त्यांनी पत्रकार परिषद घेतली होती. ही पत्रकार परिषद चांगलीच गाजली असून काही प्रश्नांना चिखलीकरांनी सडेतोड उत्तरे दिली.तर काही प्रश्नांची टोलवा - टोलवीचे उत्तरे दिली.तर काहीवर मौन राहणे पंसद केले होते. सर्वात जास्त महत्वाचा मुद्दा हा धर्माबाद शहरातील रेल्वे लाईनवरील उड्डाणपुलाचा आहे.प्रामुख्याने धर्माबाद शहराची विभागणीच मुळात रेल्वे लाईनमुळे झाली आहे. शहरात प्रवेश करायचा झाल्यास किंवा शहरातून बाहेर पडून आपल्या गावाकडे, शेतीकडे जायचे झाल्यास रेल्वेपटरी ओलांडवीच लागते. त्यात रत्नाळी, बाळापूर व गेट क्रमांक दोन या ठिकाणी रेल्वे पटरीवरील दुरुस्तीचे काम व वाढत्या रेल्वेची संख्या यामुळे तेथे ताटकळत राहावे लागते. किंवा कधी - कधी हा मार्गच बंद केला जातो. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी २४ जानेवारी २०२१ रोजी धर्माबाद शहरातील रेल्वे मार्गावरील उड्डाण पुल व भुयारी मार्गांसाठी १७० कोटी रुपयांच्या विकास कामांचे भूमिपुजन केले होते. या कामाचे श्रेय कोणाचे ? यावरून खासदार प्रतापराव चिखलीकर आणि पालकमंत्री अशोकराव चव्हाण यांच्यात कलगीतूरा रंगला होता. हे वाकयुद्ध काही संपण्याचे नाव घेत नाही. रेल्वे उड्डाणपूलच्या अनुषंगाने पत्रकारांनी प्रश्न विचारले असता चिखलीकरांनी पुन्हा एकदा अशोकरावांना डीवचले असून अशोकराव चव्हाणांनी केलेल्या भूमीपूजनाला काहीही अर्थ नसून कारण शिंदे व फडणवीस यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर बाळापूर रेल्वे उडानपुलासाठी ५७.५३ लक्ष तर आतकूर उड्डाणपुलासाठी ५२ कोटी ५१ लक्ष तीन हजार रुपयांचा निधी दिला आहे. अशोकरावांनी धर्माबादकरांना केवळ चॉकलेट दिले आहे अशी त्यांनी खिल्ली उडविली. भाजप, शिवसेना (शिंदे गट) राष्ट्रवादी (अजित पवार गट) हे राज्यात एकत्रित सत्तेत आले असून धर्माबाद नगर परिषदेत अध्यक्षपदाचा उमेदवार मग कोण असेल ? धर्माबाद तालुक्याचे एसडीएम, वैद्यकीय अधीक्षक, गट शिक्षण अधिकारी व एकात्मिक बाल विकास कल्याण अधिकारी ह्या महत्वपूर्ण पद केवळ प्रभारी लोकांच्या भरवश्यावर कारभार चालवले जात असून पर्मनंट अधिकारी कधी मिळणार ? या प्रश्नावर त्यांनी मौन बाळगणे पसंद केले. तालुक्यातील रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले असून त्यामुळे या रस्त्यावर स्पीड ब्रेकर कधी बसवणार ? एक धावती रुग्णवाहन कधी मिळणार या प्रश्नावर संबंधित विभागाशी चर्चा करतो असे वेळकाढूपणाची भूमिका घेतली. अर्थात जनता दरबार व विकास कामाच्या नावाने खासदार नेहमीच हवा करून जातात मात्र त्यातील किती प्रश्न सुटतात हा संशोधनचा विषय आहे अशी चर्चा आता रंगू लागली आहे.

लोकसभेची निवडणुकीच्या प्रचारात प्रतापराव पाटील चिखलीकरांनी विद्यमान तालुका अध्यक्ष यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत म्हणाले, होते की, "मला निवडुन द्या विजयी झाल्यानंतर पहिले धर्माबादच्या उड्डाणपूलाचे भुमीभुजन करुनच संसदेत पाय ठेवीन". खासदार महोदयना निवडून येऊन चार वर्ष झाली मग कुठे आहे उड्डाणपूल ? त्यामुळे अशोकराव चव्हाणांनी चॉकलेट दिले म्हण्यापेक्षा आपण आता पर्यंत किती चॉकलेट दिलेत याचीही गणती ठेवावी.
**बंडू पाटील नरवाडे, युवक काँगेस तालुका कार्याध्यक्ष,धर्माबाद**

भाजपचे विद्यमान धर्माबाद तालुकाध्याक्षांनी गुंठेवारी संदर्भात विविध आंदोलन बरीच केली मात्र जनता दरबारात का मौन बाळगले होते. ? हे एक कोडंच आहे. **नरेंद्र रेड्डी, काँग्रेस कार्यकर्ते**



# सेवानंद वानखेडे साहेबांचा नागरी सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अकोट :** सेवानंद वानखेडे साहेब पी. आय. दहीहांडा पोलीस स्टेशन यांचा सामाजिक कार्य लक्षात घेऊन जऊळका ता. अकोट येथील नागरिकांनी नागरी सत्कार करून सन्मानित केले.

सेवानंद वानखेडे सर आपले कर्तव्य बजावताना सामाजिक कार्यामध्ये सुद्धा अग्रेसर असतात. आंबेडकरवादी विचारधारा व चळवळच देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करून सर्व सामान्य माणसाला न्याय मिळवून देऊ शकते. यावर गाढ विश्वास असणारे सेवानंद वानखेडे साहेब आपले कर्तव्य बजावून सामाजिक कर्तव्याचीही जाणीव ठेवतात. नोकरी व पैसा आल्यानंतर समाजाकडे पाठ फिरवणारे अनेक लोक आपल्या डोळ्यासमोर असतात. परंतु सेवानंद वानखेडे सरांसारखे समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी, कायदा व संविधानाची जनजागृती करण्यासाठी सतत झटत असतात त्यांचे हे मौलिक कार्य दुर्लक्षित करून चालणार नाही. सेवानंद वानखेडे सर नेहमी सर्व सामान्य व्यक्तीच्या सानिध्यात राहुन त्यांना आंबेडकवादी चळवळ, भारतीय संविधान याविषयी मार्गदर्शन तर करतात च परंतु तरुणांनी वेगवेगळ्या माध्यमातून अर्थाजन करावे व आपल्या कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या मजबूत करावे हा त्यांचा सल्ला तरुणांना नेहमी प्रोत्साहन देत असतो. याचीच जाणीव ठेवून व सेवानंद वानखेडे साहेबांचे कार्य लोकांपर्यंत पोहचावे म्हणून जऊळका ग्रामस्थांनी त्यांचा नागरी सत्कार सुमेद घनबहादूर साहेब यांच्या हस्ते करून सन्मानित केले. सुमेध घनबहादूर साहेब देखील शासकीय पदाधिकारी असुन आंबेडकरवादी विचारधारा, चळवळ व सामाजिक ऐक्याला प्रोत्साहन देऊन सामाजिक कर्तव्य पार पाडतात. अशा सामाजिक प्रश्नांची जाणिव असलेल्या पदाधिकारी यांचे कार्य जनतेपर्यंत पोहचावे व इतरांना ही प्रेरणा मिळावी म्हणून जऊळका गावातील आंबेडकरवादी नागरिकांनी हा सत्कार घडवून आणला.

सत्कार समारंभाला माजी उपसभापती ज्ञानेश्वरभाऊ बोरोकार, सरपंच शिलाबाई अवचार, सुमेध घनबहादूर, प्रकाश घनबहादूर, दिपक शेटे, नितेश धांडे, सतिश काठोळे तसेच ग्रामपंचायत सदस्य व गावकरी उपस्थित होते.

# पोलीस निरीक्षक कौठाळे यांचे स्वागत, लोहकरे यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** बदली झालेले पोलीस निरीक्षक संजय लोहकरे यांच्या बुद्धी कौशल्य व विविध युक्त्यांचा योग्य समनवय साधून शहरातील अवैध व्यवहार, तसेच त्यांनी शहरातील गैरव्यवहार, मोबाईल चोरी, समृद्धी मार्गावरील दगडफेक, बाईकचोरी या बाबींना घातलेला आळा याही पुढे मी चालू ठेवील असे वक्तव्य नव्याने बदलून आलेले पोलीस निरीक्षक श्यामसुंदर रामचंद्र कोठाळे यांनी स्वागत व निरोप समारंभात गुरुवार(ता.०७)रोजी केले. संजय लोहकरे यांची बदली जिल्हा पोलीस कार्यालयात झाली त्यांना निरोप व श्यामसुंदर कौठाळे यांचे स्वागत करण्यात आले. निरोपाला उत्तर देताना लोहकरे यांनी नागरिकांचे सहकार्य बाबत आभार मानून आणखी येथेच काम करण्याची संधी हवी होती असे ते म्हणाले, कार्यक्रम अध्यक्ष उप विभागीय पोलीस अधिकारी महक स्वामी होत्याण् प्रास्ताविक व सूत्र संचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केलेण् किराणा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष व वैजीनाथ जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष प्रकाशशेठ बोथरा, सचिव धोंडीराम ठाकूर यांनी शाल व हार देऊन लोहकरे यांना निरोप तर कौठाळे चे स्वागत केले. पोलीस स्टेशनच्या वतीने ए.पी. आय.नरवडे व सर्व पोलीस स्टाफ यांनी स्वागत व निरोप दिला. सदर ए.काझी हाफीजोदीन, राजू काझी, गणेश खैरे,पो.पा. संघटनेचे कारभारी निघोटे, पोलीस मित्र राजेश खंडागळे,साहेबराव शिंदे,केशव पवार, कलीम कुरेशी, मजिद सुलतान, कुरेशी, आर.के.मंडप, रफिक बागवान, राहुल लांडे, संतोष लोखंडे, गौरव दौडे, शैलेश पोंदे, प्रेम राजपूत, राजू चहावाला, शैलेश खैरमोडे, निलेश पारख योगेश गाढे, दिलीप अनर्थे, विश्वासू यांनीही स्वागत केले.



# आंबेडकर वस्तीमधील रस्त्याची दुरवस्था

आधुनिक केसरी न्यूज


**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील देवळाना बु येथील आबेंडकर वस्ती मध्ये जाणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था झालेली आहे , मागील दोन दिवसापासून झालेल्या पावसाने रस्त्याची चिखलयमय अवस्था झालेली दिसते. येणाऱ्या जाणाऱ्या पायी तसेच वाहन धारकांना मोठी कसरत करवी लागत आहे, वेळोवेळी निवेदन देऊन देखील कुणी लक्ष देण्यास तयार नाही. शनिवारी देवळाना बु आबेंडकर वस्ती मधील दगडु चाबुकस्वार यांचे निधन झाले अंतिम यात्रेसाठी त्यांचे प्रेत स्मशानभूमीत नेण्यासाठी स्वर्गरथ चिखलयमय रस्ता असल्याने आला नाही. व चिखलातुन प्रेतयात्रा काढावी लागली. मरणा नंतर ही दगडु चाबुकस्वार यांना चिखलातुन जावे लागलेमागील पंचवीस वर्षापासुन आंबेडकर वस्ती मध्ये राहणारे नागरिक रस्त्याची मागणी करताय परंतु कुणी त्यांच्या कडे लक्ष देण्यास तयार नाही. आंबेडकर वस्ती मधुन दिव्यांग व्यक्ती विद्यार्थी, वयस्कर ,गरोदर स्त्रिया, यांना पाऊसाळ्यात त्रास सहन करावा लागतो. आंबेडकर वस्तीमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे म्हणने आहे कि जर लवकर रस्ता तयार केला नाही तर येणाऱ्या आगामी पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या निवडणूक यावर देवळाना बु,व आंबेडकर वस्तीमधील नागरिक मतदानावर बहिष्कार टा कतील स्थानिक लोकप्रतिनिधी नि लवकरात लवकर रस्त्याचे काम चालू करावे अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# पाय घसरल्याने शेततळ्यात बुडून शेतकऱ्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** शेताच्या धुऱ्यावरून पाय घसरून शेततळ्यात पडल्याने पाण्यात बुडून एका तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज ८ जुलै रोजी सकाळी ११ .३० वाजता लाखांदूर येथे घडली. भैरुदास सुखदेव गोटेफोडे (४५) रां. लाखांदूर असे मृतकाचे नाव असून तो लाखांदूर येथील जय माता डी ट्रेडर्सचां मालकही होता. नित्याप्रमाणे सकाळीच उठून भैरुदास लाखांदूर जवळील अंतरगाव येथे असलेल्या त्यांच्या शेतावर गेला होता. आज सकाळी रिमझिम पावसाच्या सरी कोसळत असल्याने शेतावरील धुऱ्यावरून चालत असताना अचानक पाय घसरून तो ६ फूट खोल असलेल्या शेततळ्यात पडले. बाहेर निघता न आल्याने खोल पाण्यात बुडून भैरुदास गोटेफोडे याचा मृत्यू झाला. सकाळी अकरा वाजले तरी मुलगा घरी न आल्याने घरचे लोक शेतावर गेले असता भैरूदास पाण्यात बुडालेल्या अवस्थेत दिसला. लाखांदूर पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहचून मृतदेह पाण्याबाहेर काढले व पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठविले. मृतक भैरुदास हे लाखांदूर येथील नगर पंचायतीच्या माजी नगरसेविका रिता गोटेफोडे यांचे पती आहेत.

## लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424

# वेटलॉससाठी डाइट ओट्स उत्तप्पा



आधुनिक केसरी

**साहित्य :** 1 वाटी ओट्स, अर्धी वाटी रवा, अर्धी वाटी दही, सिमला मिरची, गाजर , कांदा, 5..6 लसूण पाकळ्या, 2.3 हिरव्या मिरच्या, आल्याचा छोटासातुकडा, कोथिंबीर , कोबी, मीठ, तेल 1 चमचा धणे जिरे पावडर, चिमूटभर सोडा , टोमॅटो केचप, हिरवी चटणी.

**कृती :** प्रथम ओट्स व रवा मिक्सर मधून बारीक करावा. त्यात दही घालून अर्धा कप पाणी घालावे व पुन्हा सर्व छान फिरवून एका भांड्यात काढून झाकून ठेवावे. आले, लसूण, मिरची मिक्सर मधून वाटून घ्यावे. मग कोबी,कांदा व सर्व भाज्या बारीक चिरून, किंवा पातळ चकत्या करून सर्व मिळून दीड वाटी घ्याव्यात. कोथिंबीर सुद्धा बारीक चिरून ठेवावी. साधारण १५ते २० मिनिटांनी ओट्सच्या बॅटरमधेआले लसूण व मिरची पेस्ट, कोथिंबीर घालून मीठ, धनेजिरे पावडर घालावी. सोडा घालून छान फेटून पीठ तयार करून घ्यावे.गॅस वर नॉनस्टिक तवा गरम करायला ठेवून सुरुवातीच्या उत्तप्यासाठी तव्याला तेल लावून घ्यावे. तवा गरम झाला की किंचित पाण्याचा शिपका मारून लगेंच डावभर पीठ घालून पसरून त्यावर भाज्या पसरुन उत्तप्पा बनवून घ्यावा.झाकण ठेवून खालून खरपूस होईपर्यंत भाजून घ्यावा . झाकून ठेवल्यामुळे सर्व कच्च्या भाज्या छान वाफल्या जाऊन त्याची खूप छान टेस्ट येते व पचनही सुलभ होते. खालून खरपूस झाला की उलटून दुसऱ्या बाजूनेही छान भाजून घ्यावा. तयार ओट्सचा गरम गरम उत्तप्पा सर्व्हिंग डिश मध्ये काढून टोमॅटो केचप ,हिरव्या चटणी बरोबर सर्व्ह करावा.**वैशिष्ट्य :** ओट्समधे भरपूर प्रमाणात कार्बोहायड्रेट्डस व फायबर असल्यामुळे वजन कमी करण्यासाठी हा एक उत्तम घटक आहे. शिवाय ओट्समुळे जास्त वेळ भूक लागत नाही. पोट भरलेले राहते. त्यामुळे वजन नियंत्रित होते. भाज्यांमधुन भरपूर जीवनसत्वे मिळतात. तेल \ तूप सुद्धा खूपच कमी प्रमाणात लागते. चवीलासुद्धा खमंग व टेस्टी लागतो .

# भोकर तालुक्यातील शेतकरी सुखावला

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** ग्रीष्मातील चटक्यानी करपलेली धरणी अक्षरशा भेगाळून गेली..पावसाळा सुरू झाला तरी वरूणराजा काहि केल्या मेहरबान झाला नाही.. एकापाठोपाठ तीन नक्षत्र कोरडे गेल्यान बळीराजाचे अवसान गळालं. शेवटी पूर्नवसु नक्षत्रात पावसानं दमदार हजेरी लावली..थेंबाच्या आसक्तीने आकाशाकडे टक लावून बसलेली धरणी तृप्त झाली. पाऊस सरीन रानोवनी, पानोपानी चैतन्य बहरून आल आहे..रान अबादानी झाल्याने शेतकरी सुखावला आहे.

तालूक्यात सिंचनाची वाणवा असल्याने शेतकऱ्यांना निर्सगाच्या पाण्यावरून विसंबून राहावे लागते. निर्सगाचे संतूलन दिवसेनदिवस बिघडत असल्याने त्याचा मोठा फटका शेती व्यवसायास बसतो आहे.महागाईचा भस्मासुर आणि दडी मारलेल्या पावसान हैरान करून सोडलं आहे. गतवर्षी पावसाळ्याच्या पहिल्याच चरणा पासून पाऊस मेरबान झाल्याने शेतीशिवाराला तलावाच स्वरूप प्राप्त झाले होत.यंदा मात्र वेगळं चित्र निर्माण झालं आहे.पावसाळ्यातील महत्वाचे मृग नक्षत्र कोरडे गेल्यान खरिपाच्या पेरण्या लांबणीवर गेल्या आहेत.काहि भागात हिंमत करून धूळपेरणी केली तरी वरूणराजा प्रसन्न व्हायला तयार नाही.पावसाअभावी दूबारपेरणी करावी लागते की काय अशी भीती व्यक्त केली जात होती.दरम्यान ऊशिरा का होईना पुर्नवसू नक्षत्रात जलधारानी धरती न्हाऊन निघाली.बळीराजाच्या कष्टभरल्या चेह-यावर पावसाचे निथळणारे थेंब जणु अमृतासमान भासु लागले आहेत.जलधारानी धरतीवर हिरव्याकंच हिरवाईच अवर्णनीय सौंदर्य आणि गंधरूपी उधळण झाल्याने सृष्टीच रूपच पालटून गेले आहे.

# करंजीचे पांडुरंगाचे मंदिर भाविकांचे आशास्थान

## हेमाडपंथी मंदिरांची नाविन्यपूर्ण कलाकृती

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यांला धार्मिक वारसा हा मोठ्या प्रमाणावर लाभला असून पावसाळ्यात तालुक्यातील अनेक धार्मिक स्थळांना जणू यात्रेचे स्वरूप येते.

तालुक्यात वणीचा गड, दिंडोरी येथील स्वामी समर्थ महाराज मंदिर, देवघर येथील भगवान शिव मंदिर, तसेच कंरजीयेथील अनेक कलाकृतीनी नविन्यपुर्ण आकर्षक असे पांडुरंगाचे मंदिर हे सध्या आषाढ महिन्यात भाविकांच्या मनातील भक्तिभावनेचा केद्र बिंदू बनले आहे. त्यामुळे येथे या महिन्यात भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणावर मांदीआळी पाहायला मिळते.

ज्यांनी नाही पाहिली पंढरी त्यांनी पाहावी दिंडोरी! हे जून्या जाणकार नागरिकांचे शब्द हे खरे ठरतांना दिसत आहे. दिंडोरी तालुक्यातील दिंडोरी वणी रस्त्यावर घनदाट करवंदाची झाडी, डोंगर माथा परिसर, निसर्गाने केलेली मुक्त उधळणं, एकांत भाग इ.मुळे अनेक भाविक भक्तांना हा मंदिर परिसर धार्मिक साधनेसाठी महत्त्वाचा मानला गेला आहे. याठिकाणी काही आधिकारी साधु महंतांच्या पुरातन समाधी स्थळ पाहायला मिळतात. याठिकाणी देवांना स्नान घालण्यासाठी गंगेचे अवतरणं आहे. त्यांचा पुरावा म्हणून येथे जेथून आजही कायम स्वरूपी पाणी वाहाते त्या गंगेमातेचे मंदिर भाविक भक्तांना भुरळं घालते.

करंजी येथे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे अतिशय पुरातन असणारे व कलाकृतीने तयार केलेले पांडुरंगाचे मंदिर म्हणजे साक्षात पंढरपूर चे मंदिर मानले जाते. ज्या ज्या भाविक भक्तांना आपल्या काही



अडचणी मुळे आषाढी , कार्तिकी एकादशीला पंढरीला जाता येत नाही .असे भाविक भक्त आषाढ महिन्यात करंजी येथे येऊन मनोभावे या मंदिरात येऊन दर्शनाचा लाभ घेतात.

**पर्यटन क्षेत्रांचा दर्जा मिळण्याची मागणी :** दिंडोरी तालुक्यातील धार्मिक क्षेत्रातील एक मानांचा तुरा म्हणून कंरजी येथील धार्मिक क्षेत्राकडे पाहिले जाते . परंतु या क्षेत्राला अजून प्रगतीसाठी काही शासकीय मदतीची गरज असुन त्या प्रतिक्षेत हे स्थान सध्या आपल्याला दिसत आहे . जर मोठ्या प्रमाणावर शासकीय मदत या क्षेत्राला मिळाली तर या क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणावर धार्मिक विकास होईल असे अनेकांनी प्रतिक्रिया देताना स्पष्ट केले . यासाठी या क्षेत्राला पर्यटन क्षेत्राचा दर्जा मिळणे अत्यंत गरजेचे आहे . यासाठी लोकप्रतिनिधीनी पुढाकार घ्यावा व या धार्मिक क्षेत्राला पर्यटन क्षेत्र दर्जा मिळुन देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे बनले आहे . निवडणूका आल्या की प्रत्येक उमेदवार निवडून येण्यासाठी याठिकाणी येऊन येथील देवांना साकडे घालतात . परंतु निवडणूक संपली की याक्षेत्राकडे अनेक जण कानाडोळा करतात . त्यामुळे हे पवित्र धार्मिक क्षेत्र अनेक विकास कामांपासुन वंचित राहिले आहे . ही एक दुर्दैवांची गोष्ट म्हणावी लागेल . यासाठी या क्षेत्राला पर्यटन क्षेत्रांचा दर्जा मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी नी लक्ष देण्याची गरज आहे . अशी मागणी समस्त भाविक भक्तांकडून होत आहे .

पुर्वी येथे कोकण,खानदेश, मधील काही वारकरी आपल्या दिंड्या घेऊन श्री क्षेत्र कंरजी येथे येत असतं.परंतु काळाच्या ओघात त्या दिंड्या आता बंद झाल्या आहेत. परंतु येथे आजही विविध धार्मिक कार्यक्रमाचे वार्षिक नियोजन हे केलेले असते. त्यामध्ये सप्ताह, दत्त जन्मोत्सव ,समाधी वर्धापन दिन साजरे होत असतात. त्यामुळे हे क्षेत्र आजही महाराष्ट्रांच्या कान्याकोप-यात एक धार्मिक स्थळ म्हणून नावारूपाला आलेले आहे. त्यामुळे येथे अनेक उत्सवांसाठी अनेक भाविक भक्तांची मोठी मांदीआळी येत असते. व दर्शन घेऊन आनंदाने आपल्या घरी जात असतात.



# वैद्य भालेराव यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील विरमगाव येथील वैद्य.श्री.आजिनाथ सांडू भालेराव संगमेश्वर विरमगावकर यांना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती व मधुमेह मुक्ती दूत पुरस्कार प्रदान औरंगाबाद जिल्ह्यातून वैद्य.आजिनाथ भालेराव यांच्या वर शुभेच्छा चा वर्षाव. खुलताबाद.खुलताबाद तालुक्यातील बाजार सांवगी येथील वैद्य. आजिनाथ भालेराव यांना 25/06/2023 रोजी कोल्हापूर येथे राज्य स्तरीय व्यसनमुक्ती व मधुमेह मुक्ती दूत पुरस्कार मोठ्या उत्साहाने प्रदान करण्यात आला आहे.

वैद्य.श्री.आजिनाथ भालेराव आयुर्वेदिक दिव्य शक्ती कांस्य थाळी मसाज केंद्र व व्यसनमुक्त व मधुमेह मुक्त केंद्र बाजार सांवगी ता.खुलताबाद जिल्हा.औरंगाबाद यांना सदरचा पुरस्कार सोहळा "समर्थ सोशल फाउंडेशन व न्यूट्रिफल हेल्थ ली" या ट्रस्ट च्या माध्यमातून देण्यात आला वैद्य आजिनाथ भालेराव यांनी अनेक पुरुष व महिला यांना व्यसनमुक्त व मधुमेह मुक्त केल्या बद्दल त्यांच्या कामाची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला आहे हा पुरस्कार कराड तालुक्याचे नायब तहसीलदार विजय माने सर व समर्थ सोशल फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष सादिक शेख साहेब यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला आहे हा पुरस्कार मिळाल्याबद्दल वैद्य.आजिनाथ भालेराव यांच्या वर औरंगाबाद जिल्ह्यातील विविध सामाजिक, राजकीय, डॉक्टर, वकील, इंजिनिअर,शिक्षक इत्यादी मान्यवरा कडून शुभेच्छा देण्यात आल्या या वेळी नारायण पोवार PNB मेट लाईफ इन्शुरन्स ब्रांच मॅनेजर व लोकसभा उमेदवार, स्वामी वासुदेवानंद गिरी मध्य प्रदेश ब्रहानपूर, आनंदा शिंदे जिल्हा समन्वयक महाराष्ट्र राज्य महिला आयोग, शिवशंभू निवासी व्यसनमुक्ती केंद्र संस्थापक सागर देसाई, डॉ. हरिदास भोसले सर हे उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था संचालक सुहास पाटील सर यांनी केले व सुत्रसंचलन अस्लम शेख सर यांनी केले या वेळी दिडशे डॉक्टर व नॉन डॉक्टर यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कामाचे कौतुक करण्यात आले.या वेळी वरील उपस्थित मान्यवरांनी आपले मौलिक विचार मांडले आपला भारत देश डायबिटीस कंट्री होत आहे.अशावेळी भारत व्यसनमुक्त व मधुमेह मुक्त करणे काळाची गरज असल्याचे सांगितले अशावेळी समर्थ सोशल फाउंडेशन चे कार्य कौतुकास्पद असून त्यांचें कार्य वाढत जावे यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# सावळदबारा येथे तलाठी मुख्यालयी गैरहजर

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा पंधरा ते वीस गावाचे केंद्र बिंदू मानले जाते येथे फक्त नावालाच तलाठी कार्यालय आहे.शेतकऱ्यांना शासकीय योजनांची माहिती व्हावी व त्यांचा लाभ मिळावा या उद्देशाने शासन विविध योजना राबवित आहे मात्र शासनाच्या योजना यशस्वी होत नाही याला कारण म्हणजे शासकीय कर्मचाऱ्याचे उदासीन धोरण.

सध्या सर्वत्र सध्या चार ते पाच दिवसांपूर्वी वरुणराजाचे नुकतेच आगमन झाले आहे शेतकऱ्यांना आनंद झाला आहे आणि सध्या पिक विमा योजना ३१ जूलै शेवटची तारीख आहे.शासनाने एक रुपयात योजना सुरू केली आहे. योजना यशस्वी होण्या ऐवजी त्या कशा फोल ठरतील यामध्ये प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी धन्यता मानतात.जनतेचे प्रशासकिय कामे व्हावे यासाठी तलाठ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे परंतु ते मुख्यालयी न राहता लोकांना कामासाठी त्यांचा शोध घेत घेत सोयगाव तालुक्याला पायपिट करत यावे लागते.अंतर ६५ कि.मी.आहे. सोयगाव तालुक्यात अनेक प्रशासकिय कामासाठी,शेतीविषयक योजनांसाठी तलाठ्याकडच्या कागदपत्राची आवश्यकता असुन तलाठी गावांमध्ये येत नसल्यामुळे अनेक शेतकरी महत्वाच्या कागदपत्राकरिता तलाठ्यांचा शोध घेत वणवण फिरत आहेत. बहुसंख्य तलाठी मुख्यालयी राहत नसल्या बाबत जनतेच्या तक्रारी आहेत.त्यांना तालुक्याच्या ठिकाणी यावे लागत असल्याने नागरिकांना मानसिक त्रास व आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

येथे तहशिल कार्यालयात बसून त्यांच्या मर्जीतील शेतकऱ्यांची कामे करतात अशी कुजबुज ऐकावयास मिळत आहे. तलाठ्यांच्या चुकीच्या धोरणामुळे तालुक्यातील अनेक शेतकरी शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळण्यापासून सावळदबारा ग्रामीण भाग वंचित राहत आहेत. शेतकऱ्यांना लिखित सात बारा शेती विषयक दस्तऐवजची आवश्यकता असल्यास त्यांना सोयगाव येथे तलाठयांनी केलेल्या कार्यालयात जावे लागते. सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांना आपले महत्वाचे कामे सोडून सोयगाव येथे जावे लागत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड बसत आहे.




# धारदार तलवारीसह पाल येथे तरुणास अटक

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पाल येथील एका घरी छापा टाकून धारदार तलवारीसह तरुणास ताब्यात घेण्यात ब्लम आले. फुलंबी पोलिसांनी गुरुवारी ( दि.६ ) दुपारी ही कारवाई केली. विक्रम संजय धनावत ( रा. जाधववाडी, पाल ता. फुलंब्री ) असे पकडण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजता पोउपनि श्रीनिवास धुळे आणि चालक पोहेकॉ तेलगोटे हे पेट्रोलिंगवर असताना त्यांना पाल येथे विक्रम संजय धनावतयाच्याकडे धारदार तलवार असल्याची माहिती खबऱ्याकडून मिळाली. यावरुन पोलीस निरीक्षक निकाळजे यांच्या आदेशाने पोउपनि धुळे, पोहेकॉ तेलगोटे, पोहेकॉ मुजिब सय्यद यांनी दुपारी १२.२० वाजेच्या सुमारासविक्रम धनावत याच्या घरावर छापा मारला. यावेळी त्यांना धारदार तलवार




मिळून आली. पोलिसांनी आरोपी विक्रम यास अटक केली. त्याच्याविरुध्द फुलंब्री पोलीस ठाण्यात गुरनं २६७ / २०२३ कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे पोहेकॉ ११५४ सैय्यद यांनी कायदेशीर फिर्याद द दाखल केली. अधिक तपास न पोलीस उपनिरीक्षक मुंजाळ न करीत आहेत.

# युवकांना रोजगार देऊन वाढदिवस साजरा

## नामदेव आयलवाड यांचा अनोखा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्याचे बहुजन नेते नामदेव आयलवाड यांच्या वाढदिवसा निमित्त इतर वायफळ खर्चाला फाटा देऊन शुक्रवारी ( ता. सात ) शहरात रोजगार मेळावा घेऊन तब्बल ३७५ बेरोजगार यूवकाना रोजगाराची संधी उपलब्ध करून वाढदिवस साजरा केल्याने अनोख्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. शहरातील संगम फंक्शन हॉल येथे महारोजगार भरती मेळावा व पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. मेळाव्यात महाराष्ट्रातील नामांकित असलेल्या सह्याद्री फार्म नांदेड, हायर ग्रुप कंपनी रांजणगाव,एलजी रांजणगाव, स्वतंत्र फायनान्स पीव्हीटी, मदरसन पुणे, जेबील सिया मेसिको,सियाबे स्टील रांजणगाव, एलआयसी यासह नामांकित कंपनीचे भरती मॅनेजरांनी उपस्थिती होती. यावेळी बहूसंख्य सुशिक्षित बेरोजगारांनी हजेरी लावून मुलाखती दिल्या. यापैकी( ३७५ ) सुशिक्षित बेरोजगार यूवकाना रोजगार मिळाला तर अनेक उमेदवारांच्या रोजगारांची भरती प्रक्रिया प्रोसेस मध्ये आहे.ज्या बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाला त्या युवकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय पिछडा सोशित संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सटवाजी माचनवार होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय यादव महासभा राष्ट्रीय महासचिव बिसेन यादव ,नगरसेवक मनपा नांदेड धीरजभैय्या यादव होते.

व्यासपीठावर बाजार समितीचे सभापती जगदीश पाटील भोसीकर, माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती बाळासाहेब पाटील रावणगावकर, प्रकाशराव देशमुख भोसीकर,कॉंग्रेस कमिटीचे जिल्हाउपाध्यक्ष भगवानरावजी दंडवे, मार्केट कमिटीचे उपसभापती बालाजीराव शानमवाड,माजी नगराध्यक्ष विनोद पाटील चिंचाळकर ,माजी उपनगराध्यक्ष गोविंद पाटील बाबागौड.खरेदी विक्री संघाचे चेअरमन मारोती बल्लाळकर, गोल्ला गोल्लेवार यादव समाज सेवा संघटना नांदेड चे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक संजय आऊलवार, समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक राजन्नाजी आटपलवाड, जगन्नाथजी येईलवाड, ओबीसी नेते गोविंदराम सुरनर,सतिषचंद्र शिंदे, गोविंद फेसाटे,सरपंच संघटनेचे तालुकाअध्यक्ष माधवराव अमृतवाड, उपाध्यक्ष मारोतराव अंगरवार, माजी उपसभापती सुरेश बिल्लेवाड,मार्केट कमिटीचे संचालक उज्वलजी केसराळे, रामचंद्रजी मुसळे,राजकुमार अंगरवार, केशव पाटील पोमनाळकर,व्यंकटराव पाटिल महागावकर, गणेश राठोड, कृष्णा वागतकर, गोल्ला गोल्लेवार यादव समाज सेवा संघटना नांदेडचे जिल्हा उपाध्यक्ष कृष्णराव चिंतलवार, तुकाराम रामनबैनवाड, बालाजी पाटील कटेकलुरकर, कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रविंद्र बंडेवार, बापुरावजी गोटमवाड, नामदेवराव झंपलवाड, गंगाधर सिद्धेवाड,अरुण करेवाड, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख सटवाजी मोदलवाड, देगलुर तालुकाध्यक्ष गंगाधर दोसलवार, उमरी तालुकाध्यक्ष गणेश आनेमवाड, नायगाव तालुकाध्यक्ष मधुकर घोसलवाड, दक्षिण तालुकाध्यक्ष गोविंद कोंके,धर्माबाद तालुकाध्यक्ष कैलास चांदोड, कंधार तालुकाध्यक्ष विजय गोटमवाड, भोकर तालुकाध्यक्ष संतोष आक्कमवाड भोसीकर, मुदखेड तालुकाध्यक्ष श्रीहरी बैनवाड, गोविंद बकेवाड, बापुराव चिकलपल्ले, विलासराव रोकमवारसर, सटवाजी नांदेडे, पांडुरंग पुपलवाडसर,शिवा पाटील, बाबुराव माडगे, पंडित तोटेवाड, श्रीराम बोरोड,गजुशेठ आयलवाड, महानगर युवा संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष संदीप जिल्लेवाड, बालाजी जुरावाड, नरसिंग चिंतलवार, प्रकाश कार्लेवाड, डॉ. दयलोड, बालाजी पोलवाड, गोपीकृष्ण पुपलवाड, श्रीनिवास आटलावार, प्रमोद आटकेलवार, मनोज आऊलवार, गणेश यादव, किनवट तालुकाध्यक्ष व्यंकट बंडीवार, बालाजी तोटेवाड, चंद्रकांत कटकमोड, संदीप येशिमोड,सरपंच राघोबा पाटील, मोहन राठोड, ज्ञानेश्वर गोदेवाड, सुनील मादनवाड,सोशल मीडियाचे संजय चिंतावार, संतोष आनेराये,संजय आरलवाड, संभाजी आरलवाड, बालाजी आनंतवाड, माधव काईतवाड, बालाजी बयेवाडयांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात तालुक्यातील सर्व पत्रकारांचा वॉटरप्रूफ बॅग व पुष्पहार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नामदेव आयलवाड मित्र मंडळाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अंबादास अटपलवाड यांनी केले तर आभार बालाजी नारलेवाड यांनी मानले.

# दीपक पांचाळ सेट परीक्षा उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत माहे मार्च २०२३ घेण्यात आलेल्या राज्य पात्रता परिक्षा अर्थात सेट परिक्षेत श्री दिपक अनंतराव पांचाळ हे मराठी विषयात उत्तीर्ण झाले आहेत. ते सध्या जि.प.प्रा. शा. दसमेगाव येथे कार्यरत आहेत.या यशाबद्दल वाशीचे गटशिक्षणाधिकारी मा. भारत बन , भूमचे गटशिक्षणाधिकारी राहूल भट्टी , तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री हरिभाऊ रणदिवे तसेच सर्व सहकारी शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# सापाला विजेचा झटका

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ३३ केव्ही एटापल्ली उपकेंद्रातून निघणाऱ्या ३३ केव्ही जांबिया गट्टा वीज वाहिनीवर साप चढला. विजेच्या धक्क्याने या सापाचा तर मृत्यू झाला. मात्र त्यामुळे ५० रोहित्रांचा वीजपुरवठा खंडीत झाला व आसपासची ३३ गावे अंधारात गेली. यामुळे १ हजार ८८५ ग्राहकांचा वीजपुरवठाही खंडित झाला. वरिष्ठ तंत्रज्ञांनी पोलवर चढून मृत अवस्थेत असलेला साप काढून घेतला तसेच हेडरी गावापुढे या वीज वाहिनीच्या तारा तुटलेल्या होत्या ते जोडण्यासाठी संबंधित वरिष्ठ तंत्रज्ञ आणि विद्युत सहाय्यक गेले आणि दुपारी एक वाजता वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

# कीटकनाशके औषधी, तणनाशक कंपन्यांनी मनमानीने किमती छापल्याने शेतकऱ्यांची लूट

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** किटकनाशक औषधी कंपन्यांनी मनमानीने किमंती छापल्या बर्याच दुकानदारांकडे एमआरपीच्या अर्ध्या किंमतीत नगदी पैशाने शेतकऱ्यांना किटकनाशके औषधी मिळतात परंतु सर्वच शेतकरी हे नगदी पैसे देऊन किटकनाशके औषधी खरेदी करू शकत नाही, त्यामुळे बर्याच दुकानदार गरीब शेतकऱ्यांना अर्ध्या किमतीत किटकनाशक औषधी विकुन अर्ध्या किमतीत त्यांच्या नावावर लिहून ठेवतात व त्यांच्या शेतातील उत्पन्न निघाले की त्यांच्या कडून ते पैशे वसुल करतात हे उघड उघड दुकानदार शेतकऱ्यांवर अन्याय करत नाही का म्हणून या करिता शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेच्या वतीने फुलंब्री चे तहसीलदार यांच्या कडे आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.

तर दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, किटकनाशक औषधी कंपन्यांनी मनमानीने किमंती छापल्या वर शेतकऱ्यांची आर्थिक लुट करत आहे.

महाराष्ट्र राज्य शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली असता वरील विषय समोर आला. संबंधित कृषी अधिकार्यांना संपर्क केला असता तर कृषी अधिकारी म्हणतात शासनाने कोणताही ठोक निर्णय घेतला नाही, औरंगाबाद जिल्ह्यासह फुलंब्री, सिल्लोड, वैजापूर, कन्नड, खुलताबाद, गंगापुर, पैठण याठिकाणी अधीक शेतकरयांनी कापूस,मका व इतर पिके लावली आहे . आजही शेतकऱ्यांच्या घरात कापूस पडलेला आहे त्याला योग्य भाव नसल्याने शेतकरी आजही परेशान आहे. म्हणुन याकरिता या कडे लक्ष वेधून संबंधित अधिकारी व इतर दुकानदारांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष काशीनाथ जाधव यांच्या वतीने करण्यात आली आहे.






# तरुणाकडून साडेचार लाखांची अफू जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राजस्थानातून अफू विक्रीसाठी आलेल्या तरुणाला अमली पदार्थ विरोधी पथकाने बिबवेवाडी भागात पकडले. त्याच्याकडून चार लाख ६० हजार रुपयांची २३० ग्रॅम अफू, मोबाइल संच, दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. लाडूराम वागाराम बिष्णोई ( वय २०, रा. सरनाऊ, जि. जालोर, राजस्थान ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. बिष्णोई सध्या कोंढवा भागातील काकडे वस्ती परिसरात राहायला आहे.

तो बिबवेवाडीतील सुखसागरनगर परिसरात अफू विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. सापळा लावून पोलिसांच्या पथकाने त्याला पकडले. त्याची झडती घेण्यात आली. त्याच्याकडून अफू, मोबाइल संच, दुचाकी असा पाच लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त सुनील तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड, सहायक निरीक्षक शैलजा जानकर, मारुती पारधी, प्रवीण उत्तेकर, विशाल दळवी, पांडुरंग पवार, राहुल जोशी आदींनी ही कारवाई केली.





# मनसेच्या वतीने 'फक्त एक सही, संतापाची' स्वाक्षरी मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

> आता दोन भाऊ एकत्र येण्यापेक्षा एक भाऊ सचेत बसणे जास्त गरजेचे आहे . आणि तो एक भाऊ म्हणजे मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे आहेत . त्यामुळे लोकांच्या मनातील राजकीय घडामोडीवरील संताप व्यक्त करणाऱ्यांची संख्या वाढली आहे . आणी ही बाब आता राजकारण करणाऱ्यापर्यंत पोहचवण्यासाठी हे अभियान सुरु करण्यात आले आहे .
> **बळीराम खटके, जिल्हाध्यक्ष,मनसे जालना**

**अंबड :** शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने 'फक्त एक सही, संतापाची' या स्वाक्षरी मोहीमेच्या माध्यमातून सरकार विरोधात आंदोलन छेडण्यात आले आहे. शहरातील बस स्थानकासमोर आज दि.८ रोजी सकाळी ८ वाजता ही स्वाक्षरी मोहीम सुरु करण्यात आली.

यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष बळीराम खटके, अंबड तालुकाध्यक्ष पंडित पातील, भागवत बडे, महेश चोथे, पिणू कोकणे, हकीम शेख, किस्मत अली, अशोक आटोळे, दत्ता जामकर, अभिषेक चाळके, भगवान खंडागळे, नाहेद पटवा, नंदू उबाळे, बळीराम गोल्डे, संतोष बिबे, भागवत दोरके हे पदाधिकारी उपस्थित होते.

राजकारणात सद्यस्थितीमध्ये राज्यात सत्तेच्या हव्यासापोटी पक्षापक्षात पक्ष फुटण्याच्या घडामोडी घडत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये प्रचंड संतापाची लाट आहे. आणी यामुळेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांनीही याबाबत संताप व्यक्त करून दि. ८ आणि ९ जुलै रोजी राज्यभरात 'फक्त एक सही, संतापाची' या स्वाक्षरी मोहीमेच्या माध्यमातून आंदोलन छेडल्यामुळे मनसेच्या वतीने अंबड येथे स्वाक्षरी मोहीम सुरु करण्यात आली.

शिवसेनेतून शिंदे गट बाहेर पडून भाजपसोबत गेल्यानंतर जनतेकडून तीव्र भावना सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात केल्या. ही बाब ताजी असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित दादा पवार यांचा गट शिवसेना-भाजप सरकारमध्ये सहभागी झाला. आणी त्यामुळे आता शिवसेना शिंदे गट आणी भाजपा या दोन्ही पक्षात गटबाजी उफाळली आहे. या राजकीय परिस्थितीबाबत जनतेच्या मनात चीड निर्माण झाली आहे. जनतेने निवडून दिलेले आमदार स्वतःच्या स्वार्थापायी आपला पक्ष सोडून सैरभैर पळू लागले आहेत. हे जनतेला आवडणारे नसल्याने नक्कीच या अनपेक्षित घटनेचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला फायदा मिळेल असा आशावाद यावेळी खटके यांनी व्यक्त केला आहे.सद्यस्थितीत जनतेच्या आलेल्या प्रतिक्रिया, भावना मनसेसाठी महत्वपूर्ण ठरणार आहेत. म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून राज्यात राजकारणावर प्रतिक्रिया म्हणून हा उपक्रम सुरु केला आहे.

सर्वसामान्य जनतेला गृहीत धरून सर्व राजकारण सुरू आहे. त्यामुळे मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशाने ही स्वाक्षरी मोहीम सुरु केल्याचे सांगण्यात आले.

# ब्राह्मण सभेच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** पिंपळे सौदागर येथील ब्राह्मण सभेच्या वतीने शनिवारी दि. ८ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. राजवीर पॅलेस सोसायटीतील विलास जोशी यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम झाला. ज्येष्ठ नागरिक विठ्ठल देवगावकर, विजया तारे आणि वासंती जोशी यांच्याहस्ते संत ज्ञानेश्वर माऊलींच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर रामरक्षा स्त्रोतांचे सामुहिक पठण करण्यात आले. जयवंत चौधरी यांनी अध्यात्मिक क्षेत्रातील गुरुचे योगदान आणि मानवी जीवनातील गुरुचे महत्व यासंबंधी विचार मांडले. गुरुपौर्णिमेचे औचित्य लक्षात घेऊन गुरुप्रती आदरभाव व्यक्त करणाऱ्या काव्यपंक्ती तसेच भक्तीगीते यावेळी सादर करण्यात आली. विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिक्षकांचा यानिमित्ताने गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास श्रीनिवास पारखी, राजेंद्र देशमुख, राजन धोंगडे, नंदकुमार देशमुख, राजेंद्र कुलकर्णी, सुरेश तारे, तारकेश गोडबोले, रमेश भट, प्रकाश जोशी, शशांक खांडेकर, चारुहास शुक्ल, संतोष मुळे, श्रीनिवास जोशी, सुषमा शुक्ल, सुरेखा कुलकर्णी, भारती न्यायाधीश, सुरेखा अनिल कुलकर्णी, म्रुणाली जोशी, विजया तारे, आरती किणगी, शशिकांत कुलकर्णी, अशोक कुलकर्णी, शंतनु जोशी, अभिजित जोशी, तृप्ती जोशी, आदिती जोशी, सुनीता देशमुख, छत्रेमॅडम आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ब्राह्मण सभेचे प्रमुख विलास जोशी यांनी केले. सुत्रसंचलन अनिल कुलकर्णी यांनी केले तर राजेंद्र तिखे-कुलकर्णी यांनी आभार मानले.

# सिद्धार्थच्या तेजस लोणेचे सेट परीक्षेत यश

आधुनिक केसरी न्यूज




**छत्रपती संभाजीनगर :** पडेगाव येथील सिद्धार्थ महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचा विद्यार्थी तेजस संजयकुमार लोणे हा सहायक प्राध्यापक पदासाठी घेतली जाणारी सेट परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. विशेष म्हणजे तेजस लोणे याने एम. कॉम. द्वितीय वर्षात शिकत असताना पहिल्याच प्रयत्नात हे यश संपादन केले आहे. या निमित्ताने महाविद्यालयाचे संचालक प्रा. सुनील मगरे व प्राचार्य डॉ. मनोहर वानखेडे यांच्या हस्ते तेजस लोणे याचा सत्कार करण्यात आला. या वेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. राजू वानखेडे प्रा. डॉ. सुकेशनी जाधव, प्रा. डॉ. विनोद अंभोरे, राम जाधव, असीत शेगावकर, मोईन तडवी, अनिता काकरवाल, श्रीकांत पातोडे यांची उपस्थिती होती.

# बिल काढण्यासाठी मागितली चार हजारांची लाच

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** महात्मा गांधी स्वयंरोजगार योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विहिरीचे मस्टर प्रमाणे बिल मंजूरीसाठी प्रतिमस्टर एक हजार रुपयेप्रमाणे पाच मस्टरचे एकूण पाच हजार रुपयांची मागणी करून तडजोडी अंती चार हजार रुपये घेतांना शुक्रवारी ( दी.७ ) सोयगाव तालुका तांत्रिक अधिकाऱ्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली.या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे. आमखेडा येथील तक्रारदार यांच्या स्वतःच्या शेतीमध्ये महात्मा गांधी स्वयंरोजगार योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विहिरीचे मजुरीचे मस्टर प्रमाणे बिल मंजूर करण्या करिता आरोपी लोकसेवक - सचिन नानासाहेब रोटे, ( वय ३० ) व्यवसाय नोकरी पद, तांत्रिक अधिकारी, तालुका सोयगाव, जिल्हा औरंगाबाद, ग्रामपंचायत अमखेडा ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद याने प्रतिमस्टर १०००/- रुपये या प्रमाणे पाच मस्टरचे एकूण ५०००/- रुपयांची मागणी करून तडजोडी अंती ४०००/- रुपये पंच साक्षीदार समक्ष मागणी करून लाचेची रक्कम स्वतः स्वीकारल्या प्रकरणी सोयगाव पंचायत समितीच्या तांत्रिक अधिकाऱ्यास शुक्रवारी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली आहे. ही कारवाईपोलीस उपाधीक्षक संगीता पाटील, ला. प्र. वि यांनी पोलीस अधीक्षक संदीप आटोळे,ला.प्र.वि.औरंगाबाद,अपर पोलीस अधीक्षक, विशाल खांबे,पोलिस उप अधीक्षक,राजीव तळेकर, ला.प्र.वि. औरंगाबाद सापळा पथक - पोना शिरीष वाघ, पोअ विलास चव्हाण, चांगदेव बागुल यांनी पार पाडली.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर